


# माणूसकीचा मळा...
# भक्तीचा लळा :
# चोखामेळा

संत चोखामेळा ६८७ वा
स्मृतिदिन सोहळा
स्मरणिका २०२५

शब्द शिवार प्रकाशन


# माणूसकीचा मळा...
# भक्तीचा लळा :
# चोखामेळा

## संत चोखामेळा ६८७ वा स्मृतिदिन सोहळा
## स्मरणिका २०२५

**संत चोखामेळा समाधी ट्रस्ट, मंगळवेढा,**
प्रकाशन : १७ मे २०२५

**प्रकाशक :**
**इंद्रजित घुले,**
**शब्दशिवार प्रकाशन,**
'इंदुलक्ष्मी', घुले गल्ली, मंगळवेढा,
ता. मंगळवेढा, जि. सोलापूर - ४१३ ३०५
संवाद : ९४२३०६०११२
indrajitghule81@gmail.com

मूल्य : २०० रुपये



# चोखामेळा स्मृतिदिन सोहळा
# स्मरणिका २०२५

**जयराज कृष्णा शेंबडे**
अध्यक्ष

**अविनाश शिंदे**
सचिव

**स्मरणिका संपादन मंडळ**
**प्रा. पठाण शिवशरण**
कार्यकारी संपादक
**प्रा. विनायक कलुबर्मे**
**डॉ. दत्ता सरगर**

**संत चोखामेळा स्मतिदिन सोहळा २०२५**
**संयोजन समिती सदस्य**
**डॉ. अरुण शिंदे, प्रा. विनायक कलुबर्मे, सतीश दत्तू, सागर साळुंखे, अभिजित शिंदे, ह.भ. प. माधव नामदास महाराज, ह.भ. प. निवृत्ती महाराज नामदास, ह.भ. प. विठ्ठल जाधव, ह.भ. प. महादेव यादव, प्रा. मधुकर भंडगे, ह.भ. प. शंकर हजारे, ह.भ. प. अरुण महाराज शिवशरण, ह.भ. प. मल्लिकार्जून राजमाने, ह.भ. प. ज्ञानेश्वर भगरे, अभिषेक सारडा, ह.भ. प. पिंटू लोकरे, ह.भ. प. रुक्मिणी आसबे, गौरव बुरकूल, संतोष गणोरे, नागेश फोटो**

**वारी परिवार, मंगळवेढा**

**संत दामाजी भजनी मंडळ**
**संत कान्होपात्रा भजनी मंडळ**
**संत सेना महाराज भजनी मंडळ**
**संत नरहरी सोनार भजनी मंडळ**



## अनुक्रम

**०१ संत नामदेव : चोखोबांचे गुरू**/ ०८
डॉ. आ. ह. साळुंखे, ज्येष्ठ विचारवंत, सातारा

**०२ संत चोखामेळा यांच्याशी संवाद**/ १७
डॉ. निर्मलकुमार फडकुले

**०३ देहिचा विटाळ देहीच जन्मला**/ २१
इंदुमती जोंधळे, ज्येष्ठ लेखिका, पुणे

**०४ मंगळवेढ्याचा इतिहास व सांस्कृतिक विकासाचे धोरण**/ २६
डॉ. अरुण शिंदे

**०५ चोखोबाची अभंग जीवनगाथा**/ ३९
ह.भ.प.कृष्णा रघुनाथ शेंबडे

**०६ परिस स्पर्श संत चोखामेळा संत सोयराबाई व संत निर्मळा**/ ४२
प्रा.सौ. वैशाली कोळेकर

**०७ संत सोयराबाईच्या अभंगातील जात उतरंडीवर भाष्य**/ ४६
प्रा विनायक मनोहर कलुबर्मे

**०८ ब्रह्मज्ञान वाउग्या गोष्टी**/ ४८
डॉ. दत्ता सरगर

**०९ संत परंपरेतील निस्सिम विठ्ठल भक्त चोखामेळा**/ ५०
सतीश सावंत

**१० संत परंपरेतील चोखोबाचे स्थान**/ ५४
सौ. पुष्पा गोपाळ बेणारे, पंढरपूर

**११ संत चोखोबांची दिव्यता**/ ५८
ह.भ.प.सुधाकर इंगळे महाराज, सोलापूर

**१२ संत चोखोबांचे शब्दब्रह्म**/ ५९
प्रो.डॉ.सौ.सुवर्णा चव्हाण-गुंड

**१३ संत चोखामेळा आणि दलित साहित्य**/ ६३
डॉ. गोपाळ गोविंद बेणारे

# ।। लाज न ये माझे चित्ता ।।

मंगळवेढ्याच्या मातीतील एक महान गायक प्रल्हाद शिंदे गेली कित्येक दशके आपल्या स्वरातून साद घालत महाराष्ट्राच्या मातीत मंगळवेढ्याची महती पेरतो आहे. 'चला मंगळवेढे पाहू...' चला तर मंगळवेढे पाहू... काय आहे मंगळवेढ्यात. 'संतभूमी' आहे. दीड डझनाहून अधिक संत या मातीत आहेत. मंडईतले आंबे मोजावेत तसे आपण इथले संत मोजतो. त्याचा भरीव आकडा भाषणात, सभेत, कवितेत वापरायला भांडवल होतं. त्याच्यापलीकडे इथं काय आहे? बाराव्या शतकातील महात्मा बसवेश्वर, तेराव्या शतकातील चोखामेळा, पंधराव्या शतकातील कान्होपात्रा इथं अजून जिवंत आहे, हेच आपल्यासाठी केवढं मोठं नवल आहे. आठशे वर्षे, सातशे वर्षे, पाचशे वर्षे एखाद्या व्यक्तीचं नाव त्या गावात घेतलं जातं, यापेक्षा या भूमीला आणखी काय हवं आहे?

इथं राजा बिज्जलाची राजधानी होती, इथं औरंजेबाची छावणी होती, आणखी बऱ्याच जणांनी इथं राज्य केलं असेल. अगदी राजापासून आमदार, नामदार, नगरसेवक पदापर्यंत. किती जणांची नावं मागं शिल्लक राहिली. किती लोक त्यांना लक्षात ठेवतात? कुणा कुणाचे साम्राज्य टिकून राहिले? उरली ती फक्त संतांची समाजाबद्दलची तळमळ आणि त्या तळमळीने भरून पावलेले करुणामय हृदय. म्हणून संत अजून आठवतायत. ही केवढी मोठी उपलब्धी आहे, आपल्यासाठी. त्यांची नावे या गावाशी जोडली नसती तर आपल्याला भाषणं कशी करता आली असती. आपण बुक्का कुणाला लावला असता? कुणाच्या दारात टाळ पिटले असते? हे सगळे मी का सांगतोय? तर इथल्या संतभूमी संतांचे दाखवावे, असे काहीच नाही.

जिथे चोखामेळा या संतांचा अंत झाला. त्या अस्थि न्यायच्या निमित्ताने का होईना संत नामदेवराय इथं येऊन गेले. याचा अर्थ नामदेवांचे पाय या भूमीला लागले आहेत. संत नामदेव जिथं जिथं गेलेत तिथं तिथं भव्य अशी स्मारके उभी राहिली आहेत. अगदी भारत पाकिस्तानच्या वाघा बॉर्डरजवळ असणाऱ्या घुमान आणि घुमानच्या आसपासही नामदेवाबाबाच्या नावानं अनेक स्मारकं आहेत. परंतु आमच्या मंगळवेढ्याचं दुर्दैव हेच की आम्हाला संतांविषयी कृतज्ञता बाळगून काही तरी करण्यात लाज वाटते.

सांगली संस्थानच्या अधिपत्याखाली असलेले मंगळवेढे. ९-३-१९६१ रोजी सांगलीचे श्रीमंत राजेसाहेब यांच्या शुभहस्ते श्रीसंत चोखामेळा समाधीचे उद्घाटन झाल्याची नोंद सापडते. त्या उद्घाटन सोहळ्याचे निमंत्रक श्री संत चोखामेळा जिर्णोद्धार समितीचे तत्कालीन चेअरमन ह. ना. उर्फ बापूसाहेब पटवर्धन होते. त्यांच्या योगदानाने मंगळवेढ्याच्या चौकामध्ये म्हणायला साधी का असेना; पण अतिशय महत्त्वपूर्ण कामगिरी चोखामेळा समाधीच्या माध्यमातून निर्माण केली. अन्यथा आम्ही आमचं डोकं कुठं टेकवलं असतं? हा प्रश्न पडतो. १९६१ ते आता २०२५ म्हणजे

तब्बल ६४ वर्षे ही समाधी मंगळवेढ्यात उभी आहे. दुसरी एक नोंद म्हणजे संत कान्होपात्रा यांचे छोटेसे मंदिर राहीबाई कवडे यांनी स्वत:च्या जागेत उभी केलेली आहे. त्यानंतर पाठखळ रोडला डॉ. आ. गो. पुजारी यांनी संत कान्होपात्रा यांच्या अभंगाचे मंदिर उभे केले आहे. या तीन घटितांमुळे तरी मंगळवेढ्यात तोंड दाखविण्यासारखे काही तरी उरले आहे. प्रल्हाद शिंदे कमानीतून जाताना, 'अरे शिंदे इथले का?' असे बाहेरचे आश्चर्याने उद्‌गार काढतात. ही केवढी मोठी गोष्ट मंगळवेढा नगर परिषदेने करून ठेवली आहे.

पंढरीच्या वाळवंटातून वारीतून निसटलेले वारकरी थेट मंगळवेढ्याला येतात. बालाजी मेडिलकलच्या समोर चौकात उभं राहून, ''वो, चोखामेळ्याचे मंदिर कुठाय वो?'' विचारतात. पान टपरीवाला म्हणतो, ''ही काय समोरची समाधी.'' वारकरी थोबाडीत मारल्यासारखे तोंड करतो आणि म्हणतो, एवढीच?

असे अनेक प्रसंग मी स्वत:हून चौकात उभं राहून अनुभवले आहेत. अनेक साहित्यिक, दिग्गज मंगळवेढ्यात येतात. संतभूमी दाखव म्हणून मागं लागतात. त्यांना फिरवून आणल्यावर ते मंगळेवढेकरांची लाज काढतात. आपण आपल्या थोबाडीत मारून घ्यावी, असा दिव्य अनुभव प्रत्येक वेळी येतो.

परवाच ३० एप्रिल २०२५ रोजी बिलोलीचे आमदार गंगाधर पटणे घरी आले होते. त्याचं वय ८५ वर्षे. ते मंगळवेढ्यात येण्याचं कारण म्हणजे गेली बावीस वर्षे अक्षयतृतीयेला, अर्थात महात्मा बसवेश्वरांच्या जयंती दिनी मंगळवेढ्याच्या भूमीचा स्पर्श अनुभवण्यासाठी आणि इथल्या सोहळ्यात सामील होण्यासाठी ते येतात. बसवेश्वर मंगळवेढ्यात २० वर्षे निवासास होते. त्यांच्या इथं राहण्यानं मंगळवेढ्याला अलौकिक महत्त्व प्राप्त झाले. म्हणून या वयातही मंगळवेढ्यात आल्याशिवाय राहत नाहीत. इथं फार काही व्हावं म्हणून मी आमदार असतानाही प्रयत्न केले. पण यश आलं नाही. अजून धडपड करतो आहेच.

मग मी म्हणालो, या महिन्यातच आमदार समाधान आवताडे आणि आमदार अभिजित पाटील यांनी लक्षवेधीमध्ये प्रश्न मांडलेत.

ते म्हणाले, असे प्रश्न आम्हीही खूप मांडलेत. पण काही ठोस होत नाही हो!

तेवढ्यात पटणे साहेबांचा ड्रायव्हार म्हणाला, हे राजकारणी काही करत नाहीत हो. म्हणूनच पटणे दादांनी बिलोलीतील २ कोटी रुपयांची गावभागातील जमीन अनुभव मंटपसाठी दिली आहे.

हे ऐकून मला आश्चर्य वाटले नाही. ज्याच्या हृदयात संत आहेत, त्याला आपल्या संपत्तीचे, समृद्धीचे काय करायचे हे नेमकेपणाने कळते. मंगळवेढ्यात असा एखादा संत कळणारा माणूस असता, तर किती बरं झालं असतं. पण बरं होण्यासाठी इथं कुणाला खरं काही करायचंच कुठं आहे? जिथं मंगळवेढे भूमी संतांची हा नगरपालिकेनं झगमगता बोर्ड लावलाय, दामाजी चौकात तिथं आता भेळचे गाडे लागलेत. गावाच्या मोठेपणापेक्षा इथं धंदा महत्त्वाचा वाटतो. त्यांचं कुणालाही काही वाटत नाही.

प्रत्येकाला आपला धंदा महत्त्वाचा वाटतो. आता इथं मोठे मोठे बिझनेस करणारे का कमी लोक आहेत. ते एखाद्या देवळाला लाखो रुपये देतील. दान पेटीत सोनं नाणं टाकतील, पण इथं मंगळवेढ्यात काही करायचं म्हटलं की दुर्गंधी पसरल्यासारखे तोंड करतात. नाही म्हणायला चोखामेळा ट्रस्ट कडून २००६ पासून स्मारकाची मागणी आहे आणि वारी परिवाराच्या तुटपुंज्या

बळावर पुण्यातिथी सोहळा साजरा होतो. डांगे परिवार आपल्या ताकदीने कान्होपात्रांची पुण्यतिथी साजरी करतात...

मग प्रश्न पडतो, मंगळवेढ्यात कुणी मोठे नेते, उद्योजक, मंत्री, महामंत्री, धनपती, लखपती आहेत की नाही? असतील ते काय करतायत. मी असं ऐकलंय की मंगळवेढ्याचे सध्याचे आमदार देशातले खूप मोठे उद्योजक आहेत. ते आता आमदारही झालेत. पण संतांच्या कार्यासाठी काही उभं राहून काही करावं असं का त्यांच्या डोक्यात येत नाही. रयत शिक्षण संस्थेत कमवा आणि शिका या योजनेत काम करून शिकलेले रामसेठ ठाकूर यांनी रयतसाठी ५० लाख रुपये दिले.

संतांच्या या भूमीत संतांच्या विचारांनी मनाची मशागत झालेले कुणीच का शिल्लक राहिले नाही. मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, आमदार भारत भालके, आमदार समाधान आवताडे हे लोकशाहीचे प्रतिनिधी म्हणून या गोष्टींकडे किती गांभीर्याने पाहतात किंवा यापूर्वी ज्या ज्या वेळी सत्तेत होते, तेव्हा त्यांनी गांभीर्याने पाहिले. जे आता सत्तेत नाहीत, त्यांच्यासाठी ही संधी कधीच गेली आहे. चुकलेल्या एस. टी. सारखी. जे आता सत्तेत आहेत, ते आमदार समाधान दादा आवताडे आमचे नेतृत्व करीत आहेत.

वाटतं, आपण कवी आहोत, संत कवी हे आपले कुणीतरी आहेतच की. त्यांच्या जिव्हाळ्यापोटी गळ्यात टाळ अडकवावेत आणि आमदारसाहेबांच्या दारात चार भजनकरी घेऊन 'अभंग आंदोलन' करावे. आमदार साहेबांना हे कळलं तर कळलं, नाही कळलं तर ते हाकलून देतील. पोलीस बोलावतील. कवीला छळलं नाही, असं कधी झालंच नाही. नामदेव-चोखोबांनाही छळलं, तुकोबांनाही मारलं. तिथं आपल्यासारख्या छटाकभर कवीला कुणी जाच केला तर काय बिघडणार आहे. पण संतकवींसाठी हे 'अभंग आदोलन' करावेच लागेल असे वाटते. कारण माझा चोखामेळा अजूनही ट्रॅफिक पोलिसासारखा चौकात उपेक्षित उभा आहे.


सत्ताधिशांना किंवा समाजसुधारकांना आता नाही कळले तर नंतर कळूनही काही उपयोग होणार नाही. उलट या संतांची कणव सत्ताधीश आमदार साहेबांना येत असेल, तर त्यांनीच स्वत: गळ्यात टाळ अडकवून महाआंदोलन उभे करावे, ज्यांनी जगाच्या कल्याणाचं गाणं गायलं, त्यांचं रडगाणं गायला आपण आता चौकातच उभं ठाकलं पाहिजे. या जाणिवा आपल्यापर्यंत येणार नसतील, तर आत्ताच्या काळ्या काळाचे दु:ख आपली पुढची पिढी बोटं मोड जगाला ओरडून सांगेल. बघा यांनी यांनी काहीच केलेलं नाही.

चोखोबांच्या समाधी उद्‌घाटनाला सहा दशके उलटून गेली. अजून काही दशके अशीच उलटत राहतील. आमच्या नैतिक जबाबदारीचं काही इथं उरणार आहे, की नाही. आपण काही करणार की नाही. आपण काही करणार नसू, तर वाटते, आपले अंथरून-पांघरुन घेऊन पंढरीला सुटावे आणि मंगळवेढ्याला शेवटचा राम राम ठोकावा. हे माझं गाव आहे, हे सांगायला आणि दाखवायला हल्ली खरंच लाज वाटत आहे. ती तरी बिचारी किती दिवस तग धरणार. आपण थोडेच महान आहोत, संतांसारखे.

**इंद्रजित घुले**
मो. ९४२३०६०११२

# संत नामदेव : चोखोबांचे गुरू

**डॉ. आ. ह. साळुंखे**
ज्येष्ठ विचारवंत, सातारा



महात्मा बसवण्णा आणि श्रीचक्रधरस्वामी यांच्यानंतरचे सर्वश्रेष्ठ समाजोद्धारक संत नामदेव होते, याविषयी माझ्या मनात तिळमात्र शंका नाही. समाजातील शोषित, पीडित-वंचित, दबलेल्या-दाबल्या गेलेल्या, सर्व प्रकारच्या संधींना मुकलेल्या दीनदुबळ्या लोकांना त्यांच्या अंत:करणातील मायेने आणि करुणेने चिंब भिजवून शीतल केले होते. अशा लोकांपैकी एक अस्पृश्य मनुष्य म्हणजे चोखोबा. चोखोबांना त्यांनी आपला शिष्य बनवले. त्यांनी त्यांची गुणवत्ता बहरून-मोहरून टाकली. तिला इतके फुलवले, की सातशे वर्षांनंतरदेखील तिचा सुगंध अजून मनामनात दरवळतो आहे!

प्रत्यक्ष भेट

**आज सोनियाचा दिवस धन्य झाला ।**
**प्रत्यक्ष भेटला नामदेव ।।**

अ-३१६, पृ. १७५

चोखोबांच्या आयुष्यातील हा प्रसंग रोमांचकारी आहे! संत नामदेवांबरोबर झालेली प्रत्यक्ष भेट हा त्यांच्या दृष्टीने अभूतपूर्व आणि असाधारण अनुभव होता. तो दिवस 'सोनियाचा' असे त्यांना वाटते. त्यांच्या प्रत्यक्ष भेटीमुळे आपला दिवस धन्य झाला, असे त्यांचे सहज उद्‌गार आहेत. त्यांचे मन विलक्षण आनंदाने ओतप्रोत भरले आहे आणि त्यांचा आनंद त्यांच्या शब्दाशब्दांतून ओसंडत आहे. त्यांचे मन मोहरून-बहरून आले आहे! आपल्याला एका महामानवाकडून प्रेमसुख मिळाले, हे सांगताना ते इतके हरखून गेले आहेत, की ते ''माझे मज दिले'' हे वाक्य तीनदा सलग उच्चारतात. त्यांच्या भेटीमुळे मला माझ्या अस्तित्वाचा अर्थ कळला, माझ्या जीवनाचे उद्दिष्ट कळले, त्यांनी जणू काही मला ''चोखा'' मिळवून दिला! आपला अनुभव व्यक्त करताना त्यांच्या प्रतिभेला कसे धुमारे फुटले आहेत, ते त्यांनी पुढील शब्दांत व्यक्त केले आहे, ''सुखाचे सुख मनीं कोंदाटले'', 'सुखाचे सुख'! काय शब्दलावण्य आहे - बहारदार ! या भेटीमुळे काय झाले ! तर देव माझ्या देहातच आहे, हे मला समजले. स्वत:ची ओळख पटली. स्वत्व कळले. मी कोण आहे, ते कळले. मन विशाल, व्यापक, उदार झाले, म्हणजे मी कोणी वेगळा आणि तू कोणी वेगळा, ही भेदभावाची, विषमतेची, दुराव्याची अनुभूती लुप्त झाली. नामदेव हे आपल्या 'जीवीचा विसावा' आहेत, हा अनुभव आला. इतके सगळे अनुभवल्यावर ते नामदेवांना पुकारत आहेत, त्यांचा धावा करत आहेत, त्यांचे शिष्य बनले आहेत. त्यांच्या अंधारलेल्या, काळवंडलेल्या जीवनात प्रकाशाचा स्वच्छ किरण शिरला आहे ! प्रत्यक्ष भेटीमुळे त्यांच्यामध्ये इतके आरपार स्थित्यंतर झाले आहे !

नामदेवांनी मस्तकावर हात ठेवला. चोखोबांची नामदेवांबरोबर प्रत्यक्ष भेट झाली. तिथेच त्यांच्या अंतर्यामीची स्वत:ला ओळखण्याची ज्योती उजळली होती. नंतर नामदेवांनी चोखोबांच्या मस्तकावर हात ठेवला, याचा या संदर्भातील सुस्पष्ट अर्थ म्हणजे त्यांनी चोखोबांना शिष्य म्हणून स्वीकारले. चोखोबा म्हणतात,

**ठेवुनी माथां हात । दिले माझे मज हित ।।**

पर्यायाने याचा दुसरा अर्थ म्हणजे चोखोबांनी नामदेवांना गुरू म्हणून स्वीकारले. ते त्याच अभंगात म्हणतात,

**दावियेले तारू । चोखा म्हणे माझे गुरू।।**

अ-३१५, पृ. १७५

नामदेवांनी आपल्याला तारू दाखवले, नौका दाखवली, असे ते सांगतात. भौतिक दुरवस्थेतून मानसिक दृष्ट्या बाहेर काढणारे 'तारू' ही नामदेवांनी दाखवले, जीवनाच्या उद्दिष्टाविषयीचे अज्ञान दूर करून जाण्याचे तारूही दाखवले आणि म्हणून ते 'माझे गुरु' आहेत, असे चोखोबाच सांगतात. त्यांच्याविषयी 'धन्य धन्य नामदेव ।...' असे म्हणतात. नामदेवांनी विठ्ठल हा तीन अक्षरी मंत्र आपल्याला दिला आणि निर्धारपूर्वक सत्याची खूण सांगितली, असेही ते म्हणतात. याचा अर्थ नामदेवांनीच चोखोबांना वारकरी संप्रदायात अंतर्भूत करून घेतले आणि विठ्ठलभक्तीचा मार्ग दाखवला.

**चोखा म्हणे धन्य नामया तू गुरु ।**
**फेडीला आधारू जीवित्वाचा ।।**

अ ३०४, पृ. १७३

### मनात शंकांची वावटळ

चोखोबा ज्या आत्यंतिक प्रतिकूल परिस्थितीतून जात होते, ती ध्यानात घेता त्यांच्या मनात प्रश्नांचे काहूर, शंकांची वावटळ उठत असेल आणि त्यांच्या मनाचा गोंधळ उडून जात असेल, असे नक्कीच म्हणता येते. अशा वेळी वाट पुसण्यासाठी गुरूकडे धाव घेणे, हे स्वाभाविक होते. त्यांनी आपल्या किंकर्तव्यमूढ मन:स्थितीचे वर्णन एका अभंगात केले आहे, ते म्हणतात : एखादे मोकाट, कसलेही बंधन नसलेले (जनावर) जसे दारोदार हिंडते, तसे माझ्या मनाचे झाले आहे. ते शुद्ध रहात नाही. यावर मी काय करू ? याच्यावरचे विंदान (कौशल्य, युक्ती) मला 'न कळे न कळे'. 'न कळे' अशी पुनरुक्ती ते करतात, यावरून ते किती असहाय झाले आहेत, ते स्पष्ट होते. मी भांबावलो आहे, खरोखर मला बोलवत नाही, अशी आपली अवस्था त्यांनी नामदेवांच्या पुढे व्यक्त केली आहे. बोलताना माझ्या एका शब्दाचा दुसऱ्या शब्दाला मेळ नाही, माझे बोलणे खुंटले आहे, माझ्या डोक्यात हा कसला विचार आहे, हे काही मला सुचत नाही, असे त्यांनी अगदी काकुळतीला येऊन म्हटले आहे.

डोक्यात भावनांचे आणि विचारांचे असे थैमान सुरू झाल्यामुळे त्याच्यावरचा उतारा मागायचा कुणाकडे? तर अर्थातच गुरूकडे! आणि मग ते नामदेवांना साकडे घालतात -

**चोखा म्हणे अहो नामया श्रीगुरु ।**
**कैसा हा प्रकारू सांगा मज ।।**

अ-३२५, पृ. १७७

### नामदेवांविषयी कृतज्ञता

चोखोबा नेहमी आपले मन नामदेवांजवळ मोकळे करत असत, असे दिसते. नामदेवांकडून आपल्याला जे काही प्राप्त झाले, त्याने आपण भरून पावलो, अशी कृतज्ञता त्यांनी व्यक्त केलेली दिसते. एका अभंगात ते म्हणतात :- तुम्ही मला भक्तिभाव दाखविला. त्यामुळे मला सुखाचा आनंदसोहळा प्राप्त झाला. ते प्रेम मला सांगता येत नाही. मला सुख आणि आनंद इतका प्राप्त झाला आहे , की त्यांच्यामुळे माझे मन काठोकाठ भरले आहे, माझ्या मनात सुखानंदाची दाटी झाली आहे. दृष्टीने विठ्ठलाचे रूप पाहताना मनामध्ये आनंद सामावत नाही. त्याविषयी मी काही बोलू शकत नाही, त्याचे वर्णन करू शकत नाही, मग मी काय करू ! हे नामया, तू माझा गुरू धन्य आहेस. माझ्या जीवनाचा आधार तू ऋणमुक्त केला आहेस -

**चोखा म्हणे धन्य नामया तू गुरु ।**
**फेडीला आधारू जीवित्वाचा ।।**

अ-३०४, पृ. १७३

### नामदेवांमुळे मनावर निर्बंध

एका भावपूर्ण अभंगात चोखोबांनी नामदेवांविषयी कमालीची कृतज्ञता व्यक्त केली आहे. माझे मन मोकाट होते. ते कावरेबावरे होऊन इकडे तिकडे हिंडत असे, सापडत नसे. म्हणजे त्याच्यावर नियंत्रण ठेवता येत नसे. परंतु त्याच्या पायांत बेडी घालण्याचे काम तू केलेस, आता कोणी काही अडचण निर्माण करू शकत नाही. आता निवांत रहावे, असा हा उपाय आहे. याच्या खेरीज दुसरा कोणता मार्ग नाही, दुसरी कोणती सोय नाही. हे नामदेवा तुम्ही जे शिकवले, तेच फळाला आले आहे. याचा अर्थ गुरू म्हणून तुम्ही मला जे शिकवले, त्यामुळे मी माझ्या स्वैराचारी मनावर निर्बंध घालू शकलो आहे, त्याला संयत केले आहे, त्याच्यावर कब्जा मिळवला आहे, त्याला ताब्यात ठेवले आहे.

नामदेवांविषयी ते म्हणतात,

**चोखा म्हणे तुम्ही जे शिकविले ।**
**तेचि फळा आले नामदेवा ।।**

अ-३०६, पृ. १७४

**विठ्ठल हा मंत्रांचा मंत्र**

एका अभंगात त्यांनी नामदेवांना नुसते गुरू न म्हणता 'गुरुराव' (गुरुराज) म्हटले आहे. त्यांच्या मनात नामदेवांविषयी पराकाष्ठेचा आदर होता, हेच या शब्दातून स्पष्ट होते. त्या अभंगात त्यांनी म्हटले आहे :- स्वतःच्या कल्याणासाठी नामदेवांनी मला जी खूण  सांगितली आहे, जे साधन सांगितले आहे, त्याखेरीज दुसरे कुठलेही साधन ' न करी न करी ' असे त्यांनी अगदी ठामपणे सांगितले आहे. त्यासाठीच त्यांनी त्या शब्दप्रयोगाची पुनरुक्ती केली आहे. संसारसागर तरून जाण्यास अवघड आहे, पण विठ्ठल हा त्यातून तारणारा आहे, हे निर्धारपूर्वक सांगता येते. विठ्ठल हा तीन अक्षरी मंत्र म्हणजे मंत्रांचाही मंत्र आहे, असे ते म्हणतात. आपल्याकडच्या वैदिक परंपरेमध्ये मंत्र हे देवांनाही बंधनकारक असतात असे  मानले जाते, पण येथे चोखोबा विठ्ठल हा मंत्रांचाही मंत्र आहे असे म्हणून या काव्यात्मक शब्दरचनेने विठ्ठलाचे माहात्म्य आपल्याला सांगत आहेत. अभंगाच्या अखेरीस चोखोबा गुरुराव नामदेव यांना धन्यवाद देतात. कारण, त्यांनी देव हा माझ्याच हृदयात असल्याची गोष्ट मला समजावून सांगितली आहे, असे नमूद करताना ते म्हणतात -

**चोखा म्हणे धन्य गुरुराव ।**
**दाखविला देव हृदयीं माझ्या ।।**

अ-३१७, पृ. १७५

**गुरुराया**

एका अभंगात चोखोबांनी नामदेवांचा उल्लेख ' गुरुराया' असा केला आहे. 'गुरुराव' आणि 'गुरुराया' हे एकाच अर्थाचे शब्द आहेत. त्या अभंगाचा आशय पुढीलप्रमाणे आहे :-अनुभवाचे सार सांगायचे, तर त्यांनी (संसारातील सर्व क्लेशकारक गोष्टींचा) विसर पाडला आहे. किंबहुना, संसारच देशोधडीला लावला आहे. याचा अर्थ भौतिक गोष्टींच्या मोहातून मी अलिप्त झालो आहे. हे गुरुराया, हे कसले लाघव (कौशल्य) प्रकट केले आहेस? मला माझे हित दाखवले आहेस-


**कैसे है लाघव गुरुराया केले ।**
**मज  दावियेले माझे हित ।।**

अ-३२१, पृ. १७६

ते पुढे म्हणतात मी खूप काळापासून चिंतेचे ओझे वहात होतो. ती चिंता तू आज दूर केली आहेस. अखेरीस ते अत्यंत कृतज्ञतेने म्हणतात- हे माय, मी जन्मोजन्मी नामयाचे (नामदेवांचे) पाय विसरणार नाही.

**वाटाड्या**

प्रभावी भाषेत आपल्याला अभिप्रेत असलेला आशय कसा मांडावा,  याचे उत्तम उदाहरण म्हणजे पुढील अभंग होय. या अभंगात चोखोबा यांनी 'अवघे' हा शब्द वारंवार वापरला असला, तरी तो पुनरुक्तीचा दोष ठरत नसून तो भाषेवरील प्रभुत्वाचा उत्कृष्ट आविष्कार ठरतो, असे मला वाटते. त्यांनी हा शब्द अथवा त्याचे एखादे रूप या अभंगात १४ वेळा वापरले आहे, हे आपण यापूर्वी पाहिले आहेच. 'मनामध्ये जो काही लोभ होता, त्यातील सर्व काही नामदेवांच्यामुळे माझ्यापर्यंत आले. सर्व काही माझ्यामध्ये संचित झाले. सर्व रूप प्राप्त




आपण या पाच जणांचे काय करायचे? त्यांनी शोषक व्यवस्थेविरुद्ध काही केले नाही, ही त्यांची मर्यादा मनात ठेवून आपण तिच्यावर बोट ठेवत राहायचे, त्यांना परके मानायचे, त्यांना दूर सारायचे, त्यांना विसरून जायचे, की त्यांना नाकारायचे? या प्रश्नांनी मनात थैमान घातल्यानंतर माझ्या मनात असाही विचार येतो- ते आपले शत्रू होते काय, किंवा आपल्या शत्रूंना सामील झाले होते काय? त्यांनी अहिताचे, अकल्याणाचे, विनाशाचे, विध्वंसाचे काही केले होते कय? मनातील गोंधळ शांत झाल्यावर माझे मन मला सांगते, की यांच्यापैकी कोणीही असे काहीही केले नव्हते. हजार मर्यादा असतील त्यांच्या- पण ते आपले हितचिंतकच होते, ते शोषक नव्हते, तर शोषित होते. मग आपण शोषकांच्या बाजूने उभे रहायचे, की शोषितांच्या? आणि मुख्य म्हणजे ते आपले होते, आपलेच होते! अशा स्थितीत त्यांच्या हजार मर्यादा मान्य करूनही आपण त्यांच्यापुढे लक्ष लक्ष वेळा नतमस्तक झाले पाहिजे, त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे, आपल्या काळजाचा एक छोटासा बिंदू तरी त्यांच्या अस्तित्वासाठी राखून ठेवला पाहिजे.

आ. ह. साळुंखे यांच्या पुस्तकाच्या पाठपृष्ठावरील मजकूर.

झाले. अवघे हा शब्द वापरूनच हे सर्व व्यक्त केल्यावर एक अतिशय मधुर रचना त्यांनी पुढीलप्रमाणे केली आहे.

**अवघे गोजिरे अवघे साजिरे ।**
**अवघ्या परिहारें अवघेचि,**

(परिहार=एखादी अनिष्ट गोष्ट दूर करणे).

आनंद पूर्ण आहे. बोलणे पूर्ण आहे.

**अवघे प्रकाशले अवघेपणे ।।**

अखेरीस ते म्हणतात,

**चोखा म्हणे अवघे नामया फावले ।**
**अवघेचि दाविले तेणें मज ।।**

अ-३०७, पृ. १७४

(फावणे=प्राप्त होणे, अनुभवाला येणे).

नामदेवांमुळे प्राप्त झालेल्या एका अपार -अथांग-अमोघ परिपूर्णतेचे-संपूर्णतेचे वर्णन चोखोबांनी या अभंगात केले आहे. हे सगळे आधी नामदेवांना प्राप्त झाले आणि मग त्यांनी मला ते दाखवले, असे म्हणून ते या 'वाटाड्या' गुरूविषयी कृतज्ञता व्यक्त करताना दिसत आहेत.

**अवघे हे नवल नामयाने दाविले ।**
**चोखिया लाधले जन्मोजन्मीं ।।**

अ-३३३, पृ.१७८

**उपकारकर्ता**

ज्याने कोणी आपल्यावर थोडा का होईना उपकार केला असेल, आपल्याला थोडी का होईना मदत केली असेल, आपल्याला अडचणीतून बाहेर काढण्यासाठी प्रसंगी हात दिला असेल, त्याच्याविषयी कृतज्ञता बाळगणे, हे माणसाच्या उच्च आणि उदात्त संस्कृतीचे लक्षण म्हटले पाहिजे. कोणा तिऱ्हाइताने असे केले, तरी आपण त्याची जाण ठेवली पाहिजे. येथे चोखोबांच्या बाबतीत तर साक्षात त्यांचे गुरू नामदेव यांनीच त्यांच्यावर उपकार केले आहेत. म्हणून चोखोबा त्यांना धन्यवाद देताना म्हणतात,

**धन्य धन्य नामदेवा ।**
**केला उपकार जीवा ।।**

अ-३०८, पृ. १७४

नामदेवांनी आपल्यावर कोणता उपकार केला, हे नोंदवताना ते सांगतात, की तुम्ही मला पंढरीराया दाखवला आणि माझ्या भीतीचे निरसन केले. मला सोपा मंत्र दिला आणि माझा भवताप निवारिला. तुम्ही माझी कृपेची माउली आहात आणि तुम्ही मला पान्हा घालत आहात. या गुरुशिष्य नात्याचे वर्णन करायला आपल्या भाषेत शब्द शोधणे सोपे नाही !

**चोखा म्हणे अवघा संदेह फिटला ।**
**उपकार हा केला नामयाने ।।**

अ-३१९, पृ. १७६

नामदेवांनी कसा उपकार केला आहे, ते चोखोबांनी आणखी एका अभंगात स्पष्ट केले आहे. ते म्हणतात :- माझे जे मन 'विषयाचे पोखें' (पोखें=पोषणामुळे ) गांजलेले होते, ते विषयापासून पारखे केले, ही तुझी कृपादृष्टी होय. काम आणि क्रोध यांना मी जीवे मारले आहे. दंभ आणि मान (गर्व) यांना देशोधडीला लावले आहे. आशा, ममता आणि चिंता यांना हाकलून दिले आहे. (हे सगळे घडल्यामुळे) मला आता संसाराचे भय राहिलेले नाही. माझ्या मनातील सर्व संदेह फिटला आहे. माझ्यावर हा उपकार नामदेवाने केला आहे.

**चोखा म्हणे अवघा संदेह फिटला ।**
**उपकार हा केला नामयाने ।।**

अ-३१९, पृ.१७६

**सुजाण**

चोखोबांनी नामदेवांचा निर्देश 'सुजाण' या अर्थपूर्ण शब्दाने करून एक फार मार्मिक अभंग लिहिला आहे. त्याचा सर्वसामान्य आशय पुढीलप्रमाणे आहे :- मी (केशवाची म्हणजेच विठ्ठलाची) जी कहाणी सांगत आहे, ती विपरीत असल्याचे जाणवले आणि त्यामुळे नवल वाटले, तरी सखोलपणे, गांभीर्याने पाहिले, तर तिच्यामुळे ज्ञान प्राप्त करण्याची दृष्टी लाभते. (किंवा ज्ञानदृष्टीने पाहिले असता, ती सखोल असल्याचे, गंभीर असल्याचे कळते). आपणाला जे सुख लाभले आहे, ते आपले आपण भोगावे, अनुभवावे. इतर वेडगळांना (अजाण लोकांना) काय सांगावे? (सांगून काय उपयोग?). ज्याच्या मनात सच्ची भावना नाही, त्याच्या दृष्टीने सगळी स्थाने ओसाडच होत (ओसाड जागी केलेली पेरणी जशी वाया जाते, तसेच त्यांना काही चांगले सांगितले, तरी ते व्यर्थ ठरते.) (म्हणून मी ठरवले आहे, की) हे नामदेवा, तू सुजाण आहेस. (त्यामुळे तू दाखवलेल्या मार्गाने जायचे ठरवून) मी केशवाला खुणा विचारत जायचे ठरवले आहे,

**चोखा म्हणे अहो नामया ।**
**सुजाणा केशवासी खुणा पुसो जावे ।।**

अ-३१२, पृ. १७५

नामदेवांचा निर्देश 'सुजाण' याच शब्दाने करून चोखोबांनी आणखी एक अतिसुंदर अभंग लिहिला आहे. जीवनाच्या प्रवासात अनेकदा काही बाबतीत, काही निर्णय घेताना आपला गोंधळ उडतो. काय करावे समजत नाही. कसे वागावे, कसे बोलावे, अशा साध्या साध्या गोष्टीतही आपल्याला प्रश्न पडतात. अशा वेळी आपण कोणाचा तरी चांगला सल्ला घेणे, एखाद्या जाणत्या व्यक्तीकडून मार्गदर्शन घेणे, हे उपयुक्त ठरते. चोखोबा या अवस्थेतून जात होते. त्यामुळे आपण आपले सुजाण गुरू नामदेव यांनाच सल्ला विचारावा, हे स्पष्ट करताना ते म्हणतात :- मी काय पाहू? कशाचे ध्यान करू? काय गाऊ? कुणासाठी गाऊ? कुठे जाऊ? कुठे राहू? कुठे पाहू? काय पाहू? कुठे सुख आहे? कुठे दुःख आहे? कुठे अवघे पाहणे दिसेल?

हे सुजाण नामया, तू (याविषयीच्या) खुणा ओळखून मला सांग -

**चोखा म्हणे नामया ।**
**सुजाणा वोळखोनी खुणा सांगे मज ।।**

अ-३१३, पृ. १७५

**उगाणा**

जीवनात आपल्याला जो अनुभव येतो, तो अस्सल असतो. इतरांना त्याचे महत्त्व काय कळणार, ही भावना व्यक्त करताना चोखोबांनी एक अतिशय भावसंपन्न अभंग लिहिला आहे:-

आपल्याला जे सकारण कर्तव्य वाटते, ते आपण करावे. दुसऱ्याला त्याची खूण, त्याचे महत्त्व, त्याची गरज कळणारच नाही. ज्याचा जो ठेवा असतो, जे गुपित असते, ते त्याचे त्यालाच ठाऊक असते. इतरांना त्याचा हेवा (इच्छा, ओढ, आसक्ती) मुळीच वाटणार नाही. ज्याची जी खूण असते, रहस्य असते, महत्त्वाची गोष्ट असते, ती त्याची त्यालाच ठाऊक असते. जीवनात त्याचे काय महत्त्व, हे दुसऱ्याला कळणार नाही. माझा नामदेव भला आहे, त्याने त्याच्या अनुभवाचा उगाणा मला दाखवला आहे -

**चोखा म्हणे माझा नामया तो भला ।**
**उगाणा दाविला अनुभवाचा ।।**

अ-३२४, पृ. १७७ (उगाणा=उपदेश, रुची.)

**माय माउली**

चोखोबांचे नामदेवांशी असलेले नाते त्यांच्या दृष्टीने नामदेव हे केवळ एक गुरू, एक उपकारकर्ता, एक वाटाड्या, एक सुजाण मार्गदर्शक, एवढ्यापुरते मर्यादित नव्हते. चोखोबांनी हे नाते त्यापेक्षाही किती तरी उच्च पातळीवर नेऊन ठेवले आहे. ते मायलेकरांच्या वात्सल्याचे नाते मानले आहे, अनुभवले आहे. ते या अभंगात म्हणतात :- विठ्ठलाचे माहात्म्य ब्रह्मादिकांनाही कळत नाही, हेच तर वैशिष्ट्य आहे. अशा स्थितीत सर्वसामान्य लोक ते जाणू शकत नाहीत. विठ्ठलाने असे जे चरित्र केले आहे, ते रात्रंदिवस सुखेनैव गावे. खरे तर कोणी भलत्या गोष्टींच्या भरीला पाडले, तर त्याला बळी पडू नये. मनापासून विठ्ठलाच्या नामस्मरणावर विश्वास ठेवावा. हे नामदेवा, तुम्ही माझी माय माउली आहात, माझ्यासाठी कृपेची साउली आहात -

**चोखा म्हणे तुम्ही माय हो माउली ।**
**कृपेची साउली नामदेवा ।।**

अ-३०५, पृ.१७३

**प्राण-**

मायलेकरांचे नाते अत्युच्च असते, यात काही शंका नाही. पण या इतक्या अत्युच्च नात्यालाही एक मर्यादा आहे. काही झाले, तरी माय आणि लेकरू हे नाळ कापल्यानंतर वेगवेगळे होतातच. ते एकरूप नसतात, द्विरूप असतात. अद्वैत नसतात, द्वैत असतात. त्यांच्यामध्ये कितीही माया असली, वात्सल्य असले, तरी एक अंतर निसर्गतःच राहते. म्हणूनच चोखोबांनी आपल्या नामदेवांबरोबरच्या नात्यातील ते द्विरूपत्व, ते द्वैत, ते अंतर दूर करून त्यांच्याशी एकरूपत्व, अद्वैत, निरंतरता अनुभवल्यामुळे त्यांना आपले प्राण मानले आहे. चोखोबा किती दुरवस्थेतून जात होते, ते तर अगदी स्पष्ट आहे. ते एका अभंगात म्हणतात :- मी कोणासाठी कोणाची संगत धरू ? ज्याची संगत धरावी, त्याच्याकडून दु:खाचीच मिठी पडते. म्हणून तर मी नामयाचे पाय धरले (त्यांचा आधार घेतला). मी हे जे काही केले, ते आठवल्यावर मला समाधान वाटते (नामदेवांचे पाय धरल्याचा कुठलाही पश्चात्ताप मला नाही). नामदेवांनी मला, माझ्या डोळ्यांना 'सुखाचे सुख' दाखवले आहे. ते सुख म्हणजे विटेवर उभा असलेला आणि आनंद देणारा सावळा विठ्ठल होय. नामदेव हा माझा प्राण असून मी त्याच्या समोर जीवें भावें लोटांगण घालीन, त्याला दंडवत घालीन-

**चोखा म्हणे माझा नामदेव प्राण ।**
**घालीन लोटांगण जीवें भावें ।।**

अ-३३५, पृ. १७८-१७९

या प्रकरणाचा समारोप करताना शं. दा. पेंडसे यांचे विचार नोंदवणे मला उचित वाटते.

डॉ. हेमंत विष्णू इनामदार यांच्या 'संत नामदेव' या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेत (पृ. १८) शं. दा. पेंडसे म्हणतात,

''सर्वं खल्विदं ब्रह्म। सर्वत्र सर्व देहांत एकच एक चैतन्य आहे, या ब्रह्मविद्येच्या आधारावरच 'ऊस डोंगा परि रस नव्हे डोंगा।' असे चोखोबा सर्वांना सांगू लागले आणि अंत्यजांच्या करुणास्पद स्थितीचे हृदय हलवून सोडणारे वर्णन करू लागले. ''अंत्यजांच्या पराकाष्ठेच्या हालअपेष्टा पाहून द्रवलेले, 'दयाक्षमाशांती'चे पुतळे नामदेव व्यथित झाले. त्यांनी रूढी झुगारून दिली, आणि चोखोबांच्या मस्तकावर हात ठेवून त्यांना नाममंत्र दिला. नामदेवांनी त्या महान भगवद्भक्त अंत्यजाच्या अस्थी पंढरपूरला आणल्या. प्रत्यक्ष पांडुरंगाने त्या आपल्या रूढिप्रिय समाजाच्या,

अंत्यजाविषयीच्या माणुसकीला सोडून असणाऱ्या कठोर वागणुकीवर महाराष्ट्रात हा पहिला प्रहार झाला असला पाहिजे. त्यामुळे नामदेवांना कदाचित बहिष्कृतही व्हावे लागले असेल. ते नेहमी महाद्वारात उभे असत, असे उल्लेख म्हणूनच येतात. ते स्वत:च अस्पृश्य आहेत हा प्रवाद त्यामुळेच कोणी तरी उठविला असावा. सहा शतकांपूर्वी हे कार्य करणारे नामदेव केवढे सदय आणि 'समाजमनस्क' असले पाहिजेत हे वेगळे सांगावयास नको. दुर्दैवाने आम्ही अशा सत्पुरुषांची 'संताळे' म्हणून हेटाळणी केली. त्यांच्या उपदेशाप्रमाणे आम्ही वागलो नाही.''

***

डॉ. आ.ह. साळुंखे यांच्या नवीन प्रकाशित होणाऱ्या 'चोखिया : चोखियाचे अवघे कुटुंब संत' सदर पुस्तकातील संत नामदेव महाराज आणि संत चोखामेळा या गुरू शिष्य नात्याचे, संतांच्या परस्पर संबंधाचे विश्लेषण करणारा अंश इथे प्रकाशित करण्यात येत आहे. सदर पुस्तक ३० मे २०२५ रोजी प्रसिद्ध होणार असून सदर पुस्तकाच्या मुद्रित प्रतीसाठी खालील पत्त्यावर अथवा क्रमांकावर संपर्क साधावा.


चोखिया : चोखियाचे अवघे कुटुंब संत
डॉ. आ. साळुंखे
लोकायत प्रकाशन : सातारा
प्रकाशक : राकेश आण्णासाहेब साळुंखे,
१३, लोकायत, गेंडामाळ, यशवंतनगर,
सातारा ४१५ ००२.

संपर्क : ८४८४९७७८९९
Email : lokayatprakashan@yahoo.com
Website : www.lokayatprakashan.co.in
मुखपृष्ठ : पुलकेशी साळुंखे
पृष्ठे : २५६
मूल्य : ३८०



# संत चोखामेळा यांच्याशी संवाद

डॉ. निर्मलकुमार फडकुले



हे संत चोखोबा तुझ्यासारख्या अनन्य विठ्ठल भक्त कवीच्या लक्तर झालेल्या आयुष्याचा विचार माझ्या मनात येतो आणि मी अत्यंत विसन्न होतो. अन्याय समाज व्यवस्थेने तुझा आणि तुझ्या कुटुंबाचा बळी घेतला. तुझ्यासारख्या असंख्य चोखोबांना शतकानूशतके

उद्ध्वस्त व्हावं लागलं. तुझं सारं जीवन ज्या विठ्ठलाची भक्ती करण्यात गेलं, तो विठ्ठल तुला कधी दर्शन देऊ शकला का? हा प्रश्न विचारण्याचं कारण असं की शूद्रांना मंदिरात प्रवेश नव्हता. जो देव पतितांना पावन करू शकतो, त्याच्या दर्शनाने देवच विटाळतो, अशी दृढ समजूत शेकडो वर्षे लोकमानसात रुजलेली होती.

ही विचारसरणी काही धर्ममार्तंडांनी कुठल्या तरी शास्त्राचा आधार सांगून समाजात रुजवली होती. धर्म आणि ईश्वर याच्या नावाखाली शूद्र समजल्या जाणाऱ्या माणसांना आपल्याच देशात आपल्याच समाजात अस्पृश्य मानून त्यांना माणूसकीच्या साध्या अधिकारापासून वंचित करण्यात आलं. गावकुसाबाहेर एखाद्या कंगाल झोपडीत त्यांनी राहावं, काबाडकष्ट व सोबत उपहास आणि दुष्ट लोकांच्या तुच्छ सहानुभूतीवर कसं बसं जगावं ही रूढी कित्येक शतक पडलेली. तुझ्यासारख्या पृष्ठ भक्तालाही कधी विठोबाचे दर्शन घडलं नाही; पण तू मात्र रात्रंदिवस त्याच्या भक्तीची कविता गात राहिलास. त्याचीच जन्मभर आराधना करीत राहिलास.

मनात भक्ती नसलेल्या एखादा भक्त दुष्ट मनुष्य सुद्धा आपल्या उच्च जातीमुळे आणि वर्णामुळे मंदिरात राजरोसपणे जाऊ शकत होता; पण तू मात्र ही नियती मूळ मंदिरापासून दूर उभे राहून केवळ शिखराचंच दर्शन घेऊ शकत होतास. तिथे देखील तुझ्या जातीचा उद्धार करून आणि शिव्या देऊन तुला दूर उभं राहायला सांगितलं जायचं. विठोबाचे आणि तुझी आयुष्यात कधीही डोळा भेट झाली नाही. खरोखरच त्या करुणानिधी परमेश्वरानं तुझ्या फाटक्या पदरात काय टाकलं? लोकांची शिव्या शाप नियमितपणाने सहन करीत तू कसाबसा जगलास आणि एके दिवशी गावकूस बांधत असताना भिंत कोसळून त्याच्या खाली मरून गेलास. जगतानाही सुखाचे क्षण लाभले नाहीत आणि मारतानाही समाधानाचा सुस्कारा सोडता आला नाही. पण हे भक्त श्रेष्ठा! मरताना देखील तुझ्या ओठांवर त्या विठ्ठलाचे नाव होतं. मनात त्या विठ्ठलाचं चिंतन आणि भजन होतं. तुझं सगळं जीवनच विठ्ठलाच्या विचारांना नाम संकीर्तनाने व्यापलेलं होतं. इतकी आर्त आणि उत्कट भक्ती करणारा भक्त विठ्ठलाला युगायुगात आधी लाभला नसेल.

हे संत शिरोमणी चोखोबा, तू दरिद्री झोपडीत फाटक्या तुटक्या कपड्यात वावरणारा एक सामान्य कष्टकरी होतास; पण एका बाबतीत मात्र तो श्रीमंताहून श्रीमंत होतास. तुझ्यापाशी कवीची प्रतिभा होती. पांडुरंगाची भक्ती होती, भक्तीने भरून आलेल्या तुझ्या साध्या; पण संपन्न शब्दातून मराठी काव्याला तू वैभव दिलंस. तुझी वाणी ही रत्नाची खाणी आहे. तुझ्या अभंगवाणीत भक्तीचे रंग, गंध, रस फुललेले आहेत. आपल्या भावबळावर तू पंडितांच्या पांडित्याला सहज जिंकलस. तुझ्या काळात म्हणजे सातशे वर्षांपूर्वी पंढरीत आणि महाराष्ट्रात अनेक शास्त्री पंडित होते. त्यांना मानाच्या शाल जोड्या मिळत होत्या, पोथ्या पुराणातल्या शब्दांवरून हे पंडित गावोगावी प्रवचन करीत असत. मानसन्मान मिळावीत असत. आज त्यांचं नावही आम्हाला माहीत नाही. त्यांची प्रवचने वाहून गेली, त्यांचं पांडित्य चंद्रभागेत बुडालं. ते दशक्रांती विद्वान आत्ता कोणाच्याही स्मरणात नाहीत. पण हे संत कवी चोखोबा सातशे वर्षानंतरही देखील तुझी कविता महाराष्ट्र सारस्वतांनी जपून ठेवली आहे.

चोखामेळा आणि त्यांची भाव समृद्ध अभंग वाणी ही मराठी भाषेची व साहित्याची अविनाशी संपत्ती आहे. चोखामेळा हे नाव साहित्य रसिकांच्या मनावर कोरलं गेलं आहे. चंद्रभागेचे पुष्कळ पाणी सात शतकात

वाहून गेलं; पण चोखोबा तुझी रसवंती मात्र अभंग आहे. चंद्रभागेच्या पाण्यावर अजूनही चोखामेळ्याची कविता तरंगत आहे. झोपडीत जन्माला आलेली तुझी भाव कविता वाचून अनेक समीक्षांनी तिच्यावर प्रबंध लिहिले. तुला फार तर लिहिण्या वाचण्याचं जुजबी ज्ञान असेल; पण तुझ्या वाणीवर विद्यापीठात परिसंवाद होतात. पुस्तके लिहिली जातात, तुझ्या व्यक्तित्वाची चर्चा चिकित्सा होत राहते. या अर्थानं तू मराठी साहित्यातला एक श्रीमान भक्त कवी आहेस, असं म्हणायला हरकत नाही.

हे विठ्ठल भक्त कवीश्वरा! तुझी कविता तुझ्यात दुःखाश्रूंनी चिंब भिजलेली आहे. पण तू तरी काय करणार, तुझं दुःख समजू शकणारी माणसं त्या काळात फार थोडी होती. पण ती देखील सनातन वर्णव्यवस्थेपुढं हतबल झालेली होती. समाज रचना बदलण्याची शक्ती त्यांच्यात नव्हती. त्यांनी केवळ भक्तीच्या क्षेत्रात माणूस श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसतो, तो केवळ भक्त असतो आणि परमेश्वर भक्तीलाच प्रमाण मानतो. जात किंवा वर्ण या दोन गोष्टींना त्याच्याजवळ स्थान नसतं. अशी घोषणा केली. पण भक्ताला देखील जातीच्या चौकटीत समाज बंदिस्त करीत राहिला. जर सारे भक्त समान आहेत तर मग तुला विठ्ठल मंदिरात का जाता आलं नाही? पण नामदेवांच्या कीर्तनात आणि वारकऱ्यांच्या भजनात तुला स्थान मिळालं असं इतिहास सांगतो. तरीही चोखामेळा म्हणजे अस्पृश्य आणि त्यांचं स्थान सर्वात कनिष्ठ, हे समीकरण कायम राहिलं. आमच्या धर्मशास्त्रांना आणि परंपरेनं माणसं जोडण्या ऐवजी ती एकमेकापासून तोडण्याचं काम मात्र निष्ठेनं केलं. माणूस म्हणजे माणूस हा विचार आमच्या समाजशास्त्रांना कधीच स्वीकारला नाही. त्यामुळेच लक्षावधी किंवा कोट्यावधी माणसं परस्परांपासून तुटली.

गावकुसाबाहेरच्या स्नेहशून्य जगात तुझ्यासारख्या असंख्य लोकांना फेकून देण्यात आलं. ही कधीही बरी न होणारी आणि रात्रंदिवस ठणकत राहणारी सामाजिक जखम तुला आणि तुझ्या सर्व कुटुंबाला सहन करावी लागली. या वेदनेची कहाणी म्हणजे तुझी कविता आहे. ती वाचताना कधी कधी मला तुझ्या सहनशीलतेचा संताप येतो. असं वाटतं की तुझ्यासारख्या प्रतिभावंतांना समाज आणि धर्म यातल्या विषमतेवर आपल्या शब्दाने कोरडे ओढायला पाहिजे होते. कवितेच्या मशालीने सामाजिक विषमतेच्या आचार विचाराला बंडखोरांना आग लावायला पाहिजे होती. दांभिक धर्म मार्तंडांचे वाभाडे काढायला पाहिजे होते; पण तू अश्रू गाळलेस. 'करुणा भाकी चोखामेळा' असं म्हणून सनातन रूढीसमोर मान वाकवलीस. खरंतर दाहक आणि विदारक शब्दांच्या शस्त्राने अन्याय परंपरेला तू छिन्नभिन्न करायला हवं होतंस. ते घडलं नाही याबद्दल तुला तरी आम्ही कसा दोष द्यावा. कारण ते सातशे वर्षांपूर्वीचं जुना पुराणं हे जग होतं. त्या जगात जुनाट ग्रंथाच्या पानांना महत्त्व होतं. जिवंत माणसांच्या मनाला काहीच किंमत नव्हती. ज्ञानेश्वराला देखील सनातन लोकांचा छळ सहन करावा लागला. समाजातल्या सर्वात खालच्या पायरीवर उभ्या असलेल्या तुझ्यासारख्या भक्ताला देव देखील न्याय देऊ शकला नाही. पण त्या सर्व प्रतिकूल परिस्थितीत तुझ्या कवितेने भक्तीचा जो जयघोष केला तो मराठी काव्यात अमर झाला आहे. विठ्ठल भक्तीची जितकी सच्ची हृदयस्पर्शी कविता तेराव्या शतकात केवळ तुझी आहे. असं म्हणण्यात अतिशयोक्ती नाही. मध्ययुगीन मराठी कवींच्या मालिकेत तुझं स्थान उच्च प्रतीचं आहे. तूच एका अभंगात म्हटलं आहेस,

**ऊस डोंगा परी रस नोव्हे डोंगा ।**<br>**काय भुललासी वरलीया रंगा ।।**

खरं तर ऊस ही डोंगा नाही आणि त्याचा

रस तर अत्यंत मधुर आहे. कवितेचे शास्त्र तू कधी अभ्यास केलं नव्हतं. शास्त्र अभ्यास करण्या इतकी तुझ्यापाशी पुस्तकी विद्या नव्हती. तू घाम गाळणारा आणि पडेल ते काम करणारा खालच्या वर्गातला एक कष्टकरी होतास. म्हणूनच तुझ्या कवितेला तुझ्या घामाचा आणि अश्रूंचा वास येतो. जे साहित्य माणसाच्या सुखदुःखाशी निगडित असतं तेच साहित्य कोणत्याही काळात माणसांच्या काळजाला भिडू शकतं. तुझे शब्द म्हणजे तुझी वेदना आणि तुझं समग्र आयुष्य आहे. तुझी अश्रूंनी भिजलेली कविता ही रसात्मक कवितेचं अंग प्रत्यंग दाखवणारी प्रामाणिक कविता आहे. आयुष्यभर सर्व प्रकारचा छळ सहन करूनही तुझी विठ्ठलावरची निष्ठा मात्र ढळली नाही. विठ्ठल भक्ती हेच तुझ्या जीवनाचं सारस्वत होतं. मुखातलं विठ्ठलाचं नाम आत तुला जगवणारा प्राणवायू होता. तुझ्या संगतीने आणि संस्काराने तुझ्या कुटुंबातले सारेच कवी झाले. विठ्ठलाच्या उपासनेत साऱ्यांनी आपलं जीवन वेचलं.

चोख या शब्दाचा अर्थ शुद्ध स्वच्छ असा होतो. तुझं मन आणि संपूर्ण जगणं हा शुद्धतेचा चोखपणाचा एक उच्च आदर्श आहे. त्यामुळे तुझी कविता वाचताना तुझ्या शुद्ध मनाची अनेक प्रतिबिंबं पाहायला मिळतात. मनातली निष्फळता, उपेक्षितपणाची खंत, दुःख, भग्नवृत्तीचे गडद रंग डोळ्यातून ओघळणाऱ्या अश्रूंचा खारट वास आणि तरीही हृदयातल्या पांडुरंगा विषयीचा अतूट उत्कट सद्भाव आणि त्यातून मिळणारं समाधान हे सर्व भाव तुझ्या रम्य कवितेत आलेला आहे. आम्हा वाचकांना तुझी करुण पण भक्तीनं फुललेली मुद्रा तुझ्या काव्यातून दिसते. तुझ्या आयुष्याची प्रत्येक पाकळी आणि तिचा वेदनायुक्त गंध त्यांचा अनुभव तुझ्या कवितेतून मिळतो. महाराष्ट्राच्या सामाजिक विषमतेचं इतिहासाचं चित्र म्हणजे तुझी कविता आहे. तुझ्या कवितेत बंडखोरी नाही, असं मी म्हणालो असलो तरी एका अभंगातून तू कुळवर्णाच्या अहंकारानं फुगलेल्या दांभिक परंपरावाद्यांना कठोर शब्दातून फटकारले आहेस. तो अभंग वाचताना मला तुझ्यातला आवेश, तुझ्या दृष्टीतली धग आणि शब्दातली रग जाणवते. संत तुकोबांच्या वाणीतला अंगार जणू तुझ्या मुखातून तुकोबांच्या पूर्वीच बाहेर पडला आहे.

तू मेणाहून मऊ असा विष्णुदास आहेस. पण वज्रालाही भेदणारी वाणी तुझ्या मुखातून बाहेर पडली. याचा मला आनंद वाटतो. तुझी कविता ७०० वर्षांपूर्वी निर्माण झाली. तू वैकुंठासी झालास; पण तुझं काव्य विठ्ठल भक्तीची पताका उंच गगनात आजही फडकवीत आहे. तुला मंदिरात प्रवेश नव्हता, पण आज विठ्ठल मंदिराचे दार सर्वांना खुले आहे. संत चोखोबा तुझ्यातच विठ्ठल सामावला आहे. तू होतास तेव्हाही मंदिरात विठ्ठल नव्हता. तो गावकुसा बाहेरच्या तुझ्या झोपडीत वस्तीला होता. आता आधुनिक काळाची तुझी कविता साहित्याच्या दृष्टीने श्रेष्ठ कविता गणली जाते. तुझ्या नावा सारखीच ती चोख आहे. झोपडीत आश्रयाला आलेली ही कविता साहित्य शारदेच्या दरबारात उच्च स्थान मिळवून बसली आहे. तुझ्या संतत्वाला आणि कवित्वाला मी वंदन करतो.

# देहिचा विटाळ देहीच जन्मला

**इंदुमती जोंधळे**
ज्येष्ठ लेखिका, पुणे

संत कवयित्रीच्या विश्वविचाराचा जेव्हा केव्हा विचार मनात येतो, तेव्हा मानवतेचे मंदिर श्रद्धेच्या विटेने आपोआप बांधले जाते. कोणी कितीही वंचना केली तरी ही वीट ढळत नाही. मला प्रश्न पडतो यांचे विद्यापीठ नक्की कोणते? यांचे ग्रंथ कोणते आणि शिकविणारे शिक्षक कोण? यापैकी त्यांच्याकडे कोणताही वारसा दिसत नाही. झाली ती निंदा, उपेक्षा अवहेलना आणि पदोपदी अपमान. माणसाचं बोलणं आणि वागणं याचा विचार केला, तर कोणी कोणासाठी काय शिजवले', या प्रश्नाला उत्तर मिळत नाही. अनेकदा अनेकवेळा संत सोयराबाई या कवयित्रीबद्दल



अचंबित व्हायला होते. तिच्या चमत्कारिक जन्मसिद्धतेचा, वैचारिक कर्मसिद्धांतातील ओलावा कोणत्या द्रव्यात बुडून आला, हे अद्याप तरी आपल्याला सिद्ध करता आलेले नाही.

मोजक्या अभंगातून संत तत्त्व आणि सत्य समजावून सांगणारी सोयरा हिला, 'तुही यत्ता कंची?' असे विचारण्याचे धाडस कोणत्याही विद्वानाला, अभ्यासकाला झाले नाही; कारण डांगोरा पिटवून विचाराची खोली वाढत नसते किंवा आपण जन्मजात विद्वान आहोत हे समाजात समजण्यासाठी इतरांची शिक्षण द्वारे जेव्हा बंद केली जातात, तेव्हा संतांची फळे निसर्गच आपल्याला देत असतो. कारण त्याला 'परिवर्तन' हवे असते. कुणी कितीही प्रतिभा दाबून ठेवली तरी संत सोयराबाई, मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई यांचे व्यक्त होणे थांबत नसते. 'अनुभवता सारे, पिऊनिया वारे, कृती आपुले संत निरीक्षणे.'

माणूस नेहमीच उलट्या विचाराने चालत असतो. खरे म्हणजे संतांनी अभंगाच्या माध्यमातून दिलेली शिकवण मंदिराभोवती फिरत नसते, तर फिरते ती मंदिर अभंगाभोवती. हा निष्कर्ष ज्ञानदीपासारखा असूनही तो दडपून कोणी टाकला, हे आपणाला समजूनही आपण कधीही तमाच्या तळाशी दिवा लावण्याचा प्रयत्न केला नाही. कारण आपल्याला क्षणिक आनंद हवा असतो. परंतु कायम आनंद मार्गासाठी प्रयत्न होताना दिसत नाही. हाल अपेष्टेशिवाय जगणेच नसते यावर आपली नितांत श्रद्धा आहे. समाजातील अर्धवट ज्ञानी वर्गाने वर्गाने ही श्रध्दा ओळखावी आणि आपल्यावर (भक्तांवर) पांघरूण टाकून थोपटायला सुरुवात केली. आपणही झोपी गेलो आणि ठेविले अनंते तैसेचि राहावे हा मंत्र आज बळावत गेला. पण यातील मूळ विचाराची गाठ ठणकायला लागल्यावर संतांनी ती मोकळी केली.

तत्कालीन परिस्थितीत हे अभंग विश्व कळू लागल्यानंतर, समाज वैचारिक दृष्ट्या प्रगल्भ होऊ नये म्हणून, नको त्याची याचना अविवेकी पद्धतीने निर्माण करण्यासाठी अभंगातील मूळ भाव कसा विसरला जाईल, यासाठी विविध मार्ग आखले गेले, हे लक्षात आल्यानंतर संत सोयराबाई म्हणतात.

**'अवघा रंग एक झाला ।**
**रंगी रंगला श्रीरंग ।।**
**मी त ूपण गेले वाया ।**
**पाहता पंढरीच्या राया ।।**

भीमेच्या तीरावर जमलेला पांडूरंग भक्त मेळ्याला कोणताही रंग नसतो. प्रत्येकजण एकमेकांत इतका मिसळून गेलेला असतो, की विसरून जाणे हाच एक प्रत्येकासाठी आनंद असतो. मानवी जीवनाचं केवढं मोठं सत्य या निरक्षर संत बाईने जगासमोर मांडले आहे. माणूस इथून तिथून एक आहे. जो निरपेक्ष बुद्धिने अतिशय सर्वशक्तिमानाला शरण जातो, 'मी'पणाचा अहंकार गळून पडलेला असतो. मग देहू असो वा आळंदी किंवा पंढरपूर. हरि कीर्तन हे मानवतेची शाळा असते. आणि माणसा-माणसातील भाव हा डोळ्याचा एकत्र रंग असतो. तिथं शिवा शिवीचा तर प्रश्नच नसतो. या संत सोयराबाईंच्या अभंगातून जे आपणाला कळलेले आहे. ते आपण मनात साठवून ठेवले आहे का? या प्रश्नाला नाही असे उत्तर देणे क्रमप्राप्त आहे.

आजचे नेमके चित्र काय आहे? अगदी चिंतनाचा एक भाग म्हणून विचार केला तरी, ध्यानात काय येते? जातवार कीर्तने, भजने धर्माच्या पताकाला राजकीय किनार आणि त्यानुसार आत्मोन्नतीचा मार्ग स्वीकारणे. आज जाती पातीच्या विचाराशिवाय श्रद्धास्थानाचे अधिष्ठान राहिले नाही. कारण राजकीय स्वार्थासाठी ज्ञानपीठाची निर्मिती आणि त्यातच ज्ञानाचे समाधान.

सोयराबाईचा जीवनसाथी चोखोबा स्पष्ट भूमिका मांडतो-

**भाव तेथे भक्ती, भक्ती तेथे ज्ञान ।**
**ज्याने समाधान होय चित्ता ।।**
**अशुद्ध तो भाव करी घात सर्व ।।**
**अंगी वसे गर्व तयाचिया ।।**

या अभंगातील सूक्ष्म भाव रचनेचा जरी विचार केला तरी यातील नेमके काय उरले? काय धरले? आणि काय सोडले? याचा विचार केला तर आपल्या पदरी निराशाच येते. कारण संतांनी जे सांगितले कीर्तनातून ते न सांगता, श्रद्धा अंतरंग भरकटत दिशाभूल करण्याची परंपरा आजच्या नव्या परंपरेने सुरू केली आहे. याकडेही ही संत परंपरा आपले लक्ष वेधू इच्छिते. तत्कालीन जीवनाचा सार समजून घेतला तरी बिघडत जाणारे मानव्य चांगल्या पदपथावर येईल. फक्त विठ्ठलभक्तीचा रंग जरी आपल्याला कळू आला, तरी आपल्यावर पश्चातापाची किंवा मुळूमुळू रडण्याची वेळ येणार नाही.

आपले मूळ रूप, नको त्या भावभावनेत तल्लीन होण्याचे नाही. त्याच्या वाटेला आलेले जगणे हे एकसुरी कधीच नसते. परंतु ते एकसुरी होण्यासाठी मधल्या काळात जी कटकारस्थानं झाली तीच संत जनाबाई, संत कान्होपात्रा यांच्या विचारावर येऊन धडकली. हे धडकणे आपल्याच मुळावर आलेले आहे. म्हणून सोयराबाईंचे, बहिणाबाईंचे अभंग काळजातील जमीन नांगरून पेरले जावेत. भागवत धर्माची शिकवण तिला कळली होती. देव आणि भक्त यांच्या मिलनात सोवळे ओवळेपण नाही. या जगात भेदाभेद आहे. पण या जगापलीकडे जीव शिव यात स्पर्शास्पर्श नाही, ही तिची श्रद्धा आहे. म्हणून ती पुढील अभंगात म्हणते -

**देहाशी विटाळ म्हणती सकळ ।**
**आत्मा तो शुद्ध बुद्ध ।।**
**देहीचा विटाळ देहचि जन्मला ।**
**सोवळा तो झाला कवण धर्म ।।**
**विटाळा वाचोनि उत्पतीचे स्थान ।**
**कोणी देह निर्माण नाही जगी ।।**
**म्हणुनि पांडुरंगा वानितसे थोरी ।**
**विटाळ देहांतरी वसतसे ।।**
**देहीचा विटाळ देहीच निर्धारी ।**
**म्हणे महारी चोखियाची ।।**

अध्यात्मिक दृष्टीमुळे तिने आपल्या हीनत्वावर मात केली आणि स्वत:चा उद्धार करून घेतला. आपल्या पतीलाच चोखोबाला गुरू मानले, त्यांचा अनुभव घेऊन पती पत्नी वा पारंपारिक नात्याचे उन्नयन झाले. गुरू शिष्याचा या नात्यामधून ईश्वराशी संधान बांधले. कौटुंबिक आणि सामाजिक नात्यांना पार करणारे, मानवी नात्यापलीकडचे असे अलौकिक नात्यातून आपली संसार मुक्ती साधली. तशीच स्त्री मुक्तीही साधली. त्यांची कविता/अभंग स्त्रीमुक्तीचे गीत झाली. तत्त्वचिंतन आणि भक्तिभाव हा त्यांच्या कवितेचा गाभा आहे.

**पंच ही भुते, अवघा त्यांचा खेळ ।**
**आत्मा तो निर्मळ शुद्ध आहे. ।।**

असं त्या सांगतात. सोयराबाई विठ्ठलालाच मायबाप मानतात. कारण सामाजिक अपमान आणि अवहेलना याची शिकार झालेल्या या संतकवयित्रीला विठ्ठल हाच एकमेव आधार वाटतो.

तेराव्या शतकातील सामाजिक-सांस्कृतिक परिस्थितीने म्हणजे वर्णव्यवस्थेने शुद्रातिशुद्रांता पशू पेक्षाही हीन लेखून अतिशय तुच्छतेने वागणूक देणे त्यावेळचा वैदिक धर्म स्वत:ला सर्वश्रेष्ठ मानून शुद्रावर अनंत अत्याचार करत असताना या संत मंडळींनी विठ्ठलाचा आधार घेतला. त्यात संत नामदेव, चोखोबा, नरहरी सोनार, सावता माळी, संत जनाबाई, मुक्ताई, कान्होपात्रा, सोयराबाई, निर्मळा, बहिणाबाई या सर्वांनी स्वत:चा निर्मळ भक्तीमार्गाने उद्धार



करून घेतला. स्वत:च्या प्रज्ञेने लोककल्याणाचा विचार मांडला. समतेच्या स्वातंत्र्याच्या युद्धाचे हे सर्व बंडखोर नायक-नायिका असल्या तरी त्यांच्यातील सुसंस्कृतपणा जराही दबला नाही, तोच त्यांच्या अभंगातून आपणाला लक्षात येतो. त्यांच्या अभंगातील शब्दांना संयम असला, तरी तीक्ष्ण धार आहे. म्हणून वैदिक गुलामगिरी नाकारून बहुजनांच्या स्वातंत्र्याचं, जगण्याचं मूळ त्या शब्दात आहे. जीवघेण्या संघर्षातही आपला सुसंस्कृतपणा न सोडता बहुजनांची ह्रदये स्वच्छ, निर्मळ राहिली व पाठीचा कणा ताठ राहिला. तो केवळ विठ्ठल भक्तीचा आधार होता म्हणूनच. ना त्यांना सांस्कृतिक, वैचारिक परंपरा होती, ना ज्ञानाचा कोणता मार्ग?

संत निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई यांना त्यांच्या संतश्रेष्ठ वाड्मयाला जैविक परंपरेचा आधार होता. त्यांच्या डीएनएमधूनच संस्काराचे, श्रेष्ठत्वाचे गुण त्या वेळच्या समाजापुढे प्रसंगानुरूप उद्धृत झाले. ती चारही भावंडे श्रेष्ठपदास पोहोचली... पण... हे शुद्रा-शुद्र म्हणून हिणवले गेलेले सारे संत... आणि विशेषत: संत चोखोबा, सोयराबाई तिचा मुलगा कर्ममेळा, चोखोबांची बहीण निर्मळा, मेव्हणा बंका या प्रत्येकाच्या नाववर अभंग रचना आहेत. हे सर्वजण चोखोबांना गुरूस्थानी मानीत.

बंका महाराज म्हणतात,

**चोखा चोखट निर्मळ ।**
**तया अंगी नाही मळ ।।**
**चोखा सुखाचा सागर ।**
**चोखा भक्तीचा आगर ।।**
**चोखा प्रेमाची माउली ।**
**चोखा कृपेची साउली ।।**
**चोखा मनाचे मोहन ।**
**बंका घाली लोटांगण ।।**

अशा भावपूर्ण शब्दात चोखोबांची थोरवी वर्णिली.

तसेच आपल्या पत्नीविषयी ते म्हणतात-

**लागते निर्मळा, निर्मळेची तीरी ।**
**वाचे निरंतर नामघोष ।।**
**चोखा तैसी बहीण बहीण तैसा चोखा ।**
**सदा नाम मुखा विठोबाचे।।**

अशी बहीण-भावाची थोरवी संत बंका महाराज सांगतात.

**निर्मळा आपल्या अभंगाचा शेवट**
**बहीण चोखियाची ।**
**तर चोखियाची महारी ।**

सोयराबाई करते. तर कर्ममेळा स्वत:चा उल्लेख चोखियाचा कर्ममेळा । असा करतात. या सर्वांनीच आपली ओळख चोखोबांच्या व्यक्तिमत्त्वात विलीन करून टाकली. मराठी कविता आणि संस्कृतीच्या इतिहासात अभिमान वाटावा असे हे अत्यंत दुर्मिळ उदाहरण आहे. संपूर्ण कुटुंबच्या कुटुंब एवढ्या आध्यात्मिक उंचीवर नेणे आणि त्याला सृजनाचा, सुसंस्कृतिचा स्पर्श होणे, हे मराठी संस्कृतीला आणि मराठी वाङ्मयाला मिळालेले फार मोठे योगदान आहे. संत निर्मळा आणि संत सोयरा यांनी ज्या पद्धतीने नाते जपले आहे. कुटुंब एकसंघ ठेवले. ते आजच्या कुटुंब विघटनाच्या काळात दुर्मिळ उदाहरण आहे. आणि तितकेच मोलाचेही आहे.

**विटाळाचे होते जाळे।**
**तुटले बळे नामाच्या ।।**

असा विटाळाचा जाच बाईला सहन करावाच लागतो. देहीचा विटाळ देहीच निर्धारी। असे त्या निर्धारपूर्वक आणि निर्भयपणे आपल्या अभंगात मांडतात.

**विटाळा वाचोनी उत्पत्तीचे स्थान ।**
**कोण देह निर्माण नाही जगी ।।**

एक निरक्षर पण आपल्या उपजत शहाणपणातून, अनुभवातून जगाला त्रिकालाबाधित सत्य सांगून जाते. विटाळ हेच नव निर्मितीचे (नव्या देहाचे) मूळ स्थान आहे हे तिला तेव्हा (१३ व्या शतकात) कसे कळाले असेल...?

आजच्या २१ व्या शतकातील वैज्ञानिक, जैविक शोध तिने सातशे-आठशे वर्षापूर्वी कसा समजून घेतला असेल?

सोयराबाईंची अध्यात्मिक साधना किती उच्च कोटीला पोहोचली होती हे निश्चित कळून येते. चोखामेळा यांचा कुसू कोसळून मृत्यू झाल्यानंतर प्रत्यक्ष विठ्ठल त्यांचे आणि त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी आला होता.

**'देव बैसोनी निकटी ।**
**निर्मळेसी सांगे गोष्टी ।।**
**ऐसे देखोनिया नयनी ।**
**सोयरा मिठी घाली चरणी ।।**

इथे ईश्वराचे दर्शन, संभाषण आणि स्पर्श तिहेरी अनुभव सोयराबाईला येतो. तो गूढवादी समजला तरी आपल्याला अद्‌भूत वाटतो. सोयराबाईंची आध्यात्मिक दृष्टी हेच तिच्या स्त्री मुक्तीचे आणि श्रम मुक्तीचे तसेच संसार मुक्तीचेही रहस्य सांगितले आहे.

म्हणूनच सोयराबाईंच्या अभंगाचे, कवितेचे वेगळेपण वाचकाला जाणवल्याशिवाय राहात नाही.






# मंगळवेढ्याचा इतिहास व सांस्कृतिक विकासाचे धोरण

**डॉ. अरुण शिंदे**
मो. ९४२१०२४०५५

जवळपास दोन हजार वर्षांपासूनच्या मंगळवेढ्याच्या अस्तित्वाचे ऐतिहासिक पुरावे सापडतात. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांना शके ४१० (इ. स. ४८८) मधील एक ताम्रपट मंगळवेढ्यात मिळाला. मराठी भाषेचे प्राचीनत्व सिद्ध करणारा हा आद्य ताम्रपट आहे. या ताम्रपटाचे वाचन करून राजवाडे यांनी असा निष्कर्ष काढला आहे की, 'सातवाहन राजवटीबरोबरच (शके १५० च्या सुमारास) महाराष्ट्री भाषा लयास गेली. त्यानंतरची दोन-अडीचशे वर्षे महाराष्ट्रात अपभ्रंश भाषा प्रचलित झाली. शके ४१० मध्ये महाराष्ट्रातील सामान्य



लोक मराठी भाषा लिहीत व बोलत असत. या काळात महाराष्ट्री अपभ्रंश लोप पावत होती. परंतु नवी मराठी शिष्टमान्य व राजमान्य झालेली नव्हती.' या ताम्रपटामध्ये देसाई, देसई, कुळकरणी, महाजन, पाटील, नाईकवडी, घाडे (गाडे), पवार, जादव, मोरे, रोडरे, सीद किंवा सिंदे, सुरात, लाड वगैरे आडनावे आढळतात. तसेच गोजराज हे मंगळवेढ्याच्या संस्थानिकाचे किंवा मंगळवेढा ज्या संस्थानात होते, त्या संस्थानाच्या अधिपतीचे नाव असावे, असे दिसते (शहा, १९९८ : १३५-१४५). सदर ताम्रपटातील देसाई, पाटील, नाईकवडी, पवार, मोरे इत्यादी आडनावे अर्वाचीन वाटतात. त्यामुळे या ताम्रपटाच्या प्राचीनत्वाविषयी शंका घेतली गेली आहे. तथापि जर हा ताम्रपट खरा असेल तर मराठी भाषेच्या जनकत्वाच्या पहिल्या पुराव्याचा मान मंगळवेढ्यास मिळतो.

बदामीचा चालुक्यवंशीय राजा मंगलेश (इ.स. ५९१ किंवा ५९७-६११) याचा मंगळवेढ्यास तळ होता. त्याच्या नावावरून मंगळवेढा हे नाव पडले, असा तर्क दिला जातो. 'मंगलीश बीडू' या कानडी शब्दप्रयोगाचा अर्थ 'मंगलेशाचा तळ' असा होतो. परंतु राजवाड्यांना सापडलेल्या शके ४१० च्या ताम्रपटामध्ये मंगळवेढ्याचा स्पष्ट नामनिर्देश असल्याने हा तर्क चुकीचा ठरतो.

बाराव्या शतकामध्ये मंगळवेढा हे कलचुरी बिज्जलांचे वास्तव्यस्थान होते. संकमदेव राजाने मंगळवेढा ही आपली दुसरी राजधानी बनविली होती. (संकमदेव ११७७ साली राज्यावर आला होता) (पाठक, २०१० : ३८०-३८१). या काळात मंगळवेढ्यात मोठाल्या इमारती, भव्य मंदिरे, तलाव, बारवा वगैरे बांधण्यात आल्या. कलचुरी राजे जैनधर्मीय असल्याने मंगळवेढ्यात जैन शिल्पे, मूर्ती वगैरे मोठ्या प्रमाणावर सापडतात.

मंगळवेढ्यातील काशी विश्वेश्वराच्या देवळामध्ये शके १४९४ सालचा साठ ओळींचा शिलालेख आहे. हिप्परग्याचा कुलकर्णी मंगळवेढ्याची मजमु करीत असताना त्याने देवळाचा जीर्णोद्धार केल्याचा उल्लेख त्यामध्ये आहे. यावरून देऊळ पुरातन असून त्याची निर्मिती शके १४९४ च्या पूर्वी झाली असल्याचे अनुमान करता येते (शहा, कित्ताः ५६-५९). शिलालेखातील 'मुळा याकुबाहि कवुळ काडळे असे' या ओळीवरून देवळाचा जीर्णोद्धार करण्याचा कौल मुल्ला याकुब यांनी काढला होता हे स्पष्टपणे दिसून येते. तत्कालीन समाजामध्ये हिंदू-मुस्लीम ऐक्यभाव कसा होता, याचा हा एक अस्सल पुरावा आहे.

मंगळवेढा येथील शके ११६९ मधील एका शिलालेखाचे वाचन राजवाड्यांनी केले आहे. त्यामध्ये कोणीतरी कोणाला मारल्याचा उल्लेख आहे. यादवांचा प्रधान हेमाद्रीपंडित याने 'व्रतखंड' भागाच्या शेवटी जोडलेल्या राजप्रशस्तीत या गावाचे नाव 'मंगलवेष्टक' असे दिले आहे. येथील बिल्लणनामक नृपतीचा पराभव करून यादव नृपती भिल्लम (पाचवा) याने हे नगर जिंकून घेतले, असे म्हटले आहे.

म्हसवड येथील सिद्धनाथ मंदिरातील इ. स. ११४८ च्या कानडी शिलालेखामध्ये 'मंगळवडे', 'मंगळिवडे' असा उल्लेख आलेला आहे. भिवघाटच्या कानडी शिलालेखामध्ये सोविदेवचा मुक्काम 'मंगळवाड' येथील

स्थिरशिबिरात होता, असे नमूद केले आहे. पंढरपूर तालुक्यातील पुळूज येथील शंकराच्या मंदिरातील कानडी शिलालेखामध्ये 'मंगळिवेढे' असा उल्लेख आहे. हिरेमुद्दनूर येथील शिलालेखात 'मंगळवाड' असा उल्लेख सापडतो.

मंगळवेढ्याच्या मुढे गल्लीत लाल कुरुंदाच्या पाषाणात खोदलेला एक शिल्पपट आहे. सोलापूर जिल्ह्याचा सांस्कृतिक वारसा शोभावा, असा हा एकमेव शिल्पपट आहे. त्यामध्ये चार विभागामध्ये अवर्णनीय प्रसंग शिल्पाकृतींनी कोरलेला आहे. हा शिल्पपट 'एकान्तद रामय्य' याचा असावा. मंगळवेढे हे शैव पंथाचे मोठे केंद्र होते, असे मत ब्रह्मानंद देशपांडे यांनी व्यक्त केले आहे (शोधमुद्रा, खंड २, १३१-१३७). शिलालेखांचे अभ्यासक आनंद कुंभार यांच्या मते, हा शिल्पपट बलिदान शिल्पपटामध्ये मोडणारा आहे. याचा काळ बाराव्या व तेराव्या शतकातील असावा (कुंभार, संशोधक, २००१ : ३१).

तेर येथील शिलालेखामध्ये जोगमरस अभवा जोगमराया हा 'मंगळवाडचा मंडळेश्वर' असल्याचे म्हटले आहे. हा शिलालेख शके १००० च्या आसपासचा असून त्याचे वाचन ग. ह. खरे यांनी केले आहे. माडग्याळच्या (ता. जत) शिलालेखामध्ये तरिकाढु (दरिकाडू) वाड असून त्यात 'मंगळिवेड' हे गाव असल्याचे सांगून नंतर कल्याणीच्या कलचुरींची वंशावळ दिली आहे. त्यात जोगम हा बिज्जलाचा आजोबा असल्याचे म्हटले आहे (देशमुख : २०१४, २६). आदिलशहाच्या दरबारातील महाकवी नुस्त्रती याच्या 'अलिनामा' या ग्रंथामध्ये (शके १५९७) 'मंगलबीड के तल' असा उल्लेख येतो.

मंगळवेढ्यातून नऊ शिलालेखांची नोंद झाली आहे. त्यापैकी बहुतांश शिलालेखांमधून भोगेश्वर, नारायणदेव, चंडिकाई, कलियण्ण, उत्तरेश्वर आदी मंदिरांना दिलेल्या दानाचे वर्णन केलेले आहे.

सन १८८६ च्या मुंबई इलाख्याचे गॅझेटिअर (कोल्हापूर) मध्ये मंगळवेढ्यासंदर्भात महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे. मंगळवेढा हे नवव्या, दहाव्या व अकराव्या शतकामध्ये राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे शहर होते. चालुक्य राज्यकर्त्यांचे ते निवासस्थान होते. सन १६९४ साली गावासभोवती गावकूस (तटबंदी) बांधण्यात आली. त्याची लांबी ६९३६ फूट असून जाडी ८ फूट होती. गावास सांगली, बोराळे व कासेगाव/पंढरपूर या तीन वेशी होत्या. गावकुसास १४ बुरूज होते व प्रत्येक बुरजाची उंची सुमारे १४ फूट व व्यास १४ फूट होता. गावात ९३ विहिरी होत्या. (गॅझेटिअर, १८८६:३६१-३६२). या गॅझेटिअरमधील गावकुस बांधण्याचे वर्ष चुकीचे वाटते. कारण संत चोखामेळा यांचा मृत्यू इ. स. १३३८ साली गावकूस बांधताना ते कोसळल्यामुळे झाला होता. त्यामुळे चोखोबांच्या काळात म्हणजे इ. स. १३३०-४० च्या दरम्यान गावकुसाचे बांधकाम सुरू होते, असे उपलब्ध पुराव्यावरून दिसून येते.

बिदरच्या बादशहाच्या काळात मंगळवेढ्यामध्ये मोठे दुष्काळ पडले. इ. स. १३९६ ते १४०८ व सन १४६८ ते १४७५ या काळात दोन महाभयंकर दुष्काळ पडले. त्यांना 'दुर्गाडीचा (दुर्गादेवी) दुष्काळ' असे म्हणतात. वि. का. राजवाडे यांना दुर्गाडीच्या दुष्काळाचा उल्लेख असणारा एक महजर वाईतील देशपांडे घराण्यात मिळाला. या महजरातील पहिलेच वाक्य आहे, ''दुर्गाडीचा दुष्काळ पडला. सबब काळाकरिता मुलूक वैराण होऊन चिराख जाहला'' याच महजरामध्ये दामाजीपंतांची हकिकत आली आहे. या महजरावर बिदरचा

पातशहा हुमायून इब्राहिमचे व सहा अधिकाऱ्यांचे शिक्के आहेत व तो सन १४७५ मधील आहे. सातारच्या महाराजांच्या दप्तरात नकलेची नक्कल केलेला एक महजर राजवाड्यांना मिळाला. त्यात महारांच्या पूर्वापार हक्कांची यादी आहे. त्यानंतर एकनाथ स्वामींच्या मृत्यूनंतर पैठणास एकनाथांच्या देवालयात पुन्हा मूळ महजराची उजळणी इ. स. १६४१ मध्ये झाली.

या महजराचा मथळा आहे की, ''बादशहाचा हुकुम शिक्कामोर्तब व दामाजीपंत कारकून यांचे हातची कलमे''. म्हणजे मूळ महजरावर बादशहाचे शिक्कामोर्तब होते व तो खुद्द दामाजीपंतांच्या हातचा होता. महारांच्या हक्कांचा तपशीलवाद निर्देश केल्यानंतर या महजरात पुढे लिहिले आहे की, ''हे देणे पाछायाचे व दामाजीपंत यांचे हातचे कागद असे. विठ्या महार मंगळवेढ्याचा पाछायाचे कामी पडला व दामाजीपंत कामी पडला म्हणोन पातशहाणी विठ्या महारास हक करून दिल्हे.''

या नकलेचा सारांश राजवाड्यांनी पुढीलप्रमाणे दिला आहे, ''बेदरास जाऊन पाच्छाव याची लेक आणले. आणी पाच्छाव पासी हात जोडून उभा राहिला. बाच्छाव ह्याचे घोड्याची जागल करावयास गेला. तो तेथे मांग चोरीस आला. तेंव्हा महार जागा होता. मग बाच्छाव यास जागे केले. विश्वासुक महार ठरला. म्हणोन घोडा वरातीस दिल्हे. आंबरनाक महार यास कृपा करून दिल्हे. बाच्छाव याचीतील कोठीतील कोठाडी लुटल्या त्याजबद्दल तगादी दामाजीपंता केला. ते वेळेस श्री विठोबाचे विठ्या महाराने रूप धारण करून बाच्छाव याची रसद पोहचती केली. दामाजीपंतांचा पैका भरून विठ्या महाराने दिल्हा आणि बाच्छाने पुन्हा पावली दिल्ही व दामाजीपंत यासपाशी विठ्या महाराने आणोन दिल्ही. बाच्छाव याणी चौकशी केली व दामाजीपंत याची चौकशी केली. त्याजवरून विठ्या महार यास हकदर उपकार पोआस भाकरी व बसावयास जागा करून दिल्ही.. महाराचे बंदोबस्त करून दिल्हे.'' (शहा, १९७८ :१४४-१४५).

या महजरावरून विठू महाराने दामाजीपंतांच्या धान्य वाटपाचे पैसे बादशहाकडे चुकते केले, हे सत्य सूर्यप्रकाशाइतके लखलखीत असतानाही आपण विठू महार या वास्तवात प्रत्यक्षात होऊन गेलेल्या व्यक्तीस त्याचे श्रेय न देता विठ्ठलरूपी परमेश्वरास देतो, यास आपली जातीय मानसिकता की अन्य काय म्हणावे?

दुर्गादेवीच्या दुष्काळामुळे 'मुलकी वस्ती नाही, यैसे जाहले. मुलुक वैराण राहिला'. दुष्काळामुळे हा मुलूख ओस पडला होता. तेथे पुन्हा वसाहत कशी तयार झाली, याची माहिती राजवाड्यांनी 'मंगळवेढ्याची हकीगत' या टिपणामध्ये दिली आहे. राजवाड्यांना हा हकीकतनामा मंगळवेढ्यास मिळाला. ह्यात दुर्गादेवीपासून सवाई माधवरावाच्या मृत्यूपर्यंतची हकीकत आली आहे. मूळ लेखकाने हकीकतीचे सहा भाग केले आहेत. मंगळवेढ्यात ज्या कारकिर्दी झाल्या, त्यांची माहिती प्रस्तुत हकीकतीमध्ये लिहिली आहे (देशपांडे व भामरे, २००९ : ५६-७६).

मंगळवेढा परगणा साठ वर्षे बेचिराख झाला होता. त्या काळात मंगळवेढ्यात कृष्णतळ्याजवळ कसगावडा व कुलकर्णी अशी फक्त दोन कुटुंबे राहात होती. 'मंगळवेढा परगण्याची आबादी पुन्हा व्हावी व लोकांची वस्ती वाढून त्यांची उस्तवारी होण्यासाठी, त्यांना बेदरच्या बादशहाचा कौल हवा होता. याच काळात बेदरचा बादशहा या भागात आला होता. तेव्हा या दोघांनी बादशहाचा रस्ता चुकवून 'मौजे चल्हे स्थळी दरीदेव याचा खोरा आहे' त्या ठिकाणी आणून ठेवले. ही बातमी

कळल्यावर ‘बेदर सरकार येथे बोभाटा जाहला. जे पादशाही रस्ता कोणी मारून न्हेला, ऐसा बलांढी कोण आहे, त्याची चौकशी करणेविसी हुकूम जाहला.’ त्या अगोदर विठ्ठल कसगावडा, चंडरस कुळकर्णी या उभयतांनी बेदरास अर्जी लिहून पाठविला की, ‘आपला प्रगणा साठ वर्षे बेचिराख वैराण होऊन पडला आहे, आपली दाद लागत नाही, या उद्देशे आपली दाद लागून प्रगणेची उस्तवारी व्हावे, या उद्देशे रस्ता हाजम करून ठेविला आहे. आपणास अभय द्यावे, जिवानिसी येऊन हाजीर होतो.’ त्यांना अभय मिळाल्यावर ते बिदरला दरबारात हजर झाले. पातशहाने त्यांचा अन्याय माफ करून मंगळवेढ्याची वस्ती वाढविण्याबद्दल कौल दिला.

‘परगणा मातबर, बहुत दिवस झाडी लागून पडला, कुळभरणा अगदी नाही, लावणे करणे जरूर, जाणोन चौकडे कुळाचा तपास करावयास लागले, त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणाहून लोकांना बोलावून त्यांना जमीन कसण्यास दिली. इंगळे प्रतापरुद्र (मूळ गाव - नागाव), होनराव (आलूर आचलेर), निकम, पटेल, फुगारे (अनगर), भगरे (शंकरगाद), हजारे (बावची), जटाळ (कडलास), उनाळे (म नेराजोरी), कोडो बहिरो (बेदर), मुरडे (वाघदेवी महादेव), ताड्याचा (ताड), (सुस्ते), टकल्या (कमलापूर, ता. सांगोला), फटे, शाहाजादे (नागाव), जावळा (जवळे) धाराशिव), काटकर (कुकुडवा), घाटाळे, घुले (तुळजापूर), चौधरी (गंगातीर), अवताडे, भांगे, वाकडे (अनगर), खराडे (गोरगाव) तसेच शेंबडा, तानगावडा, कोगे, ढेवण, उमाटे, मुद्‌गूल आदींना ब्रह्मपुरी, भालेवाडी, बोराळे वगैरे भागांत जमिनी देण्यात आल्या. याच भागास आज आपण मंगळवेढा शिवार म्हणतो. या लोकांनी पुन्हा नव्याने मंगळवेढा वसविले. आजही या आडनावाचे लोक मंगळवेढ्यात आहेत. या हकीकतनाम्याम ध्ये संबंधितांचा मूळ पुरुष, मूळ गाव, त्यांना कोठे, किती जमीन दिली वगैरेंची मोठी ज्ञानवर्धक माहिती आहे.

बिदरची राजवट १५३८ साली लयास गेल्यानंतर आदिलशाही अमलाखाली मंगळवेढे गेले. सन १५९२ मध्ये मालोजीराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली निजामशाही फौजेने मंगळवेढ्यापर्यंतचा मुलूख जाळून पोळून उद्‌ध्वस्त केला (शहा, १९९८ : १२२). केल्याचा उल्लेख इतिहासात येतो. शहाजीराजे भोसले हे मंगळवेढ्यावरून विजापुरास गेले असावेत, असा तर्क गोपाळराव देशमुख यांनी केला आहे (२०१४ : ६१, ६२, ६३). शिवाजी महाराज मिर्झाराजे जयसिंगाबरोबर विजापूरवरील स्वारीत असताना त्यांचा तळ २० डिसेंबर ते २७ डिसेंबर १६६५पर्यंत मंगळवेढा परिसरात होता. सरनोबत नेताजी पालकर यांनी १९ डिसेंबर १६६५ रोजी मंगळवेढा ताब्यात घेतला होता. शिवाजी महाराज २० डिसेंबर १६६५ रोजी मंगळवेढ्याच्या किल्ल्यात येऊन गेले होते. विजापूरची मोहीम अयशस्वी ठरल्यावर मंगळवेढ्याच्या किल्ल्यातून माघार घेताना मोगलांनी मोठी नासधूस केली. २५ मे ते ३० मे १६६६ पर्यंत म्हणजे एक आठवडाभर किल्ल्याचा विध्वंस केला. इतिहासकार जदुनाथ सरकार, सेतू माधवराव पगडी तसेच ‘आलम गीरनामा’ (२०१४ : ७०-७२) च्या कर्त्यानेही या विध्वंसाचे वर्णन केले आहे.

काफीखानाच्या ‘मासिर-इ-आलम गिरी’ या ग्रंथामध्ये ऑक्टोबर १६७९ मध्ये मंगळवेढ्याचा परिसर शिवाजी महाराजांच्या अमलाखाली असल्याचा उल्लेख आहे. १६७७ साली शिवाजी महाराज दक्षिण दिग्विजयास गेले. त्या वेळी ते भागानगराकडे जाताना मंगळवेढ्यावरून गेले, असा त्यांच्या मार्गाचा





नकाशा भारत इतिहास संशोधन मंडळाच्या त्रैमासिक ६९ मध्ये प्रसिद्ध झालेला आहे (१९९१ : ३८).

औरंगजेबाची छावणी २१ मे १६९५ ते १९ ऑक्टोबर १६९९ या काळात ब्रह्मपुरीस होती. या छोट्याशा गावास त्या वेळी परगण्याचा दर्जा दिलेला होता. औरंगजेबाचा व सरदारांचा कुटुंबकबिला इ. स. १७०३ सालापर्यंत ब्रह्मपुरीत होता. या काळात मोगल साम्राज्याचा कारभार ब्रह्मपुरीतून चालत होता. एक प्रकारे आठ वर्षे ब्रह्मपुरी ही मोगल साम्राज्याची म्हणजे तत्कालीन भारताची राजधानी होती. या वेळचा मोगल साम्राज्याचा विस्तार पाहिला तर ब्रह्मपुरीचे महत्त्व लक्षात येईल. या वेळी मोगल साम्राज्याचे २१ सुभे (प्रांत) होते. उत्तरेस अफगाणिस्तान, पश्चिमेस गोवा, दक्षिणेस तुंगभद्रा, तंजावर व पूर्वेस गोवाहटीपर्यंत औरंगजेबाचे प्रचंड साम्राज्य पसरलेले होते. त्या वेळी त्याचा महसूल ३३ कोटी २५ लाख एवढा होता.

ब्रह्मपुरीच्या छावणीचा विस्तार प्रचंड होता. या छावणीत एकंदर २५० बाजार होते. छावणीचा विस्तार ३० मैलांपर्यंत होता. एकंदर छावणीचा परीघ कधी पाच तर कधी साडेसात मैल असे. राज्याचे सर्व खातेप्रमुख छावणीत असत. दप्तरखाना, किताबखाना, महसूल, संरक्षण, न्याय, इनामे, सनदा, परराज्यांशी पत्रव्यवहार, राजदूत भेटी, सरकारी कचेऱ्या, दरबार, अधिकारी, सरदार वगैरे सर्व छावणीमध्ये होते. छावणीच्या मधोमध बादशहाची कचेरी व निवासस्थान होते. त्याला दौलतखाना म्हणत. निवासस्थान, दिवाणे आम, दिवाणे खास, अंतःपूर इत्यादी असत. निवासस्थानाचा घेर निदान एक कोसाचा असे. छावणीमध्ये लढाऊ फौज ६० हजार, एक लक्ष पायदळ, ५० हजार उंट, ३ हजार हत्ती होते. सर्व लोक धरले तर साधारण पाच लक्ष लोक छावणीमध्ये होते. या छावणीत बादशहाचे नातेवाईक, मुले, रजपूत राजे, शाहूराजे, महाराणी येसूबाई, शिवछत्रपतींच्या महाराणी सकवारबाईसाहेब, प्रतापराव गुजरांचे कुटुंब इत्यादी राहिले होते. या काळात सैन्यातील लोकांनी तेथे मोठे वाडे, घरे बांधली. जणू काही तेथे एक नवीन शहर वसले होते.

मोगल साम्राज्याच्या सर्व प्रांतातून सुभेदार, अधिकारी, सैन्य ब्रह्मपुरीस येत होते. मोगल साम्राज्याच्या सर्व सुभ्यावरून येणारा खजिना ब्रह्मपुरीत होता. मोहिमेसाठी लागणाऱ्या

सर्व लष्करी साहित्याचा तळ येथेच होता. लष्करी सामग्री येथेच येऊन मग शाही आज्ञेनुसार रवाना होत असे. हत्ती, घोडे, उंट व धनधान्य येथेच प्रथम येत होते. औरंगजेब मराठ्यांचे किल्ले घेण्यास बाहेर पडल्यानंतर त्यास लागणारे सर्व युद्धोपयोगी साहित्य ब्रह्मपुरी तळावरून पाठविले जात असे. सरदार, मनसबदार, साहित्य घेऊन जाण्यासाठी तळावर येत. दारुगोळा, तोफा, हत्ती, घोडे, तंबू, राहुट्या, धान्य, खजिना वगैरे ब्रह्मपुरीहून पाठवणी केल्याच्या अनेक नोंदी उपलब्ध आहेत. आठ हजार, बारा हजार, पन्नास हजार बैलांच्या पाठीवरून धान्याच्या गोण्या ब्रह्मपुरीहून औरंगजेबाच्या लष्करी मोहिमेकडे पाठविल्याच्या नोंदी आहेत. काबूलच्या सुभेदाराची मुले औरंगजेबास भेटण्यासाठी जवळपास तीन हजार मैलांचा प्रवास करून ब्रह्मपुरीस आली होती. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे मोगल साम्राज्याचा किताबखाना ब्रह्मपुरीत होता. त्यामध्ये प्रचंड ग्रंथसंपदा होती. या किताबखान्याचा ग्रंथपाल होता फाजाईलखान! दिल्लीच्या बादशहाच्या पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेला ग्रंथालयाचा अमूल्य खजिना जवळपास सात वर्षे ब्रह्मपुरीस होता. तत्कालीन आशिया खंडातील सर्वांत बलाढ्य सम्राटाच्या राजधानीचा रुबाब ब्रह्मपुरीने जवळपास आठ-नऊ वर्षे अनुभवला.

बादशहा दर शुक्रवारी नमाजासाठी मंगळवेढ्याच्या जुम्मा मशिदीत जात असे. ब्रह्मपुरीचा तळ व जुम्मा मशिदीचे अंतर सव्वासहा मैल होते, अशी माहिती 'अखबारा'तून येते. यावरून बादशहाची छावणी कोठे होती, याचा अंदाज बांधता येतो. औरंगजेबाने मंगळवेढा परगण्याच्या शेतसारा वार्षिक एक लाख रुपयांवरून दोन लक्ष केला होता. त्यामध्ये पुढच्या वर्षी चाळीस हजार, तिसऱ्या वर्षी १९ हजार अशी वाढ होत गेली. त्यामुळे लोकांनी शेती सोडून देशांतर केले.

१६९९ साली औरंगजेबाने छावणीहून कूच करताना तेथे सुरक्षेसाठी तट बांधला. हा तट म्हणजे माचणूर येथे असलेली किल्लेवजा गढी होय. या गढीत बादशहाची बेगम, मुलगी वगैरे १७०३ सालापर्यंत राहात होती. सध्या या तटबंदीशिवाय शाही छावणीचे सर्व वैभवशाली अवशेष काळाच्या ओघात नष्ट झालेले आहेत. कुठेतरी, कधीतरी जमिनीमध्ये काही तत्कालीन अवशेष आजही सापडतात. याच छावणीमध्ये दुर्गादास राठोड औरंगजेबास भेटला होता. बंडखोर शहाजादा अकबराची मुलगी सिबगतुन्नीसा बेगम हिचा १ जुलै १६९९ छावणीत मृत्यू झाला. तिचे दफन मंगळवेढ्यात करण्यात आले. जिजाऊ माँसाहेबांच्या बंधूंचे नातू जगदेवराव जाधव याचे निधन ब्रह्मपुरीच्या तळावरच (१९ सप्टेंबर १७००) झाले. त्यांची समाधी ब्रह्मपुरीस आहे. पुढे ७ व ८ जानेवारी १७०५ रोजी औरंगजेब पुन्हा ब्रह्मपुरीच्या तळावर आला होता. पेशव्यांचा अंमल मंगळवेढ्यावर सुरू झाला. १८४३ सालापर्यंत बहिर्जी पांढरे हे मंगळवेढ्याचे सुभेदार होते. बहिर्जीराजे पांढरे यांनी ही जुलमी सारावाढ कमी केली. पुढे मंगळवेढा पटवर्धन संस्थानच्या व दक्षिणेकडील ग्रामीण भाग जत संस्थानच्या अधिपत्याखाली स्वातंत्र्यापर्यंत होता.

मंगळवेढ्याच्या जवळपास दीड हजार वर्षांच्या इतिहासाचा हा धावता आढावा. यावरून आपला पूर्वेतिहास काय होता, याची किमान समज येते. गोपाळराव देशमुख यांनी मंगळवेढ्याचा मध्ययुगीन इतिहास अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिला असून आपण त्याबद्दल कायम कृतज्ञ असले पाहिजे.

संत व साहित्य परंपरा

बाराव्या तेराव्या शतकामध्ये मंगळवेढ्याची भूमी ही वारकरी व लिंगायत

संप्रदायाची प्रयोगशाळा होती. भक्ती, नीती, सात्त्विकता, समता, ममता व आध्यात्मिक लोकशाहीचा अधिकार सर्वांना देणारे संत इथे निर्माण झाले.

म. बसवेश्वर यांचे कार्य अत्यंत क्रांतिकारक स्वरूपाचे होते. कलचुरी बिज्जलांचे मुख्य प्रधान बलदेव हे त्यांचे मामा होते. त्यांचे मंगळवेढ्यामध्ये ११३२ ते ११५३ या काळात वास्तव्य होते. कलचुरी राज्याचे ते प्रधानमंत्री होते. आंतरजातीय विवाह, अनुभवमंटपम, अस्पृश्यता निर्मूलन, स्त्रीमुक्ती, वचनसाहित्य, लोकभाषेचा पुरस्कार, सामाजिक समता, बंधुता, 'कायक वे केलास'चा उपदेश वगैरे माध्यमांतून त्यांनी सामाजिक क्रांती करण्याचा प्रयत्न केला. आपल्या प्रखर, बुद्धिवादी, समतावादी व लोकनिष्ठ विचारांनी धार्मिक व सामाजिक परिवर्तनाची मूलगामी चळवळ निर्माण करणारे म. बसवेश्वर हे पहिले भारतीय धर्मसुधारक व समाजक्रांतिकारक होते. त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना मंगळवेढ्यात घडल्या, असे काही अभ्यासक मानतात, परंतु त्या संदर्भातील कोणत्याही खाणाखुणा आज आढळत नाही. बसवेश्वरांचा वैचारिक व सामाजिक क्रांतीचा विचार हा मंगळवेढ्याने भारताला दिलेला अजोड वारसा आहे.

चोखोबांच्या (मृत्यू इ. स.१३३८) अभंगांतून त्यांच्या ठायी असणाऱ्या सात्त्विक भावभक्तीबरोबरच त्यांचे दुःखमय जीवन, जातिभेदाचे काच, वेदना व आक्रांत व्यक्त झाला आहे. त्यांच्या अनेक अभंगांमधून त्यांच्या जीवनातील काही घटना-प्रसंगांचे उल्लेख येतात व तत्कालीन सामाजिक वासतवाचे दर्शन घडते. बाह्यभागावर भुलण्यापेक्षा माणूस समजून घेण्याची एक कालातीत जीवनदृष्टी चोखोबांनी दिलेली आहे. 'अर्ध घडी ही जावो नेदी' हा चोखोबांचा वेळ व्यवस्थापनाचा विचार आज प्रत्येकासाठी उपयुक्त आहे.

सोयराबाईंच्या ६२ अभंगांमधून अस्पृश्यतेच्या तीव्र वेदनेबरोबरच 'अवघा रंग एक झाला'चा जीवनमुक्तीचा अनुभव प्रकटतो. चोखोबा व सोयराबाईंचा मुलगा कर्ममेळ्याने थेट विठ्ठलास निर्भयपणे जाब विचारला आहे की- आमुची केली हीन याती। तुज कां न कळे श्रीपती।जन्म गेला उष्टे खाता। लाज न ये तुमचे चित्ता।।. जातिव्यवस्थेमुळे वाट्यास आलेल्या अमानुषपणाविरुद्ध विद्रोह कर्ममेळ्याने केला आहे. आपल्यावरील अन्यायाविरोधात थेट विठ्ठलालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून त्याने आपल्या दुःखाला, वेदनेला वाट करून दिली. परंतु त्याच्या वेदना ऐकून तत्कालीन समाज तसूभरही द्रवला नाही, हे वास्तव आहे. चोखोबांची बहीण निर्मळा, मेहुणे बंका या साऱ्यांनीच हीन यातीचे पराकोटीचे दुःख, दारिद्र्य आरपार भोगीत, आपले सत्त्व, भाव, नैतिकता, प्राणपणाने जपत भावभक्तीचा उत्कट आविष्कार केला.

'दीन पतित अन्यायी', 'मी तो आहे यातिहीन', 'मज अधिकार नाही' यांसारख्या अभंगांतून कथित हीन यातीचे दुःख, अधिकारहीनता, न्यूनगंड यांची जोरकसपणे अभिव्यक्त करणारी थोर संत कवयित्री म्हणजे कान्होपात्रा. सत्तांध व विषयांध सुलतानासमोर न झुकता, 'हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले', 'प्राण हा सर्वथा। फुटो पाहे।' अशा पराकोटीच्या प्राणघातक संघर्षातही आपले सत्त्व, स्वत्व टिकविण्यासाठी तिने एकाकी आक्रांत केला. तिच्या मदतीसाठी कोणी कोणी गेले नाही. सत्तेने एका गरीब, साध्या सत्त्वसंपन्न स्त्रीचा घेतलेला तो भयंकर बळी होता. कान्होपात्रेचे चरित्र निरंकुश अमानुष शासनसत्तेसमोर आपले सत्त्व टिकविण्यासाठी न झुकण्याबरोबरच जातिग्रस्त व संवेदनाशून्य समाजाच्या सर्व मर्यादा वेशीवर

टांगते.

मंगळवेढ्याने मराठी समाज व मराठी संस्कृतीस दिलेले सर्वोच्च योगदान म्हणजे चोखोबा, त्यांचा परिवार व कान्होपात्रा. संतांच्या जीवनचरित्राचा, त्यांच्या अभंगांचा आपण भौतिकवादी, मार्क्सवादी पद्धतीने अभ्यास करावा, म्हणजे आपण तथ्याच्या अधिक जवळ जाऊ, असे मला वाटते.

कर्नाटकातील मध्वाचार्यांच्या द्वैती संप्रदायाचे भाष्यकार जयतीर्थ टीकाचार्य (मृत्यू सन १३८८) हे मूळचे मंगळवेढ्याचे होते. त्यांनी तेवीस ग्रंथांमधून आध्यात्मिक व तात्त्विक भाष्य केले. अक्कलकोटचे स्वामी समर्थ, खर्डीचे सीताराम महाराज, गोविंदबुवा, शिवदास महाराज वाखरीकर आदींचे काही काळ मंगळवेढ्यात वास्तव्य होते.

लतिफ बुवा नावाचे एक संत मध्ययुगीन काळामध्ये होऊन गेले. त्यांनी अभंगरचना केली होती. अध्यात्मामध्ये त्यांचा अधिकार मोठा होता. 'कबीर मोमीन, लतीब मुसलमान। सेना न्हावी जाण, विष्णुदास।' अशा शब्दांत तुकाराम ांनी त्यांचे संत परंपरेतील स्थान अधोरेखित केले होते. मोरोपंतांनी त्यांचा गौरव करताना म्हटले आहे, 'ख्यात तुकारामस्तुत साधूसभा प्राणवल्लभा। लतिफास स्मर, त्यासी असो जाती भलती बा।।' लतिफबुवा हे मंगळवेढ्याचे होते व माने गल्लीतील समाधी त्यांची आहे, असे मत संतसाहित्याचे अभ्यासक ज्ञानेश्वर बंडगर महाराज व्यक्त करतात. ते लतिफबुवांवर अधिक संशोधन करीत आहेत.

मध्ययुगीन काळामध्ये मुख्यतः आध्यात्मिक भक्तिप्रधान साहित्य निर्माण झालेले आढळते. मंगळवेढ्यातील संतांचे साहित्य हे मराठी वाङ्मयाच्या इतिहासामध्ये व संतसाहित्यामध्ये अग्रक्रमाने अभ्यासले जाते व त्याचा मराठी लोकमानसांवर अमीट ठसा उमटलेला आहे. आजही मंगळवेढा संतांची नगरी म्हणून ओळखली जाते, यातच संतांचे कालातीत मूल्य व माहात्म्य अधोरेखित होते. स्वातंत्र्यपूर्व संस्थानी कालामध्ये मंगळवेढ्यात वाङ्मयनिर्मिती झाल्याचे आढळत नाही. विसाव्या शतकामध्ये बाबा महाराज आर्वीकर (१९२५-१९७१) या सत्पुरुषाने माचणूर येथे वास्तव्य करून अध्यात्मावरील वीसहून अधिक ग्रंथ लिहिले.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये लक्ष्मण दुधाळ, जगन्नाथ रत्नपारखी, रमेश ढावरे, सुरेश शिंदे, प्रकाश जडे, दत्ता सरगर, इंद्रजीत घुले, शिवाजी सातपुते इत्यादींनी सकस वाङ्मयनिर्मिती केली आहे. डॉ. आप्पासाहेब पुजारी यांनी 'संत चोखामेळा समग्र अभंगगाथा' दीर्घ प्रस्तावनेसह कष्टपूर्वक संपादित केली आहे. 'गबाळ'कार दादासाहेब मोरे हे बावचीचे. कुडमुडे जोशी समाजातील दारिद्र्य, उपरेपण, भटकंती, जातपंचायत, अंधश्रद्धा वगैरेंवर हे आत्मकथन प्रकाश टाकते. विमल मोरे यांनी 'तीन दगडांची चूल'मध्ये भटक्या जमातीतील स्त्रीजीवन वास्तवाचे भेदक चित्रण केले आहे. सध्या ग्रामीण भागातूनही आपल्या अनुभवांची अभिव्यक्ती करण्याचा प्रयत्न नवीन पिढी करीत आहे. काय लिहावे, कसे लिहावे वगैरेंसंदर्भात म ार्गदर्शन करून या 'उगवत्या कोंबां'ना वाङ्मयीन खतपाणी घालण्याची नितांत आवश्यकता आहे.

लोकसाहित्य व लोकसंस्कृती

मंगळवेढा तालुक्याचा ग्रामीण भाग लोककथा, लोकगीते, कहाण्या, आख्यायिका, स्त्रीगीते, जात्यावरच्या ओव्या, बहीणभावाची गाणी, सण-उत्सवाची गाणी, विधिगीते, विवाहातील गीते, उखाणे, म्हणी, कथागीते, औतावरची, मोटेवरची, खळ्यावरची गाणी, धनगरी ओव्या वगैरे लोकविद्यांची खाण आहे. लोकविद्या/ लोकसाहित्यातून समाजमानस

आविष्कृत होते. खेड्यापाड्यांतील गोरगरीब निरक्षर आयाबायांनी एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे शेकडो वर्षांपासून ही ज्ञानपरंपरा सोपवत प्राणपणाने जपली आहे. आमच्या डिकसळ गावच्या गोपाबाई निळे यांच्या वाणीवर शेकडो गाणी अक्षरशः खेळत असतात. अशा आया, मावशा, आज्या गावोगाव आहेत. नवीन तरुण पिढी या लोकसाहित्यापासून दूर गेली आहे.

लोकसाहित्यामध्ये समाजमनसाचे अनेक ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक संदर्भ दडलेले असतात. उदा.मंगळवेढ्यामंदी लोक करती 'आन, आन'/गंगा जमुना पेव दोन, दिला हुकूम दामाजीनं/या ओळींतून दामाजी, दुष्काळ, धान्याची पेवे वगैरेंचे संदर्भ येतात.

मंगळवेढ्याच्या पूर्वेस दोन-अडीच किमीवर गोपणबाईंची विहीर आहे. माझ्या आईने सांगितलेल्या एका लोककथेतून गोपाबाईंचा संदर्भ उलगडतो.

**असं नवल झालं म्हणू मंगुडं या शहर**
**गावंदरी हाय शात पाडली व हीर**
**त्याला वलावा नाही जरा,**
**शहाणा बैसला हिरीवशी सांगतो व्हरा**
**'घरचा जेठा लेक, जेठी की वं सुनं**
**हीर मागती आंदण, तुम्ही करावी दान'**
**तेच बापानी धरलं खरं गेला वाड्याम्होरं**
**ल्योक म्हणतो नाही खरं, गेला देशावर**
**झाली कबुली सुनंवरी, गोपाबाईवरी**
**खेळणं बाजलं गाडीवरी...**
**उतरी हिरीचा उंबरा,**
**लागीला की वं झरा.**

अशा लोककथा, आख्यायिकांनी गावागावांचे सांस्कृतिक संदर्भ जपून ठेवलेले आहेत. त्यांचा शोध घेऊन ते उजेडात आणण्याची गरज आहे.

मंगळवेढ्याचे शिवार, ज्वारी, धनधान्य यांचेही वर्णन लोकगीतांमधून येते. उदा. मंगुडं गावीच्या रानामंधी, काय पिकली मालदांडी/ पयल्या राशीईला सव्वा खंडी/मंगळवेढा तालुक्यातील शाहिरी परंपरा, माचणूरचा कलगी, तुऱ्याची भेदिक शाहिरी, जागरण गोंधळ, पोतराज, वासुदेव, भारूड, कीर्तन, प्रवचन, भजन अशा लोककलांचे, त्यांचे निष्ठेने जतन करणाऱ्या कलावंतांचे संशोधन व संवर्धन केले पाहिजे. दादाभाई शेख (खडकी) यांनी तुरेवाल्या शाहिरीची परंपरा अत्यंत ताकदीने चालविली. अशा लोककलांनी व लोकलावंतांनीच हजारो वर्षांपासून आपल्या कृषिपरंपरेचे रंजन, उद्‌बोधन व संस्करण केले आहे.

बिरोबर (हुन्नर), महालिंगराया (हुलजंती), महासिद्धाप्पा (डोणज), कामसिद्ध (खोमनाळ, खुपसंगी), रंगसिद्ध (तामदर्डी), सिद्धेश्वर (माचणूर) हे लोकदेव लोकोत्तर महापुरुष होते. त्यांच्या सद्‌गुणांबद्दल लोकमानसाने त्यांना देवत्व दिले आहे. म रवड्याचे सिंहगड महाराज, नंदेश्वरचे बाळकृष्ण महाराज, भुयारचे बागडे महाराज, संत वडरी महाराज हे गेल्या शतकात होऊन गेलेले संत आहेत. कचरेवाडीच्या जोशी गुरुजींची थोरवी एवढी की, गावकऱ्यांनी त्यांचा पुतळा उभा केला आहे. या महापुरुषांचे लोकोद्धाराचे खरेखुरे कार्य समाजासमोर आणण्याचे आव्हान आपणांसम ोर आहे व आपण ते पेलले पाहिजे. यांमधून बहुजनांचा गौरवशाली इतिहास उजेडात येईल.

मंगळवेढा तालुक्यातील यात्राजत्रा, मंदिरे, तेथील स्थापत्यकला यांचा सखोल अभ्यास झाला पाहिजे. प्रत्येक गावामध्ये असणाऱ्या देवदेवतांच्या काहीएक कहाण्या, आख्यायिका आहेत. त्यांच्यामागे दडलेला सांस्कृतिक इतिहास शोधणाऱ्या दृष्टीची गरज आहे. लोकसंस्कृतीच्या सत्यशोधनातूनच आपल्या मुळांचा खराखुरा शोध आपण घेऊ

शकू, असे मला वाटते.

**सामाजिक चळवळी/लढे**

मंगळवेढा तालुक्यामध्ये १९२० ते ३० च्या दरम्यान म. फुले यांची सत्यशोधक चळवळ जोरात होती. श्रीपतराव नागणे यांच्या नेतृत्वाखाली दत्ताजीराव लांडगे, नामदेवराव आवताडे, मारुतराव जावळे, नामदेवराव देशमुख वगैरे मंडळी सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीचे काम करून लोकजागृती करीत होती. सत्यशोधक पद्धतीने विवाह विधी, विधवा पुनर्विवाह, शेतकरी संघाची स्थापना, दामाजी मंदिराचा जीर्णोद्धार, शिक्षणविषयक जागृती इत्यादी मूलभूत स्वरूपाचे कार्य त्यांनी केले. दामाजी मंदिराच्या जीर्णो द्धाराच्या कामी वर्गणी/निधी गोळा करण्यासाठी १९२६ साली नारायण, केदारी घाडगे, नामदेव आवताडे, दत्तात्रय लांडगे वगैरे खानदेशामध्ये गेले होते. माचणूरच्या यात्रेमध्ये सत्यशोधक जलशांचे प्रयोग होत असत. दलित चळवळीम ध्येही कार्यकर्त्यांनी भाग घेतला. स्वातंत्र्योत्तर काळातही मंगळवेढ्यात काही आंदोलने, लढे झाले. उदा. चाळीस गावांचा पाणी प्रश्नासाठीचा लढा, शेतकरी संघटनेची आंदोलने वगैरे. अशा सामाजिक चळवळी/लढ्यांचा इतिहास लिहिला पाहिजे.

**सांस्कृतिक धोरण**

व्यक्तींचे वैचारिक व भावनिक भरणपोषण सांस्कृतिक घटक करीत असतात. आज गावागावातील माणसे सांस्कृतिकदृष्ट्या रिती दिसतात. टीव्ही. सोशल मीडिया वा राजकारणाच्या माध्यमातून आपला वरकड वेळ अक्षरशः वाया घालवितात. प्रत्येक गावाच्या अन्न, रस्ते, वीज, पाणी, घरे, शिक्षण अशा मूलभूत गरजा आहेत, तशी सांस्कृतिक गरजही असली पाहिजे. प्रत्येक गावाचे, तालुक्याचे, जिल्ह्याचे एक सांस्कृतिक धोरण असले पाहिजे, तरच विचारसंपृक्त समाज निर्माण होईल.

आपण मंगळवेढ्याचे एक सांस्कृतिक धोरण ठरविले पाहिजे. त्या अनुषंगाने पुढील काही बाबी कराव्यात असे मला वाटते-

१. मंगळवेढ्यातील ऐतिहासिक वास्तू, वस्तू, शिल्पे, मूर्ती इत्यादींचे संकलन करून त्यांचे एक संग्रहालय निर्माण करावे. म. बसवेश्वर व वारकरी संतांच्या जीवनकार्याचे, संतसाहित्याचे तसेच अरळी, सिद्धापूर, मुडवी येथे पुरातत्त्व विभागाने केलेल्या उत्खननाचे अवशेष संकलित करून त्याचे एक दालन या संग्रहालयात असावे. शास्त्रीय पद्धतीने या संग्रहालयाची निर्मिती करावी. संतांशी व इतिहासाशी निगडित स्थळांना ऐतिहासिक वारसा स्थळांचा दर्जा देऊन त्यांचा विकास करावा.

२. मंगळवेढ्याचा इतिहास, स्थानम हात्म्य, भीमा नदीचा रमणीय परिसर, म हामार्गाची सुविधा वगैरे पाहता मंगळवेढा-ब्रह्मपुरी परिसर पर्यटनहब विकसित करण्याच्या दृष्टीने अमर्याद संधी आहेत. येथे धार्मिक, ऐतिहासिक, नैसर्गिक, कृषी अशा पर्यटन प्रकारांचा मिलाफ झालेला आहे. भीमा नदीतून नौकाविहार करता येऊ शकतो. पंढरपूरला येणारा पर्यटक मंगळवेढा-ब्रह्मपुरी करून पुढे तुळजापूर, अक्कलकोटला गेला पाहिजे. पर्यटन हा प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे असंख्य लोकांना रोजगार देणारा व अत्यंत गतीने परिसराचा विकास करणारा उद्योग आहे. पर्यटनाचे महत्त्व लक्षात घेऊन यासाठी प्राधान्याने प्रयत्न करावेत.

३. मंगळवेढ्याच्या इतिहासलेखनाचा एक बृहद प्रकल्प हाती घेण्यात यावा. स्वातंत्र्योत्तर काळातील मंगळवेढ्याचे शिल्पकार, कर्तृत्ववान व्यक्ती, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक,

सहकार, आर्थिक, वैद्यकीय, पत्रकारिता, साहित्य, क्रीडा, उद्योग-व्यवसाय अशा विविध क्षेत्रांतील वाटचालीचा इतिहास शब्दबद्ध करण्याची नितांत आवश्यकता आहे. मंगळवेढा तालुक्यातील प्रत्येक गावाचाही एक इतिहास आहे. ऐतिहासिक, धार्मिक, भौगोलिक, शिक्षण, कृषी, निसर्ग अशा विविध अंगांनी प्रत्येक गावाचा इतिहास लिहिता येतो. अशा स्थानिक इतिहास लेखनातूनच वंचितांचा इतिहास (Subaltern History) समोर येऊ शकेल.

४. मंगळवेढा हा सांस्कृतिक व भाषिकदृष्ट्या अत्यंत समृद्ध तालुका आहे. परंतु त्यामधील अनेक बाबी आता काळाच्या ओघात कायमच्या नाहीशा होत आहेत. ग्राम ीण बोलीतील अनेक शब्द आज नामशेष होत आहेत. पारंपरिक कारागिरी संपत असून त्यांच्याशी निगडित शेकडो शब्द व त्यांचे ज्ञान विस्मृतीत जात आहे. कुंभार, सुतार, सोनार, लोहार, चांभार, कासार, तेली, बुरूड, कोष्टी, कोळी, पांचाळ यांसारख्या अनेक जातींनी आपले पारंपरिक व्यवसाय जवळ जवळ सोडून दिले आहेत. त्यामुळे या व्यवसायाशी निगडीत शेकडो शब्द, ज्ञान, शहाणपण कायमचे लुप्त होत आहे. पारंपरिक अवजारे, हत्यारे, भांडी, जाते, दागिने, पदार्थ, वाद्ये, कपडे, वनस्पती, औषधे, रोग यांसारख्या अनेक जुन्या गोष्टी कालबाहय होत आहेत. यामुळे बोलीमधील शेकडो शब्द, ज्ञान परंपरा व एक संस्कृतीच नामशेष होत आहे.

मंगळवेढा तालुक्यातील लोकखेळ, लोकवाद्ये, पारंपरिक व्यवसाय, कारागीर व त्यांच्याशी निगडित भाषिक व्यवहार, पारंपरिक पदार्थ, अवजारे, कपडे, वस्तू, भांडी, दागिने, वनस्पती, फुले, फळे, प्राणी, पक्षी, पिके, बियाणे, भाजीपाला, ग्रामीण बोलीतील शब्द वगैरेंचा सचित्र बृहत् कोश तयार करावा. यामुळे सांस्कृतिक व नैसर्गिक संचिताचे कायमस्वरूपी जतन होईल.

५. मंगळवेढा तालुक्यातील लोकसाहित्याचे संकलन, संशोधन व विश्लेषण केले तर इथल्या लोकमानसाचे शतकानुशतकांचे भावसंचित व ज्ञानपरंपरा आपल्या हाती येईल. लोकसाहित्य, लोक कला, लोकविद्या, लोकदेव, लोकसंस्कृती इ.चा अभ्यास करून ग्रंथरूपाने प्रकाशित करावा.

६. मंगळवेढा तालुक्यात अनेक भटक्या जमाती राहतात. उदा. पारधी, लमाण, डवरी, वडर, कैकाडी, घिसाडी, मरिआईवाले, कुडमुडे जोशी, वैदू, भोई इत्यादी जमातींची वैशिष्ट्यपूर्ण बोली व संस्कृती आहे. त्यांच्या बोलींचा सम ाजभाषावैज्ञानिक अभ्यास करण्याची कितीतरी संधी उपलब्ध आहे. त्याचबरोबर जमातीमधील समाजरचना, रूढीपरंपरा, विधी, देवदेवता, लोकजीवन, स्त्रीजीवन, व्यवसाय, अर्थकारण, शिक्षणाचे प्रमाण, स्थलांतर, प्रश्न, जातपंचायती, बदल वगैरेंचा सखोल अभ्यास झाला पाहिजे. अशा अभ्यासामधून त्यांच्या वर्तमान प्रश्नांची सोडवणूक करून विकासाचे अवकाश त्यांना खुले होऊ शकेल.

७. मंगळवेढा तालुक्यातील सीमावर्ती भागातील भाषेचा अभ्यास होण्याचीही नितांत गरज आहे. बोराळे, अरळी, सिद्धापूर, डोणज, नंदूर, कागष्ट, कर्जाळ, कात्राळ, हुलजंती, सोड्डी, शिवणगी इत्यादी गावांतील मराठीवर कन्नडचा झालेला प्रभाव, शिक्षणातील अडचणी, विद्यार्थ्यांच्या समस्या, भाषिक व्यवहार वगैरेंचा शास्त्रीय अभ्यास करून सीमावर्ती भाषकांच्या समस्यांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न केला पाहिजे.

८. मंगळवेढ्याच्या शिवारात व ग्रामीण भागात परंपरेने चालत आलेला अत्यंत सकस व दुर्मीळ असा देशी वाण आहे. उदा. ज्वारीचा

कुचकुची हा खास हुरड्यासाठीचा प्रकार. अशा दुर्मीळ बाबींचे जीआय मानांकन व पेटंट घेण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत. तसेच देशी वाणांची एक बँक तयार करावी.

९. वाङ्मयीन अभिरूची व वाचनसंस्कृती वाढविण्यासाठी खूप प्रयत्नांची गरज आहे. सध्या वाचतो कोण? काय वाचतो? या प्रश्नांना ग्रामीण भागात उत्तरेच नाहीत. द. सोलापूर तालुक्यातील कुंडल येथे इ. स. १०१८ सालच्या लेखामध्ये 'वाछि तो विजेया होईआ' असे वाचनाचे कालातीत महत्त्व कोरलेले आहे. 'वाचेल तोच विजयी होईल' हा आपल्या पूर्वजांनी एक हजार वर्षांपूर्वी दिलेला संदेश आपण आज तरी आचरणात आणण्याचा संकल्प करू या.

वरील बाबींसाठी समाजाने आग्रह धरून दबावगट निर्माण केला पाहिजे. शासन राजकीय नेतृत्व, सामाजिक जाणिवांच्या व्यक्ती/ संस्था आदींच्या आर्थिक, बौद्धिक सहयोगातून समूहभावनेने वरील संकल्प पूर्णत्वास जाऊ शकतील.

**संदर्भ ग्रंथ**


१. इंगोले कृष्णा : सोलापुरी साहित्य परंपरा, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, २०१२
२. कुंभार आनंद : संशोधक त्रैमासिक, मार्च २००१, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
३. देशमुख गोपाळराव : दोन राजधान्या, मंगळवेढा ब्रह्मपुरीचा इतिहास, कौसल्या प्रकाशन, सोलापूर, २०१४
४. देशपांडे प्र. न., भामरे सर्जेराव (संपा.): मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड १० वा, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, २००९
५. देशपांडे ब्रह्मानंद : शोधमुद्रा खंड दुसरा, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
६. पाठक अरुणचंद्र व इतर (संपा.) : महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर : इतिहास : प्राचीन काळ (खंड १), दार्शनिका विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मुंबई, २०१०
७. शहा मु.ब.(संपा.): समग्र राजवाडे साहित्य खंड ११, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, १९७८
८. शहा मु.ब.(संपा.) इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य (खंड चौथा), इतिहासाचार्य राजवाडे यांचे अभिलेख संशोधन, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, १९९८
९. त्रैमासिक ६९-भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९९१
१०. Gazeteer of the Bombay Presidency (Facsimile Reproduction), Kolhapur District, originally printed in 1886, Volume XXIV, Published by - The Executive Editor and Secretary Gazeteers Dept, Govt of Maharashtra, Mumbai. Printed at The Govt. Photo zincogrophic Press Pune, 1999.




# चोखोबाची अभंग जीवनगाथा



**ह.भ.प.कृष्णा रघुनाथ शेंबडे**
संत चोखामेळा समाधीचे सेवेकरी, मंगळवेढा

ऊस डोंगा परि रस नोव्हे डोंगा ।
काय भुललासि वरलिया रंगा ।।
नदी डोंगी परि जळ नोव्हे डोंगे ।
काय भुललासि वरलिया रंगे ।।
चोखा डोंगा परि भाव नोव्हे डोंगा ।
काय भुललासि वरलिया रंगा ।।

अशा आपल्या भक्तीपूर्ण अभंगवाणीतून पंढरीच्या पांडुरंगाशी संवाद साधणारे संत चोखामेळाचे वास्तव्य मंगलमय व पावन अशा या मंगळवेढ्यातच होते. मंगळवेढ्याची भूमी ही संतांची भूमी आहे. त्याच भूमीमध्ये संत दामाजी पंत, संत कान्होपात्रा, संता चोखामेळा, संत गोविंदबुवा, संत मोहिनीबुवा यासारखे संत होऊन गेले. आपल्या दातृत्वाने व प्रत्यक्ष पंढरीच्या राण्याला ज्या दामाजीपंतांनी भूलविले

त्याच परिसरात आपल्या भक्तीने पांडुरंगाला आपलेसे करून घेणारा कैवल्याच्या चांदण्याशी आपल्या भक्तीने ह्रदयाच्या तारा जोडणारा संत चोखामेळा हा संतांचा शिरोमणी एका हीन समजल्या गेलेल्या अशा अस्पृश्य जातीमध्ये जन्माला आलेला होता.

भारतीय समाजातील वर्ण व्यवस्था ही माणसांचं माणूसपण नाकारणारी अशी होती. विशिष्ट जातीच्या आणि तथाकथित उच्चवर्णियांनाच केवळ ज्ञान आणि भक्ती संपादित करण्याचा त्यावेळी अधिकार होता. त्यामुळे भक्ती करण्याचा परमेश्वाशी सुसंवाद साधण्याचा किंवा विद्या ही केवळ उच्चवर्णियांचीच मक्तेदारी होती, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. पण अशा प्रकारच्या मक्तेदारीलाही न जुमानता तेराव्या शतकात आपल्या भक्तीने व श्रद्धेने संत चोखोबाने अठ्ठावीस युगे विटेवर उभ्या असणाऱ्या त्या रुक्मिणीवराला अडकविलेले होते.

तशीच संत चोखामेळा यांची जीवनगाथा आज निश्चित अशा पुराव्यानुसार उपलब्ध नसली, तरीदेखील त्यांचा जन्मासंबंधी ज्या लोककथा-सांगीवांगी-सध्या प्रचलित आहेत. त्यावरून असे म्हणता येईल, की संत चोखामेळा यांचे आई-वडील कोरेगावचे राहणारे. या उभयतांनी आपल्या बाळाचे नाव चोखामेळा असे ठेवले. पुढे कुटुंब पंढरपुरातच राहत असे.

लहानपणापासूनच चोखोबाराया त्या निर्गुण निराकार अशा पांडुरंगाचे वेड लागले व पुढे पुढे त्यांचे संपूर्ण जीवनच विठ्ठलमय होऊन जाते. पण पांडुरंगाची भक्ती करताना त्यांची जात त्यांना आडवी येत होती. मनाने निर्मळ असणाऱ्या चोखोबारायांनी प्रत्यक्ष विठ्ठलास साकडे घातले.

**बहुत प्रकार बहुत या जगाचे ।**
**काय वानू त्याचे गुणदोष ।।**
**मीच हे याती अनामिक नाव ।**
**तेथे भावाभाव कोण कैसा ।।**
**चहाड चोर जार भ्रष्ट ते साचे ।**
**हीन तो जन्माचे पदरी आहे ।।**
**चोखा म्हणे त्याचे संगती पडिलो ।**
**बहु हे पिडिलो वियोगाने ।।**

असे म्हणत असताना भक्तीत व श्रद्धेत कधी खंड पडू दिला नाही. चोखामेळ्याच्या या भक्तीने व श्रद्धेने पांडुरंगाने त्यांना प्रत्यक्ष दर्शन दिले व आपल्या गळ्यातील नवरत्नांचा हार त्यांच्या गळ्यात घातला. पण भक्तीची व विद्येची मक्तेदारी असणाऱ्या सनातनींनी चोखोबारायांनी पांडुरंगाचा तो हार चोरला म्हणून त्यांना मारहाण केली. त्यावेळी चोखोबारायांचे मन समाजातील त्या जातीयतेविरूद्ध आक्रंदले. ते आपल्या अभंगात म्हणतात...

**धाव घाली विठू आता चालू नको मंद ।**
**बडवे मज मारिती ऐसा काही तरी अपराध ।।**
**विठोबाचा हार तुझ्या तुझ्या कंठी कैसा आला।**
**शिव्या देती महारा म्हणती देव बाटविला ।।**

या हीन जातीमुळे चोखोबारायांच्या सारे जीवनभर छळ केला गेला, तेव्हा ते म्हणतात...

**शुद्ध चोखामेळा करी नामाचा सोहळा ।**
**मी यातीहीन महार पूर्वी निळाचा अवतार ।।**
**कृष्ण निंदा घडली होती**
**म्हणून महार जन्म प्राप्ती ।**
**चोखा म्हणे विटाळ आम्हा पूर्वीचे फळ ।।**

आपल्या जात बांधवांच्या परिस्थितीचे वर्णन करतांना त्यांचे अंतरंग तीळतीळ तुटताना दिसते. ते म्हणतात...

**येथे तो संग आहे दुर्जनांचा ।**
**म्हणोनी शीण त्याचा होत आहे ।।**
**यातीचा प्रकार अमंगळ खाणार ।**
**मद्य मांस आहार करिताती ।।**
**मुखे ते वाईट बोलती कश्मळ ।**

**तेणे हळहळ जीव करी ।।**
**चोखा म्हणे देवा ऐसा पडिलो काचणी ।**
**सोसू हे जाचणी कोठवरी ।।**

संत चोखामेळा यांच्या या भक्तीच्या मळ्यात त्यांची सहचारिणी सोयराबाई मागे राहिली नाही. आपल्या पतीची सेवा व पांडुरंगाची भक्ती करण्यातच तिच्या जीवनात भक्तीचा मळा फुलला. ती सोयराबाई देखील या जातीयतेविरूद्ध बंड करताना दिसून येते. ती आपल्या अभंगातून तथाकथित भक्तीचा विद्येचा मक्ता घेतलेल्या सनातन्यांना व प्रत्यक्ष पांडुरंगालाही ती सांगते...

**देहासि विटाळ म्हणती सकळ ।**
**आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध ।।**
**देहिचा विटाळ देहिच जन्मला ।**
**सोवळा तो जाहला कवणधर्म ।।**
**विटाळ वाचोनि उत्पत्तीचे स्थान ।**
**कोण देह निर्माण नाही जगी ।।**
**म्हणोनि पांडुरंगा वानितसे थोरी ।**
**विटाळ देहांतरी वसतसे ।।**
**देहिचा विटाळ देहीच निर्धारी ।**
**म्हणे महारी चोखियाची ।।**

सावळ्या विठुच्या भक्तीमध्ये तल्लीन झालेल्या चोखोबाला उदरनिर्वाहासाठी मंगळवेढ्यात यावे लागले. मंगळवेढ्यात गावकुसामध्ये एक मजूर म्हणून काम करीत असताना त्यांनी आपल्या हरिनामामध्ये कधीही खंड पडू दिला नाही. पण वैशाख वै. पंचमी शके १२६० या दिवशी अंगावर गावकूस पडून या संत शिरोमणीचा अंत झाला. असा दृष्टांत विठ्ठलाला झाल्यावर त्यांनी आपल्या या भक्ताचा अस्थि पंढरपूरास आणण्याचे काम संत नामदेवास सांगितले, पण त्या गावकूसामध्ये अनेक मजूर गाढले गेलेले असल्याने 'संत चोखोबाच्या अस्थि कोणत्या?' अशी चिंता नामदेवाला पडली. पण पांडुरंगाने सांगितले, की ज्या हाडामधून विठ्ठल विठ्ठल असा हरिनामाचा गजर चालू असेल ती हाडे गोळा करा. म्हणजे मृत्यूनंतरही ज्या चोखोबाची हाडे विठ्ठल विठ्ठल असा नामघोष करीत होती. त्या चोखोबारायांना आयुष्यभर जातीयतेचा हीन डंख सलत राहिला. एका अभंगात ते म्हणतात...


**जोहार मायबाप जोहार ।**
**तुमच्या महाराचा मी महार ।।**
**बहु भुकेला जाहलो ।**
**तुमच्या उष्ट्यासाठी आलो ।।**
**बहु केली आस ।**
**तुमच्या दासाचा मी दास ।।**
**चोखा म्हणे पाटी ।**
**आणिली तुमच्या उष्ट्यासाठी ।।**

असा हा संत शिरोमणी आपल्या भक्तीने व श्रद्धेने पांडुरंगाला वेड लावणारा चोखोबाराया ह्या मंगळवेढ्याच्या पावन भूमीत विठ्ठल चरणी विलीन झाला.



# परिस स्पर्श संत चोखामेळा संत सोयराबाई व संत निर्मळा

**सौ. वैशाली कोळेकर**
प्राचार्या, भारतमाता ज्ञानपीठचे,
सौ विजयमाला पतंगराव कदम प्राथ. माध्य.
व उच्च माध्य. विद्यालय, विटा.



बाराव्या शतकात महाराष्ट्रात संतांनी जे अनमोल कार्य केले तसे जगात कोठेही झाले नसेल. इथे भारतभूमीत त्यात महाराष्ट्रात समाजाचे समाजपण हरवलेले होते. जातीभेदाचे काटेरी कुंपण समाजाला ओरबडत होते. राजकीय स्थिती ही अस्थिरतेच्या भोवऱ्यात सापडली होती. माणसे स्वतः आणि कुटुंब यात फार गुरफटली होती. या भयाण काळात सर्व संत मात्र या धरतीच्या लेकरासाठी माणूसकीचा नवा धर्म स्थापन करीत होते. मानवकल्याणाचे वैभव निर्माण करीत होते. महाराष्ट्रभूमी

हीच आमची जननी, पांडुरंग हे आमचे वैभव, आणि सर्व जाती बांधव हे आमचे धन असे मानून संत कार्य करीत होते. समाजाला समतेची जाणीव व्हावी, समाजात जागृती व्हावी, म्हणून सर्व संत प्रयत्न करीत होते. समाजाला मोठा धिर देत होते. हिंदू धर्माची मिरासदारी मिरवणाऱ्या धर्ममार्तंडानी देवालाच बंदिस्त करून ठेवलेले होते. त्यावेळी संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव जीवावर उदार होऊन सामाजिक सौख्याचा आणि जातीभेद नष्ट करण्याचा प्रयत्न करीत होते.

संत नामदेवांचा परीसस्पर्श संत चोखोबा यांना झालेला होता. त्यामुळे त्यांच्या आणि त्यांच्याबरोबर अनेक बांधवांच्या जीवनाचे सोने झाले. गावकुसाबाहेर वाढलेल्या या माणसांना नामदेवांनी नवी संजिवनी दिली. स्त्रियांना तुच्छतेची वागणूक दिल्या जाणाऱ्या त्या काळात संत सोयराबाई अजरामर अभंग रचना करू शकल्या. संत चोखोबांची बहीण संत निर्मळा याही भक्तीरसात तल्लीन होऊन अभंग रचना करू लागल्या. ही प्रचंड पुण्याई संत नामदेवाच्या परिस्पर्शाने झाली. या कुटुंबाला तुम्हीही भगवंताची लेकरे आहात. तुम्ही कमी नाही. सर्वश्रेष्ठ आहात ही जाणीव करून दिली हे फार मोठे कार्य त्या काळात झाले.

संत नामदेवाच्या परीस्पर्शाने चोखोबांचे सोने झाले. संत चोखोबा स्वतः परीस बनले. त्यांच्या विचाराने संत सोयराबाई संत निर्मळा यांचेही सोने झाले. चोखोबा, सोयराबाई आणि निर्मळा यांचे अभंग फार उच्चकोटीतील आहेत. यामध्ये वेगळे संस्कार जाणवतात. संस्कारामुळे येणारी सुकरता, सहजता, तत्परता, अचूकता आणि अनुकूलता हे गुण या अभंगात सहजी सापडतात. वर्तनातील परिवर्तन म्हणजे संस्कार असे विद्वान मानतात. हे परिवर्तन या चोखोबा, सोयराबाई आणि निर्मळाबाई यांच्यामध्ये झालेले आहे.

**देहासी विटाळ म्हणती सकळ ।**
**आत्मा तो निर्मळ शुद्धबुद्ध ।।**
**देहीचा विटाळ देहीच जन्मला ।**
**सोवळा तो झाला कवन धर्म ।।**
**विटाळा वाचूनी उत्पत्तीचे स्थान ।**
**कोण देह निर्माण नाही जगी ।।**
**म्हणून ही पांडुरंगा वाणीत असे थोरी ।**
**विटाळ देहांतरी वसतसे ।।**
**देहीचा विटाळ देहीच निर्धारी ।**
**म्हणत असे महारी चोखियाची ।।**

असे परखडपणे त्या काळात सांगणे सोपे नव्हते. पण सोयराबाई ते सांगतात यावरून त्यांच्या विशाल अंत:करणाची आणि प्रगल्भ बुद्धिमत्तेची जाणीव आज झाल्याशिवाय राहत नाही. त्यांच्या ठिकाणी असलेला आत्मविश्वास प्रगट होतो. त्या किती खमक्या स्त्री होत्या हे जाणवते. त्यांचा ठाम निर्धार ही जाणवतो.

**सुखाचे हे नाम आवडीने गावे ।**
**वाचे आळवावे विठोबासी ।।**
**संसार सुखाचा होईल निर्धार ।**
**नामाचा गजर सर्वकाळ ।।**
**काम क्रोधाचे न चलेची काही ।**
**आशा मनशा पाही दूर होती ।।**
**आवडी धरूनी वाचे म्हणे हरी हरी ।**
**म्हणत असे महारी चोखियाची ।।**

समाजाला प्रचंड विश्वास देणारा आणि भक्तीचे महत्त्व सांगणारा सोयराबाईंचा अभंग मानव कल्याणाची ग्वाही देतोय. सुखी जीवन कसे प्राप्त करून घ्यावे, हे सोयराबाई समजावतात. त्या किती थोर तत्त्ववेत्या होत्या. त्यात त्यांची जाणीव किती उच्च दर्जाची होती, काम क्रोधाने जग नासते मग त्यावर विजय मिळवायचा मार्ग त्या सांगतात. अशा निराशा या भंगणाऱ्या मूर्तीवर विजय मिळवायची कला त्या सूचित करतात. जीवन जगण्यातला उच्च

कोटीचा आनंद त्या सांगतात. पांडुरंगाची भक्ती म्हणजे माणसाचे व्यक्तिमत्त्व सुसंस्कारित आणि गुणसंपन्न करणारी शक्ती आहे असे संत सोयराबाई सांगतात. मराठी माणसाचे लोकजीवन बदलले पाहिजे, जुन्या रुढी परंपरा टाकून मोकळे झाले पाहिजे, जीवनाचे चिंतन वाढले पाहिजे, अशा सर्व अभंग रचना संत सोयराबाई यांच्या आहेत.

**विदूरा घरच्या पातळ कण्या ।**
**खासी मायबापा धन्या ।।**
**द्रोपदीच्या भाजीपाना ।**
**तृप्ती झाली नारायणा ।।**
**तैसी झाली येणे परी ।**
**म्हणे चोख्याची महारी ।।**

माणसाच्या बुद्धिचे भरण पोषण करणारे ग्रंथ, ऐकून सोयराबाईने आत्मसात केलेले होते. तसेच विठ्ठल भक्तीची मोठी साधना या चोखोबांच्या कुटुंबांनी केलेली होती. तिथल्या कामगार, शेतमजूर, सर्वसामान्य माणसात त्यांच्या रोजच्या जगण्यात, दिव्यत्वाचे अवतरण घडवणे आणि सर्वसामान्य माणसातून जिद्दी कणखर महामानव उभा करणे. मोठा समाज बांधणे. हे कार्य चोखोबाच्या कुटुंबाने केले होते. नामदेव आणि इतर समकालीन संत मंडळींनी यांना मोलाचे सहकार्य केले. माणसाच्या रोजच्या जगण्याचे भानच दिव्यत्वाकडे नेण्याचा प्रयत्न केला. रोजच्या जगण्याची भ्रांत असणाऱ्या सर्व सामान्य लोकांना आपल्या अभंगातून संस्कृतीचे भान शिकवले. सर्वसामान्यात प्रिय असणारे राजकारण, समाजकारण, चहाडी, मद्यपान, चुगली, विषयभोग, चंगळवाद, डावपेच, कुटिलता, मुखवटे यांचे पासून लोकांना दूर ठेवायचा प्रयत्न संत चोखोबाच्या सर्व कुटुंबांनी केलेला आहे. पांडुरंगाच्या भक्तीचे शुद्ध विचार त्यांनी जनतेला दिलेले आहेत. माणसात आत्मशुद्धीचा आणि दिव्यत्वाचा साक्षात्कार घडवायचा कसोशीने प्रयत्न केलेला आहे.

संत श्रेष्ठ नामदेव आणि संत श्रेष्ठ ज्ञानदेव यांच्या सहवासात आलेले सर्व संत म्हणजे खूप मोठी माणसे होती. त्यांनी स्वतःत एवढा बदल घडवला होता की व्यक्तदिशेला आलेले देवपण त्यांना प्राप्त झालेले होते. ते सर्वजण माणसा सारखीच माणसे होती पण; देव माणसे होती. देवपणा प्राप्त झालेली, माणसाच्या रूपातील देव माणसेच होती. माणसातला देव सर्वसामान्य माणसाला दाखवायचा हे संत प्रयत्न करत होते. न्हवे दाखवीत होते.

**अवघा रंग एक झाला ।**
**रंगी रंगला श्रीरंग ।।**
**मी तू पण गेले वाया ।**
**पाहता पंढरीचा राया ।।**
**नाही भेदाचे ते काम ।**
**पळोनी गेले क्रोध काम ।।**
**देही असूनही तू विदेही ।**
**सदा समाधीस्थ पाही ।।**
**पाहते पाहणे गेले दुरी ।**
**म्हणे चोख्याची महारी ।।**

सोयराबाई या चोखोबांच्या परीस्पर्शाने सोन्याहून पिवळे उच्च दर्जाचे विचार मांडणारी ही स्त्री विदुषी होती. संसारात रोजच्या असंख्य समस्यांना तोंड देत हीन जातीत जन्मल्यामुळे रोज शिव्याशाप खाते. नेहमी तुच्छ वागणुकीला ती सामोरी जाते. आपल्या रोजच्या कटकटीवर मात करते. श्रीरंगाचे रंग उलगडून दाखवते. ही त्या काळातील अजब घटना आहे आणि म्हणूनच सोयराबाई आणि त्यांची कविता महान बनते आहे. त्यांची कविता मस्तक उन्नत करणारी आणि कोणाही स्त्रीला अभिमान वाटावी अशी श्रेष्ठ दर्जाची आहे.

संत निर्मळा याही प्रतिभावंत आणि बुद्धिमान कवयित्री आहेत. कर्मभक्ती, ज्ञान त्यांना आपल्या अभंगात महत्त्वाचे स्थान दिलेले आहे.

आपल्या ठिकाणी जाणीवपूर्वक चांगले राहणे, चांगले जगणे, हेच खरे जीणे आहे असे त्या मानतात. आपल्या ठाई जाणीवपूर्वक चांगले जगणे हेच खरे जीणे आहे असे त्या आपल्या अभंगातून सांगतात. कवयित्री निर्मळा यांचे अभंग म्हणजे बुद्धिमान, विचारप्रेमी संत पदाला पोहोचलेल्या व्यक्तीने सत्य शोधनासाठी केलेली धडपड आहे. सत्यम शिवम सुंदरम अशा विचारांची पेरणी त्यांच्या अभंगातून होते आहे.

**अनंत जन्माचे सुकृत पदरी ।**
**तोची उच्चारी हरिनाम ।।**
**अनंत जन्माचे जयासाठी ।**
**तोची उच्चारी ओठी हरिनाम ।।**
**अनंत जन्माचे तपादी साधन ।**
**तोचि नारायण जपे नाम ।।**
**अनंत जन्माची जोडी येली जोडी ।**
**तरीच लागे गोडी हरिनामी ।।**
**निर्मळा म्हणे अनंत जन्माचे ।**
**उच्चारीता वाचे पाप जाय ।।**

संत निर्मळांना जीवनाचे रहस्य सापडलेले आहे. त्यांचा जीवन चिंतनाचा ओघ अफाट आहे. मी खरी कोण आहे? मी कुठून आले? कुठे जाणार? मानव जन्माचे कोणते फळ आहे? हे प्रश्न निर्मळा आपल्या अभंगातून उकलून दाखवत आहेत. मुख्य म्हणजे मानवी जीवनाचे सत्य भान त्यांना आहे. माणसाच्या वैयक्तिक आणि सामुदायिक उन्नतीसाठी विठ्ठल भक्ती आहे हे महानतेचे तत्त निर्मळाना समजलेले आहे. त्या आर्ततेने विठ्ठलाला विचारतात.

**चहुकडे देवा दाटला वणवा ।**
**का न ये कनवा तुझं लागे ।।**
**सापडली संधी संसाराचे अंगी ।**
**सोडवी लगबगी मायबापा ।।**
**बहु मज उबग आली असे देवा ।**
**धावे तू केशवा लवलाही ।।**
**तुजविण मज कोण गणगोत ।**
**तुची माझा हितकरता देवा ।।**
**निर्मळा म्हणूनी पायी घाली मिठी ।**
**परतते न लोटी मायबापा ।।**

संसारात कंटाळलेल्या जीवांची निर्मळा जणू मांडणी करत आहेत. संत सोयराबाई व संत निर्मळा यांच्या अभंगातून क्षणोक्षणी सत्याचे दर्शन घडते आहे. खरे सुख कशात असते, ते असते आपल्या हृदयाच्या आविष्कारात. आपल्या मनात नवा आनंद उमलणे म्हणजे सुख असते. सुख क्षणाचा मोक्षच असतो. आणि मोक्ष हेच कायमचे सुख असते. फुलांचा सुगंध हा फुलांच्या पाकळ्यात असतो. आपले सुख आपल्या मनात उमलते. असे सुख भरभरून वाटायचे म्हणजे लोकांना सांगायचे काम चोखोबाच्या या संत सोयराबाई आणि संत निर्मळा यांनी केलेले आहे. जगण्याचे साधे सोपे तत्त्वज्ञान या दोघी मांडतात. निरामय मानसिक आनंद या दोघीच्या अभंग रचनेत आहेत. त्याचा अभ्यास पूर्णत्वाने झाला पाहिजे. या दोघी महान कवयित्री होत्या. विचार, भावना, जिज्ञासा आणि समाज उन्नतीची कळकळ त्यांच्या अभंगातून ठाई ठाई जाणवते. नामस्मरणाचा आनंद पैलं तिरावर नेईल मग आनंद शोधवा लागणार नाही. फुलाचा सुगंध फुलात आहे. फळाचा गोड रस फळात आहे. आपला आनंद आपल्यातच काठोकाठ भरलेला आहे. हे या दोघी अभंगाच्या ओळी ओळीतून सांगताहेत.



# संत सोयराबाईच्या अभंगातील जात उतरंडीवर भाष्य

**प्रा विनायक मनोहर कलुबर्मे**
श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा
सदस्य, वारी परिवार, मंगळवेढा

महाराष्ट्राला संतांची फार मोठी परंपरा आहे. याच संतांनी महाराष्ट्राला व एकूणच मराठी भाषेला साहित्याचा मोठा वारसा दिला आहे. अशा संतांच्या मंदियाळीतील संत सोयराबाई या संत कवयित्री असून संत चोखामेळा यांच्या धर्मपत्नी होत्या. म्हणूनच त्या आपल्या अभंगात 'चोखियाची महारी' असा स्वत:चा उल्लेख करतात. चोखोबाची बायको असे अभिमानाने म्हणवून घेणाऱ्या संत सोयराबाईंनी आपले स्वतःचे वेगळेपण सिद्ध केले आहे. त्यांच्या अभंगात साधी, सोपी आणि रसाळ व तितकीच परखड भाषा ओतप्रोत भरलेली आहे. संत सोयराबाईंनी अनेक अभंग लिहिले आहेत. त्यांचे संपूर्ण कुटुंबच जातीव्यवस्थेला प्रश्न विचारणारं आणि पददलितांचं जगणं वेशीला टांगणारं पहिलं कुटुंब ठरलं. अशातच आधीच सोयराबाई महार आणि त्यात बाई म्हणजे सोयराबाईचं जगणं आणखी एक पायरी खाली! नवऱ्याबरोबर मेलेली ढोरं गावाबाहेर ओढून नेता नेता या संत बाईनं सांगितलेलं जगण्याचं तत्त्वज्ञान अचंबित करतं

**अवघा रंग एक झाला।**
**रंगी रंगला श्रीरंग ।।**
**मी तूं पण गेले वाया ।**
**पाहतां पंढरीराया ।।**

असा नितांत सुंदर अभंग लिहिणाऱ्या सोयराबाईंना जातीव्यवस्थेचा खूप त्रास सहन करावा लागला. जातीभेद आणि वर्णव्यवस्थेचे अवडंबर माजलेल्या त्या वेळच्या समाजात संत सोयराबाई बंड करून उठतात आणि देवालाच परखडपणे विचारतात. देहात विटाळ असतो मग देह कोणी निर्माण केला? सोयराबाईंना असा

विश्वास होता, की केवळ शरीर अपवित्र असू शकते; परंतु आत्मा कधीही अशुद्ध नसतो. हे सांगताना त्या म्हणतात

**देहासी विटाळ म्हणती सकळ ।**
**आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध ।।**
**देहीचा विटाळ देहीच जन्माला ।**
**सोवळा तो झाला कवण धर्म ।।**

शुद्रांच्या सावलीचाही विटाळ होणाऱ्या काळात, सोवळ्या ओवळ्याच्या कल्पना घट्ट असताना, कुणीही देहाच्या विटाळाबद्दल बोलत नसताना, संत सोराबाईंनी देवालाच रोख ठोक सवाल केला आहे. संत सोयराबाईच्या संपूर्ण कुटुंबास समाजानं भरपूर त्रास देऊन छळ केला. आयुष्यभर खालच्या जातीचे म्हणून हिणवलं गेलं, मारही खाल्ला आणि हीच मनातील वेदना मांडताना म्हणतात

**हीन दीन म्हनोनी कां गा मोकलिलें ।**
**परी म्यां धरिले पदरी तुमच्या ।।**
**आतां मोकलितां नव्हे नित बरी ।**
**थोरा साजे थोरी थोरपणें ।।**

भक्तीत चोख असणाऱ्या आपल्या पतीला अस्पृश्य म्हणून पंढरपुरातील मंदिरात प्रवेश दिला जात नव्हता. विठोबाच्या दर्शनासाठी आस धरल्याची शिक्षा म्हणून बडव्यांनी चोखोबाला कोंडून मारलं. चामडी लोळवली. तरीही मंदिराच्या पायरीजवळ उभा राहून थेट विठोबाला जोहार मायबाप जोहार म्हणणाऱ्या आपल्या कुंकवाच्या धन्यासाठी संत सोयराबाई विठ्ठलाला साकडं घालताना म्हणतात...

**आमची तो दशा विपरीत झाली ।**
**कोण आम्हा घाली पोटामध्ये ।।**
**आमचें पालन करील बा कोण ।**
**तुजविण जाण दुजें आतां ।।**

खरं तर तो काळच तसा होता की जाती व्यवस्थेचे बुजगावणे समाजाच्या नरडीस डसले होते. देव सर्वांचा असला, तरी महारांचे स्थान पायरीशी, त्याला दिनांचा कळवळा नाही, हा मनातला राग व्यक्त करीत सोयराबाई विठोबालाच खडसावतात...

**कां बा उदास मज केलें ।**
**कोण म्हणे तुम्हां भलें ।।**
**आम्ही बैसलोंसे दारी ।**
**दे दे म्हणोनी मागतों हरि ।।**
**ही नीत नव्हे बरी ।**
**म्हणे चोखियाची महारी ।।**

यातून जातीव्यवस्थेविषयी त्यांच्या मनातील चीड आणि जगण्यातलं वास्तव फार रोखठोकपणे जाणवतं. सुखात हजार वाटेकरी असतात मग दुःखच आमच्या एकट्याच्या वाट्याला का येतं? हे सोयराबाईंनी अगदी सोप्या शब्दांत सांगितले ...

**अवघे सुखाचे सांगाती ।**
**दुःख होता पळती आपोआप ।।**
**भार्या पुत्र भगिनी माता आणि पिता ।**
**हे अवघे सर्वथा सुखाचेची ।।**

संत सोयराबाई आत्मा परमात्म्याचं नातं उलगडणारी, घर-संसार सांभाळणारी गृहिणी आहे. अपत्यासाठी आस लावून बसणारी आई आहे. नवऱ्याची वाट पाहणारी स्त्री आहे. साक्षात विठोबाला जेवायचं आवतन देणारी सुगरण आहे; पण त्याहीपेक्षा जास्त जाती पातीच्या उतरंडीवर प्रहार करणारी संत कवयित्री आहे. अजूनही मानवी मनामध्ये एखादी पाल भिंतीला चिकटून बसावी, तशी जात प्रत्येकाला चिकटून बसली आहे आणि म्हणूनच मला म्हणावे वाटते, चला तर मग संत सोयराबाईंच्या विचारांची कास धरूया आणि जातीपातीच्या उतरंडी पाडून टाकूया!

# ब्रह्मज्ञान वाउग्या गोष्टी

डॉ. दत्ता सरगर



'देहीचा, विटाळ देहीच जन्मला' असं चौदाव्या शतकात, पति निधनानंतर तथाकथित सोवळ्यांना बजावणाच्या संत सोयरामाई वा त्या काळी अस्पृश्य मानवल्या जाणाऱ्या समाजातल्या पहिल्या महिला संत! संत चोखामेळा यांनी पुराण पठण यज्ञ यांच्यातच अडकलेल्या 'ब्रह्मज्ञानाचाही धिक्कार करण्याची वैचारिक हाक दिली होती, ती पुढे नेण्याचं काम सोयराबाईनी केलं.

सोयराबाई या संत चोखोबा महाराजांच्या पत्नी आहेत. तेराव्या शतकातील संत चोखा महाराज यांनी धार्मिक व्यवस्था किंवा जातिव्यवस्थेच्या विचारांना आव्हान दिले आहे. त्यांचे सर्व अवैज्ञानिक वेद, पुराणे, यज्ञ, हवन याविषयी आपल्या अभंगातून ठणकावून सांगताना त्या म्हणतात.

**धिक ते पठण धिक ते पुराण ।**
**धिक ते यज्ञ हवन केले त्याने ।।**
**धिक ते ब्रह्मज्ञान वाउग्या गोष्टी ।**
**दया क्षमा पोटी शांती नाही ।।**
**उदंड ब्रह्मज्ञान सांगताती गोष्टी ।**
**परि अनुभव कसवटी एका नाही ।।**

संत चोखोबा धर्ममार्तंडांची कानउघाडणी करताना म्हणतात की, तुम्ही वेद-शाखांचं रोज पठण करता, यज्ञ हवनही करता, परंतु जर तुमच्याठायी इतरासंबंधी, त्यांच्या प्रती दया, क्षमा, शांती, करुणा या मानवतावादी गोष्टींचा जराही अनुभव नसेल तर, तुमच्याकडे कितीही मोठं ब्रह्मज्ञान असलं तरी त्याचा काही उपयोग नाही. मग या सर्व गोष्टी फोल आहेत. अर्थात या सर्व गोष्टी वावग्या आहेत, त्यामुळे तुमच्या पुराण, पठण, यज्ञ-हवन आणि तथाकथित ब्रह्मज्ञानाचाही धिक्कारच करायला हवा. परंतु चोखोबांची किंबहुना बहुजनांची शोकांतिका अशी

की, या जातीयवाद्यांमध्ये, धर्ममार्तडांमध्ये काही एक परिवर्तन न होता. उलट त्यांनी षडयंत्र रचून संत चोखोबांचा घातपात घडवून आणला व त्यांना कायमचंच मिटवण्याचा प्रयत्न केला. ही घटना १३३८ सालची. ज्ञात इतिहासातली या घटनेबद्दलची नोंद अशी की, गावाची तट-भिंत बांधण्यासाठी मुद्दामहून चोखोबारायांना बोलावून आणण्यात आले आणि ही भिंत बांधतेवेळी कोसळून अन्य काही मजुरांसह चोखोबांचा मृत्यू झाला.

ज्यांना भारतीय इतिहासाचे संशोधक असं आदराने संबोधलं जातं, ते युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजव्यवस्थेचे संशोधनात्मक विचारांचं प्रसिद्ध, लोकप्रिय 'द अनटचेबल्स' हे पुस्तक संत चोखोबांना, मोठ्या आदराने अर्पण केलं आहे. ही चोखोबांच्या मानवतावादी आणि त्यांच्या काळात विज्ञानवादीच ठरणाऱ्या विचारांना उजाळा देणारी कृती होती.

पण चोखोबांनंतर त्यांच्या विचारांची पहिली पाईक म्हणजे त्यांची पत्नी सोयराबाई. संत चोखोबांच्या मृत्यूने घाबरून न जाता, सोयरामाईंनी पतीच्या उर्वरित मानवतावादी, समाजप्रबोधनात्मक, विज्ञानवादी विचारांची कास धरली. समता, न्याय, बंधुता, स्वातंत्र्य आणि विज्ञानाची जाणीव बहुजनांमध्ये निर्माण व्हावी म्हणून मोठ्या जोमाने धर्ममार्तंडांशी, जातीयवाद्यांशी विचारांचा लढा देऊन, अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या समाजातील पहिल्या महिला संत होण्याचा मचू मिळवला. संत सोयरामाईंनी रूढी, परंपरा, अस्पृश्यता आणि विटाळाच्या विरोधात लढा दिला, बहुजनांचं प्रबोधन करताना, स्वयंघोषित उच्चवर्णीयांनाही समज देताना जातिव्यवस्थेने लादून दिलेल्या विटाळाचा समाचार घेताना, त्या म्हणतात,

**देहासी विटाळ म्हणती सकळ ।**
**आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध ।।**
**देहीचा विटाळ देहींच जन्मला ।**
**सोवळा तो झाला कवण धर्म ।।**
**विटाळ वांचोनी उत्पत्तेचे स्थान ।**
**कोणा देह निर्माण नाही जगी ।।**
**म्हणुनी पांडुरंगा वानितसे थोरी ।**
**विटाळ देहांतरी वसतसे ।।**
**देहीचा विटाळ देहीच निर्धारी ।**
**म्हणतसे महारी चोखियाची।।**

संत सोयरामाई म्हणतात की, सर्वजण देहाचा विटाळ पाळतात, परंतु देह जरी विटाळलेला असला तरी, माणसाचं मन मात्र शुद्ध आणि बुद्ध पाहिजे. ही शुद्धता म्हणजे सोवळे वा कर्मकांड नव्हेत, तर देहाचा विटाळ देहातच जन्मतो, हे ओळखून मानवताधर्म पाळण्याची बुद्धी. विटाळावाचून कोणाच्या देहाची उत्पत्ती जगात झाली नाही? परंतु जो पांडुरंग आहे तो महान आहे.



# संत परंपरेतील निस्सिम विठ्ठल भक्त चोखामेळा

**सतीश सावंत**
इंग्लिश स्कूल, मंगळवेढा

भारतीय संस्कृतीच्या इतिहासात पंढरपूर ही देवभूमी, तर मंगळवेढा ही संतभूमी म्हणून गौरवलेली आहे. पंढरपूरची वारी ही मंगळवेढ्याला आल्याशिवाय पूर्ण होत नाही, ही परंपरा!

अठ्ठावीस युगे विटेवर उभ्या असलेल्या विठ्ठलाच्या संत मांदियाळीमध्ये अनेक जाती-धर्माचे संत भक्तीभावाने भागवत धर्माची पताका आपल्या खांद्यावर कौतुकाने मिरवत आले आहेत. याच संत मांदियाळीमध्ये सरळ





स्वभावाचा, विनम्रवृत्तीचा चोखोबांचा समोवश झाला ती आत्यंतिक, प्रेमळभावाने, परमेश्वर पांडुरंगावरती असलेली अपार श्रद्धा! विठ्ठल नामाविषयी असलेली ओढ.

बुलढाणा जिल्ह्यातील मेहुणपुरा येथून सरदाराने सरकारी कामासाठी धाडलेल्या सुदाम-सावित्रीला पारावर उरला नाही. हे दोघेही विठ्ठल भक्त असल्याने पंढरपूरचा अखंड शेजार त्यांना लाभणार होता. अशा सुदाम-सावित्रीच्या पोटी जन्माला आलेले संत म्हणजे चोखोबा!

अगदी पोर वयापासूनच विठ्ठलभक्ती अंगात भिनलेली. ढोरं ओढण्याचं कामही त्यांनी केलं. मुखामध्ये 'विठ्ठल-विठ्ठल' म्हणतच हा पांडुरंगाचा सखा कामामध्ये तल्लिन होऊन जाई. ७०० वर्षापूर्वीचा तो काळ म्हणजे जात-पात-धर्म-पंथ यांच्या अभेद्य भिंतींनी बांधलेला तो काळ. अतिशय कर्मठ काळ. जाती-धर्माच्या अजगरानं माणूसकीला गिळकृंत करून टाकलेलं.

संत चोखामेळा हा समाजाच्या कनिष्ट स्तरातला म्हणून उपेक्षित अवस्थेत हालअपेष्टा सहन करीत जगत होता. उगवणारा सूर्य एखादा तरी क्षण आनंदाचा देईल, या भरवश्यावर आपलं सारं दु:ख विसरणारा चोखोबा. सुख पाहता जवाएवढे! दु:ख पर्वता एवढे ।। असे जरी असले तरी तीळ भरही सुख चोखोबाच्या आयुष्यात आले नाही. अवहेलना, दु:ख, दारिद्र्य आणि निराशा यांच्या पलीकडे त्यांच्या जगण्यात काहीच नव्हते; पण एका गोष्टीने मात्र त्यांचे मन उंचावले होते. सर्व व्याधीवर मात करणारी भक्तीची संजिवनी त्यांना लाभली होती. घरात दारिद्र्य;पण मनात मात्र विठ्ठलनामाची श्रीमंती ओत-प्रोत भरली होती. त्यामुळे नैराश्याच्या दाट अंधारातही त्यांच्या वाटेवर प्रकाशाचे कित्येक कवडसे पसरले होते. घरात दारिद्र्य पण मनात भावभक्तीची समृध्दी वैभवामुळे त्यांना बाह्यदु:खाची मातब्बरी वाटत नव्हती. भक्तीची आनंद पताका सदैव त्यांच्या खांद्यावर नाचत होती.

ते नेहमी म्हणत, माझं भाग्य थोर. या वारकरी संप्रदायात मला नामदेवांसारखा गुरू भेटला. संत नामदेवानं माझं आत्मिक भरण-पोषणं केलं. जीवनाच्या काच-खळग्याच्या वाटेवरती भक्तीची बाग माझ्या जीवनात फुलविली. माझ्यासारख्या हलक्या जातीतल्या व्यक्तीत्वला बोटाला धरून संत मांदियाळीमध्ये अढळ स्थान दिलं. त्यांच्याच अभंगाच्या सुरांनी



माझ्या कानाच्या गाभाऱ्यात सुगंध पेरला. त्यामुळच भक्तीसुगंधच माझ्या जीवनाचा भाग झाला. हलक्या जातीचा असल्याने देवळाची पायरी चढण्याचा अधिकार नव्हता; पण विठ्ठलाच्या सर्वात लाडक्या भक्ताला तो पायरीचा मान मिळाला. आयुष्यभर विठ्ठलाचं श्रीमुख कधी डोळे भरून पाहता आलं नाही. तो कायम त्याचा भुकेला राहिला. पण एखाद्या देवळात देव वस्ती करीत नाही. त्याचा निवास भक्ताच्या अंत:करणातच असतो. ' वैकुंठीचा राणा' तेथेच नांदतो हेच खरे! आजच्या या स्वार्थी जगात द्वेष, मत्सराचा, हिंसेचा वणवा आपल्या अश्रूंनी विझविण्यासाठी जो धडपडतो तोच खरा विठ्ठलरूप ! म्हणूनच भक्तीच्या क्षेत्रात कुळ, जाती, वर्ण यांची निरर्थक कुंपणे उभी करू नयेत.

काही तथाकथीत भक्त भक्तीचं भपकेबाज प्रदर्शन करतात. होमहवन, जपजाप्य यातच अडकून पडलेले असतात. पण एखादा चोखामेळा आपल्या अंत:करणातच 'विठ्ठलाचं मंदिर' आपल्या भक्तीच्या शक्तीनं उभं करू शकतो. यासाठी बाह्य उपचाराची गरज नसते. यासाठी मनच विठ्ठलमय व्हावं लागतं. खरं तर परमेश्वर विठ्ठल एखाद्या वैभवशाली मंदिरात रमत नाही, तो यज्ञयागानं संतुष्ट होत नाही. तो भक्ताच्या संगतीनं चालण्यात आनंद मानतो. म्हणून तर तो राणा चोखोबाला ढोरं ओढण्यासाठी मदतीला आला. भक्ताचं मन हेच त्याच खरं निवास स्थान असतं ।

संत चोखा, संत सोयरा, संत बंका, संत निर्मळा, संत कर्ममेळा आख्खं कुटुंबानं अभंग रचना करून देवाला परखड जाब अधिकार वाणीनं विचारला आहे.

उसाचं आणि साखरेचं जसं नात असते तसे ईश्वराचे आणि मनाचे असायला हवे. उसातल्या साखरेप्रामणे मनात ईश्वर बसला की देह देवाचे मंदिर होते. एकदा का देवाला या मंदिराचे पावित्र्य लाभले की संसाराला पांडुरंगाचे पाठबळ लाभते.

**सुलभ सोपे हे । विठोबाचे नाम ।**
**सकळ साधनांचे । मूळ बीज ।**
**चोखा म्हणे मज । काहीच न कळे ।**
**विठ्ठलाच्या बळे । नाम घेतो ।**

असा अभंग चोखाच्या मुखातून बाहेर पडला सारेच संत अंर्तबाह्य थरारले. नामदेव शब्द न शब्द आपल्या शिष्याचे कान देऊन ऐकू लागले.

नामदेवांना चोखोबाचे अभंग ऐकल्यावर

-पंढरपूरला पहिल्यांदा भेटलेला, प्रश्नांच्या आणि विचारांच्या वादळात सापडलेला, बुजरेपणानं वागणारा,आपल्या जातीचं न्यून मनाशी बाळगून सगळ्यापासून लांबलांब राहणारा, भेटीगाठीच्या वेळी मिठी मारताच घाबरून जाऊन अंगाचा संकोच करणारा, हाच का चोखा हा प्रश्न पडला.

सगळ्यांच्या समोर आत्मविश्वासानं उभं राहून विठ्ठल नामाचा महिमा ओवीबध्द करून तितक्याच आत्मनिर्भतेनं ते सांगणारा हा चोखोबा म्हणजे विठ्ठलभक्तीच्या सामर्थ्याचं एक प्रांजल आणि सक्षम रूप होतं.

**जोहार माय बाप जोहार ।**
**तुमच्या महाराचा मी महार ।।**

शुद्र समजला जाणारा माणूस किती अपमानित केविलवाण्या अवस्थेत जगण्याची धडपड करत होता. आपल्या समाजात जातीवादाचे विषारी जंतू अद्यापी जिवंत आहेत. आपण माणूस म्हणून याच्या उच्चाटनासाठी, निर्मूलनाकरिता सवार्थानं प्रयत्न करणे, हीच उस डोंगा परि रस नोहे डोंगा ।। म्हणणाऱ्या चोखोबांना खरी आदरांजली ठरेल.

आपण सारीच देवाची लेकरं आहोत. देवाने जातीचा शिक्का मारून या जगात माणसाला धाडले नाही, हे जाणून माणूसकीचे दर्शन घडवावे, म्हणजे चोखोबांचे अभंग अंतर्मनात प्रवाही झाले असे म्हणू!

जन्माला आल्यापासून ते अखेरच्या श्वासापर्यंत ज्या दु:खानी त्यांची साथ कधी सोडली नाही अशा चोख्याने विठ्ठलाकडे आपल्यासाठी कधीच काही मागितले नाही. साऱ्यांनाच सुख:दुखाच्या, जन्म-मृत्यूच्या चक्रातून प्रवास करायचा आहे. अर्थात नियतीपुढं, विधात्यापुढं कुणाचंच काही चालत नाही. चाललं असतं तर राम जन्मातला वनवास त्याला भोगावाच लागला नसता. किंवा कृष्णावतरामध्ये आदिवासातला जन्म त्याला टाळता आला असता.

मंगळवेढ्याच्या वेशीवरील गावकुस कोसळून लाडका भक्त भेटायला स्वर्गात आला. चोख्याची हाडं विठ्ठल-विठ्ठल करत होती. ‘नियतीच्या खेळापुढं आपण हतबल आहोत. ईश्वर म्हणून आपली जगावर सत्ता असली, तरी कुणाचंही विधीलिखीत आपण बदलू शकत नाही.

आपल्या लाडक्या भक्तांचा तुम्हांला अतिशय प्रिय असणाऱ्या चोखोबांचा दुर्दैवी अंत झाला आहे. समाजातल्या वर्णाश्रमानं जिवंतपणी तुमच्यापासून लांब ठेवलं, पण मृत्यूनंतरही तसाच डाव साधला. जिवंतपणी त्याच्या नशिबात उपेक्षाच होती. मृत्यूनेही त्याची तशी उपेक्षाच केली; परंतु विठ्ठला मृत्यूनंतर त्याची उपेक्षा थांबविली पाहिजे. आयुष्यभर अपमान सोसून भक्ती करणाऱ्या चोखोबांना निदान मृत्यूनंतरही तरी सन्मान मिळाला पाहिजे. नियतीच्या किंवा विधीलिखिताच्या लेखावर आपली सत्ता चालत असेल; पण एकदा कुडीतून प्राण निघून गेला की नियतीची सत्ता संपते. विधीलिखितालाही तेथे पूर्णविराम मिळतो. म्हणून चोखोबांना त्यांच्या योग्यतेचा सन्मान आणि त्यांना शोभेल अशी जागा मिळाली पाहिजे. चोखोबा आता नाहीत, पण जोपर्यंत विठ्ठला तुझं नाव आणि अस्तित्व या जगात आहे तोपर्यंत चोखोबांची स्मृती चिरंतन राहिली पाहिजे.

चोखोबा आपण धन्य आहात. तुमचे अभंग युगानयुगे टिकून राहतील. तुमच्या नावाची पताका वारकरी शतकानुशतके अभिमानाने खांद्यावर घेतील. अशी ग्वाही तुमचे अभंग देत राहतील. पुण्यतिथीच्या निमित्तानं विनम्र अभिवादन!

# संत परंपरेतील चोखोबाचे स्थान

सौ. पुष्पा गोपाळ बेणारे
पंढरपूर

तेराव्या शतकात संत ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्राच्या परमार्थिक जीवन मंदिराचा पाया रचला. त्यावेळची सामाजिक स्थिती अत्यंत खालावलेली होती. लोकांना धर्मकांडामुळे खरा धर्म लोपला होता. बाह्य आचार विचार सोवळे-ओवळे यामुळे लोकांना खऱ्या धर्माचे ज्ञान नव्हते. जातीभेद, उच्चनीचता पराकोटीला पोहोचली होती. ब्राह्मण वर्गाला शास्त्राचे ज्ञान होते; परंतु ते केवळ पढित पांडित्य होते. स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी समाजाचे शोषण करणे हाच एक धर्म प्रत्येकाला माहीत होता. आपण समाजासाठी काही करावे, अशी सामाजिक ऋणाची भावना नाहीशी झाली होती.



समाज विस्कळीत झाला होता. अशा काळात ज्ञानेश्वरांचा जन्म झाला आणि जन्मापासूनच त्यांना अशा परिस्थितीचे चटके बसले होते. अशा विषय परिस्थितीमध्ये अखंड बुडालेल्या समाजाचा आत्मोद्धार व्हावा, लोकांना खऱ्या धर्माचे ज्ञान व्हावे, समान भावना जागृत व्हावी याकरिता ज्ञानेश्वरीसारखा उत्कृष्ट ग्रंथ लिहिला. या गीताभाषामृताने मृत समाज सजीव झाला. ही अमृत संजिवनी प्राशन केल्याने अनेकांचा पूनर्जन्म झाला.

**म्हणोनी कुळ जाती वर्ण ।**
**हे अवघेचि ग अकारण ।।**
**येथ अर्जुना माझेपण । सार्थक एक ।**
**तैसा क्षत्री वैश्य स्त्रिया ।**
**का शूद्र अंत्यादि इया ।।**
**जाती तवचि वेगळालिया ।**
**जव न भजी माते ।।**

अशाप्रकारे ज्ञानेश्वराने परमार्थिक क्षेत्रात सर्वांच्या समान अधिकाराची जाणीव करून दिली. अस्पृश्य जातीत जन्माला येऊन आत्मोद्धार करणाऱ्या असामान्य अशा संत चोखामेळाचे जीवन म्हणजे ज्ञानेश्वराच्या परमार्थिक चळवळीचे उत्कृष्ट फळ आहे. संत चोखामेळा ज्ञानेश्वर नामदेवाचे समकालीन होते. त्यांच्या चरित्राविषयी त्रोटक माहिती उपलब्ध आहे. चोखामेळा हे पंढरपूरचे रहिवाशी होते, असे संत चरित्रकार महिपती महाराज म्हणतात. परंतु वि.ल. भावे यांच्या मते चोखोबा मंगळवेढ्याचे होते. याबद्दल डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे म्हणणे असे की चोखोबा मूळचे वऱ्हाडातील होते. चोखोबांची पत्नी सोयराबाई, पूत्र कर्ममेळा, बहीण निर्मळा आणि बंका महार नावांचे मेव्हणेही होते. चोखोबांच्या परिवारातील ही मंडळी सुद्धा संतत्ववृत्तीची होती. सर्वजण विठ्ठलाची भक्ती करीत असत. जातीने महार असले तरी चोखोबाची राहणीमान अत्यंत स्वच्छ होती. त्यांनी कधीही मांसाहार केला नाही. परंपरेने आपल्या वाट्याला आलेले जाती कर्म पार पाडल्यानंतर स्नान करून धुतलेले वस्त्र नेसून विठ्ठलाची पूजा ते करीत असत.

चोखोबांचा परमार्थिक अधिकार, चोखोबांचे सुमारे २५० अभंग उपलब्ध आहेत. त्यांच्या परिवारातील संतांनी दीडशे अभंग केल्याचे आढळते. या अभंगाचे लिखाण करून ते सर्व एकत्र करण्याची महत्त्वाचे काम त्या वेळेच्या अंनतभट नावाच्या विद्वान ब्राह्मणांनी केलेले आहे. सातशे वर्षांपूर्वी ज्ञानदेव नामदेवांचा तो काळ. समाजात जातिभेद, चातुवर्ण्याची चौकट अत्यंत भक्कम होती. आजपर्यंत जातिभेदाच्या बाबतीत अनेक चळवळी झाल्या, विज्ञान युग आले आहे, यांत्रिकीकरणाने जग लहान होऊन जवळ आले, बुद्धिवादाचा उद्‌घोष होत आहे, तरीसुद्धा जातिभेदाची भावना पूर्णपणे समाजातून लोपली नाही. तर त्याकाळी हीन समजल्या जाणाऱ्या जातीतील बांधवांचे किती हाल झाले असतील? चोखोबांना अशा परिस्थितीचे अत्यंत दुःख होत असे. आपण महार या हीन जातीत जन्मल्यामुळे आपली उपेक्षा होत आहे. दुसऱ्याच्या उष्ट्यावर आपल्याला जगावे लागते, याची त्यांना खंत व्यक्त करताना ते असे म्हणतात...

**हीन याती माझी देवा ।**
**कैसी घडे तुझी सेवा ।।**
**मज दूर हो म्हणती ।**
**तुज भेटू कवण्या रिती ।।**
**माझा लागताची कर ।**
**सिंतोडा घेताती करावर ।।**
**माझ्या गोविंदा गोपाळा ।**
**करुणा भाकी चोखामेळा ।।**

त्याकाळी महार जातीतील लोकांचे जीवनही सामाजिक उपेक्षेमुळे अत्यंत खालावलेले होते. अभक्ष भक्षण, अपेय पान, शिवी शिवाय तोंडी शब्द नाहीत, अविचार हाच विचार होता.

अशा लोकांच्या सहवासात राहावे लागत असल्यामुळे चोखोबांचे मूळचे संवेदनशील मन गुदमरून जात असे ते म्हणतात,

**येथे तो संग आहे दुर्जनाचा ।**
**म्हणोनी शीण त्याचा होत आहे ।।**
**यातीया प्रकार अमंगळ खाणार ।**
**मद्य, मांस आहार करिताती ।।**
**मुखे तो वाईट बोलती कश्मळ ।**
**तेणे हळहळ जीव करी ।।**
**चोखा म्हणे ऐसा पडिलो काचणी ।**
**सोसू ही जाचणी कोठवरी ।।**

परंतु या परिस्थितीचा दोष त्यांनी कोणालाही दिला नाही. आपल्याला प्राप्त झालेले जीवन हे आपल्या पूर्व जन्माचे कर्म फळ आहे, असे ते म्हणतात.

**शुद्ध चोखामेळा । करी नामाचा सोहळा ।।**
**यातिहीन मी महार । पूर्वी निळाचा अवतार ।।**
**कृष्णनिंदा घडली होती ।**
**म्हणोनि महार जन्म प्राप्ती ।।**
**चोखा म्हणे विटाळ ।**
**आम्हा पूर्वीचे हे फळ ।।**

भोग भोगणे क्रम प्राप्त आहे. यापासून बद्ध जीवाची सुटका नाही याबद्दल चिंता अथवा खंत करणे व्यर्थ आहे. श्रद्धावान अशा बंधनापासून मुक्त होण्यासाठी धडपडत असतो. मनाला शांतता लाभावी म्हणून चोखामेळा त्यांनी अनेक यात्रा केल्या,

**बहुत हिंडलो देश देशांतर ।**
**परी मन नाही स्थिर झाले कोठे ।।**
**बहुत तीर्थे फिरोनिया आलो ।**
**मनासवे झालो वेगळाची ।।**
**बहुत प्रतिमा ऐकिल्या पाहिल्या ।**
**मनाच्या राहिल्या येरझारा ।।**

जो सदाचरणी आहे, सहनशील विवेकसंपन्न आहे, ज्याच्याजवळ भूतदया, भक्ती आहे, सन्मार्गाची ओढ आहे त्याला सद्‌गुरूच्या भेटीचा अपूर्व योग प्राप्त होतो. त्याप्रमाणे एके दिवशी एकादशीच्या पुण्यदिनी संत नामदेवाचे कीर्तन सुरू होते. चंद्रभागेच्या वाळवंटात अनेक भक्तांची गर्दी झाली होती. संत नामदेवांच्या अमृत मधुर शब्दाने चोखोबांचे अंतकरण शांत झाले. जीवनातील श्रेय प्राप्तीचा मार्ग सापडला. नामस्मरण विठ्ठल भक्ती स्वधर्म पालन अशाप्रकारे आत्मोद्धाराचा सोपा मार्ग सापडला. नामदेवरायांच्या गुरू मंत्रामुळे त्यांच्या जीवनात ईश्वर प्राप्तीचा योग आला. त्यांचे जीवन बदलून गेले; पण पांडुरंगाशिवाय त्यांच्या दृष्टीला अन्य काही दिसत नव्हते आणि विठ्ठलमय झाले कान, विठ्ठल नामाशिवाय काहीही ऐकायला तयार नव्हते. आपल्या गुरू विषयी कृतज्ञता व्यक्त करताना त्यांची वाणी तेजोमय शब्द प्रसवू लागली. ते म्हणतात,

**धन्य धन्य नामदेवा । केला उपकार जीवा ।**
**माझा निरसिला भेवो । दाखविला पंढरी रावो।।**
**मंत्र सांगितला सोपा । निवारिले भव तापा ।।**
**माझी कृपेची माउली ।**
**चोखा म्हणे पाणी घाली ।।**
**धन्य धन्य नामदेव । माझा निरसिला भेव ।।**
**विठ्ठल मंत्र अक्षरी । खूण सांगितली निर्धारी ।।**
**ठेवोनिया माथा हात । दिले माझे मला हित ।।**
**दावियले तारू । चोखा म्हणे माझा गुरू ।।**

आजपर्यंत अनेकांची संगत केली; परंतु दुःखाशिवाय पदरी काहीच पडले नाही. नामदेवाच्या भेटीमुळे मात्र सुखाचा लाभ झाला

**कोणाचा संग धरू कोणासाठी ।**
**तो दुःखाचीच मिठी पडे तेणे ।।**
**म्हणोनी नामयाचे धरियले पाय ।**
**आठविता होय समाधान ।**
**सुखाचे सुख मज दावियले ।**
**आनंद सावळा पाहू विटेवरी ।।**
**चोखा म्हणे माझा नामदेव प्राण ।**
**घालीन लोटांगण जीवभावे ।।**



आंतरबाह्य बदलून गेलेले चोखोबा विठ्ठल भक्तीत दंग राहू लागले. त्यांच्या प्रतिभा संपन्न मनाला विठ्ठल भक्तीने बहर आला. प्राजक्ताच्या फुलाप्रमाणे अनेक सुगंधीत विचारप्रधान भक्तिमय काव्य श्रवू लागले. याची थोरवी श्रेष्ठत्व १२ व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंतच्या सर्व संतांना जाणीव करून देत होते. संत नामदेव चोखोबाबद्दल गौरवाने म्हणतात,

**चोखा माझा जीव । चोखा माझा भाव ।।**
**कुळधर्म देव । चोखा माझा ।।**
**काय त्याची भक्ती । काय त्याची शक्ती ।।**
**मीही आलो व्यक्ती । तयासाठी ।।**

संत जनाबाई चोखोबांच्या भक्तीबद्दल म्हणतात,

**चोखामेळा संत भला । तेणे देव भुलविला ।।**

संत नरहरी सोनार म्हणतात-

**साधू संत येती थोर थोर ।**
**उभा निरंतर चोखामेळा ।।**

संत एकनाथ महाराज गौरवाने म्हणतात-

**चोखोबाची भक्ती कैसी ।**
**प्रेमे आवड देवासी ।।**
**नीच याती न मनी काही ।**
**एक जनार्दनी भुलला पाही ।।**

संत तुकाराम महाराज त्यांची थोरवी वर्णन करतात-

**उच्चनीच काही नेणे भगवंत ।**
**भावभक्ती देखोनिया ।**
**त्यातच पुढे ते म्हणतात**
**चोखामेळ्यासंगे ढोरे ओढी ।**

परम प्रिय अशा आपल्या भक्तांना देवाने अलंकार करून सदैव आपल्या अंगावर बसविले आहे, त्यामध्ये चोखोबारायांचे स्थान कोठे आहे, याबद्दल जनाबाई म्हणतात,

**चरणी वीट निर्मळ । तो हा झाला चोखामेळा।।**
**विठू माझा लेकूरवाळा । संगे लेकुरांचा मेळा।।**

# संत चोखोबांची दिव्यता

**ह.भ.प.सुधाकर इंगळे महाराज**
सोलापूर

प्रत्येक संतांनी विश्व हित जोपसण्याचा प्रयत्न केला आहे. जिवाच्या उद्धाराचा ध्यास फक्त संतांना होता. त्यासाठी वेगवेगळ्या साधना सांगताना अंतरंग साधन व अंतरंग अवस्था या विषयी संत चोखोबांनी परखड मत व्यक्त केले आहे.

ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा ।
काय भुललासी वरलिया रंगा ।।

बाह्य आकार, बाह्य क्रिया यामध्ये गुंतू नका. परमार्थ हा शुद्ध असावा, अंतरंग शुद्ध असावे या विषयी जागृती करताना त्यांच्याकडे खूपच सहजता पाहावयास मिळते.

पृथ्वीवरून स्वर्गातील अमृत शुद्ध करण्याचे सामर्थ्य संत चोखोबारायांचेकडे होते. ही दिव्यता विलक्षण असून ती सर्वांना कळावी यासाठी देवाला सुद्धा लिला करावी लागली. स्वर्गातील अमृत नासले म्हणून त्याला शुद्ध करणेसाठी संत स्पर्श आवश्यक होता. तो प्राप्त करून देणेसाठी पंढरपूरमध्ये संत पंगत (माउंद भोजन) आयोजन केले आणि तिथे स्वर्गातील देव अमृत कलश घेऊन आले. त्यावेळी त्यांना संत चोखोबारायांचा स्पर्श मिळाला आणि कलशातील अमृत शुद्ध झाले. ही दिव्यता होतीच; पण ज्ञानाची दिव्यता होती, भक्तीची दिव्यता होती. त्यामुळे सर्व संतांना जेवण वाढण्याची, पंगतीची जबाबदारी देवानी चोखोबारायांना दिली होती. या वरून हे लक्षात घेतले पाहिजे की वारकरी परंपरेमध्ये जातपात, वर्ण आश्रम याकडे न पाहता अधिकार, दिव्यता पाहिली जाते. सर्व संतांना पाहताना त्यांच्या जातीकडे न पाहता त्यांचे ज्ञान, त्यांचा अधिकार, त्यांची अवस्था पाहावी. आपल्या दोष दृष्टीने आपण संतांना पाहतो म्हणून त्यांचे आकलन होत नाही. त्यांना पाहिल्या बरोबर संतत्व दृष्टी प्राप्त होत नाही. संत चोखोबारायांना सुद्धा आम्ही तसेच पाहतो, म्हणून आम्हाला चोखोबाराय व्यवस्थित कळले नाहीत, असेच म्हणावे लागते.

संत चोखोबाराय हे देवाचे खूपच लाडके व अंतरंग भक्त होते. म्हणून त्यांच्या अस्थी घेऊन येण्यासाठी नामदेव महाराजांना देवानी सूचना देऊन मंगळवेढ्याला पाठवले होते. ज्ञानेश्वर महाराज, नामदेव महाराज आदी सर्व संतांनी चोखोबारायांना खूपच आदराचे स्थान देऊन त्यांना महत्त्वाचे अधिकार दिले होते. त्यांच्या परिवारातील प्रत्येक जण संत होता. कर्ममेळा, त्यांची अवस्था समजून घेणे खूप कठीण आहे. काही जण त्यांना त्यांच्या साहित्य लेखनावरून पारखतात. परंतु साहित्य हे एक अंग आहे. त्यावरून परिपूर्ण ज्ञान होईल असे नाही.

प्रत्येकाने चोख राहावे म्हणजे निर्मळ, प्रामाणिक व शुद्ध राहावे हा संदेश देऊन विश्वशांतीसाठी मोठा मंत्र दिला आहे. विश्वशांतीचा संकल्प करणारे संत म्हणून चोखोबारायांच्याकडे पाहिलं जातं. विश्वव्यापी विचार आणि दिव्यता त्यांच्याकडे होती. अशा संत चोखोबारायांना त्रिवार नमन!

# संत चोखोबांचे शब्दब्रह्म

**प्रो.डॉ.सौ.सुवर्णा चव्हाण-गुंड**
मराठी विभाग प्रमुख, प्राध्यापक
माउली महाविद्यालय, वडाळा, उ. सोलापूर

संत चोखोबा यांच्या शुद्धभावाने आणि परमात्म्याविषयी असणाऱ्या अत्यंतिक ओढीने त्यांच्या विचार व आचरणाला एक शुद्ध तत्त्व प्राप्त झालं होतं. संतांचे. महंतांचे विचार आपण त्यांच्या आचरण, विचार व साहित्यातून पाहतो. या संत साहित्यातून संतांनाही एक समाधान अनुभवावयास मिळते. वाचताना सुद्धा संतसाहित्याचे जाणकार असून साधक असतील तर उत्तम; परंतु भक्तीला समजून घेऊन वाचन करताना सुद्धा त्याचा अनुभव येतो, याचे कारण म्हणजे नामस्मरण, चिंतन आणि भगवंताची भक्ती, भगवत कार्य, सत्कर्माने प्राप्त अध्यात्मिक गती.. इत्यादिंच्या सात्त्विक आचरणातून आणि संतांच्या अंत:करणामध्ये शुद्ध सात्त्विक वृत्तीचा त्यांच्या हृदयात स्थित असलेला ओघ अखंडपणे वाहू लागतो. आणि त्यामध्ये तो अखंड व उत्कंठतेने आकंठ बुडालेला असतो. यामुळे संतांचे जीवन व्यवहार सुद्धा परमात्म्याशी एकरूप झालेले पाहावयास मिळते.

जे एकरूप होऊन हृदयातून शब्द अर्थासह स्त्रवू लागतात, तो शब्दच त्यांचा जीवनगतीचा हुंकार असतो आणि परमात्म्याचा बोध असतो. त्यांची आकलन क्षमता कैकपटीने वाढते. काळाच्या पलीकडे जाऊन विश्व समजून घेऊ पाहते. त्या विश्वाचा पसारा कवेत घेऊन मांडताना विश्वरूप आपल्या पुढ्यात अभंग रूपाने अवतरतो. तो अभंग संतांच्या अनुभवांना समजून वाचणं हा एक अलौकिक आनंद असतो... अमौलिक ठेवा असतो. यापैकी संत चोखामेळा यांचा १७८ वा अभंग मला पाहता क्षणी मनात घर करून गेला. तो उलगडताना असं वाटतं, की संदर्भासह जीवन सार्थक करण्याचा आपल्या अनुभवाचा लेखाजोखा संत चोखोबांनी आपल्या पुढेच मांडला आहे. ते म्हणतात...

**शुद्ध भाव शुद्ध मती ।**
**ऐसे पुराणे वदती ।।१।।**
**जयासाठी जप तप।**
**तो हा विश्वाचाचि बाप ।।२।।**
**नामे पातकी तारिले ।**
**जड जीव उद्धारिले ।।३।।**
**विश्वास दृढ धरा मनी ।**
**चोखा मिठी घाली चरणी ।।४।।**

जन्माला आलेला प्रत्येक जीव हा नरदेहाचा आहे; परंतु त्याच्या कर्माच्या गतीने

नराचा नारायण बनतो. हे कुणाच्याही बाबतीत होऊ शकते का? हो, पण त्याच्या जन्माबरोबरच त्याच्या पूर्व कर्माच्या पुण्याने पुण्यात्मा स्थित असलेल्या शुद्ध सात्त्विक कर्माच्या कर्मरूपाचा विस्तार करण्यासाठी याही जन्मात देह धारण केलेल्या देहाच्या रुपाने प्राप्त कर्माचा शुद्ध आत्मा कर्मगती घेतो. जिथे असेल तिथून तो आपली व आत्म्याची गती, स्थिती, परिस्थिती सत् मार्गाने विकसित होऊ पाहते. म्हणूनच संत चोखामेळा पुढील तीन स्थळांच्या उल्लेखाप्रमाणे मंगळवेढा, पंढरपूर व बुलढाणा जिल्ह्यातील मेहुणपुरी या तीन पैकी एका स्थळी (जन्म स्थळाविषयीची मतमतांतरे आहेत म्हणून) इथं जन्माला आले तेही शूद्र मानल्या गेलेल्या समाजात, हीन यातीत जन्माला आले. पण याही अवस्थेतून स्वतःचा व कुटुंबातील भक्ती पंथात न्हाऊन निघालेल्या सोयराबाई, बंका, निर्मळा, कर्ममेळा इत्यादी आप्त जनांना सद्गती प्राप्त केली. सामान्य मनुष्य (पूर्व संचित घेऊन आलेला) जन्माला येऊन स्वतः चा विकास करू शकतो. हा संदेशच परमेश्वराने दिला आहे की, काय? असंच संत चोखामेळा यांचे चरित्र वाचता म्हणता येईल.

आहे त्या प्राप्त स्थितीला दृढतेने, भक्तीभावाने संत चोखोबा बदलू लागतात. मन-शरीर-बुद्धी यांना एका लयीत गतीत आणतात. याला वर्ग, स्तर, वय, लिंग याचे बंधन त्यांना मुळी आडकाठी म्हणून येतच नाही. जरी अडचणी आल्या तरी लिलया ते तोलून धरतात. आपल्या कर्मगतीने ते जगत्गुरू तुकोबा म्हणतात त्याप्रमाणे, अंतरीचे स्वभावे, धावे बाहेरी अशी गत होते आणि यातून ते कधी परमेश्वराशी एकरूप होतात... तर कधी भक्तीतून ध्यानमग्न होतात हे कळतच नाही. असं असलं तरी ते कोणत्याही स्थितीत चुकीच्या विचाराला कसलाही थारा देत नाहीत. हेच वाचकांना शिकण्यासारखे आहे. नकारार्थी भूमिका सोडून आहे त्या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. यासाठी संत चोखामेळा आपणास या अभंगातून खूप मोठी जीवन धारणा देत आहेत.. अभंगाची पहिली ओळच आहे. शुद्ध भाव, शुद्ध मती...

वरील अभंगाचा, ब्रह्म शब्दांचा प्रथम अर्थ आपण पाहताना, भाव म्हणजे काय ते पाहूयात. भाव म्हणजे ईश्वराच्या अस्तित्वाची सतत जाणीव असणे, ईश्वराला जाणून घेण्याची जीवात असलेली तीव्र तळमळ आणि भाव म्हणजे ईश्वराप्रतीचे अतिव प्रेम, जवळीकता, शरणागती, या संगमातून अंत:करणामध्ये निर्माण झालेला ओलावा. हा अर्थ आपण पहाताना पुढं आणखीन ते विस्तृत रूप देत असताना म्हणतात, प्रत्यक्ष जीवनातही ईश्वर पाहता येतो, हे साधकांच्या अनुभूतीचं स्वरूप विश्वातून सिद्ध करून दाखवले आहे. प्रायोगिक स्तरावर ईश्वर पाहण्याचे भावचक्षू दिले आहेत. स्वबळावर भाव जागृत करून भावविश्वाच्याही पलीकडे जाणे कोणत्याही जीवाला शक्य नाही; परंतु ते जर ईश्वराच्या सगुण तत्त्वाची उपासना करत असतील, तर तो साधक सगुणांकडून निर्गुणाकडे जाण्याचा म्हणजेच अद्वैतापर्यंतचा प्रवास भावामुळे त्यांस शक्य होतो. साधकाच्या आध्यात्मिक जीवनात भावाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, म्हणूनच आपले मन भावाच्या माध्यमातून ईश्वराला अर्पण करू शकतो. भावनिर्मितीमुळे आपले मन ईश्वरचरणी लीन ठेऊन आपली अध्यात्मिक उन्नती स्थूलाकडून सूक्ष्माकडे चालू होते. भावनिर्मिती झाल्यावर आपल्याला स्वत:तील अहंम्‌ची जाणीव अधिक प्रमाणात होऊ लागते. भावाच्या अस्तित्वासमावेतच आपल्याला स्वत:तील अहंम्‌च्या अस्तित्वाची जाणीवही होऊ लागते. भावामुळे अनेकांनी आनंदाची अनुभूती येते परंतु अहंम् वाढल्याने ती घटते, हे साधकाला

जाणवू लागते आणि त्याचे अहंम् निर्मूलनाचे प्रयत्न वाढू लागतात, ही भावना अनेक संतांनी आपल्या अभंगातून ओव्यातून सांगितली आहे. उदाहरणार्थ संत मुक्ताई म्हणतात,

**शुद्ध ज्याचा भाव झाला ।**
**दूरी नाही देव त्याला ।।**

म्हणून प्रथम शुद्ध भाव होणं महत्त्वाचे आहे. संत मुक्ताबाई यांच्याप्रमाणेच ज्ञानेश्वरीमध्ये सुद्धा संत ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे, संकल्प करणे हा महत्त्वाचा सिद्धांत आहे. संकल्प विकल्पात्मक मन असते. (१३,११) संकल्प म्हणजे विचार व कल्पना होय. संकल्पाप्रमाणे कृती करण्याची इच्छा होणे म्हणजे संकल्प बदलले की, भाव बदलतात. म्हणून परमेश्वराविना दुसरा भाव मनात असू नये. एकनिष्ठता भाव असने म्हणजेच मन शुद्ध असते. अशा प्रकारे भाव शुद्ध झालेला असतो. साध्या साध्या शब्दांतून आत्मानुभवाच्या खुणा त्या साधकाला पटू लागतात. म्हणूनच जगद्गुरू तुकोबा म्हणतात ते पाहणं अतिशय महत्त्वाचे आहे.

**तुका म्हणे मन मुरे ।।**
**मग जे उरे तोचि तू ।।**
**मन मुरे मग जे उरे ।।**
**ते तू कारे सेवीसीनी ।।**

वेद हा आत्मा ब्रह्म आहे व हे ब्रह्म म्हणजे तो देव तू आहेस, ही जाणीव त्याला होऊ लागते आणि मन मुरते त्यातून मग जे उरते ते तू का रे सेवित नाही, जो शुद्ध मन भावना, विचार उरतात एक शून्य भाव उत्पन्न होतो. तो भाव म्हणजे प्रथम ईश्वराप्रती होते. यानेच परमात्मा विठोबा प्राप्त होतो. म्हणून संत चोखामेळा यांनी शुद्ध भावाला महत्त्व देऊन ती अनुभूती आपल्या अभंगातून व्यक्त केली आहे. म्हणूनच वेदांपासूनचे ज्ञान आत्मानुभवाने संत चोखामेळा यांनी अंगी उतरवले होते. हे एका दिवसांत शक्य आहे काय? आपण या आत्मसाक्षात्कारी शब्दार्थातून संदर्भासह शुद्ध भाव जाणला तर ते शब्द ब्रह्म आकळायला मदत होते..

प्रथम ईश्वराप्रती एक भाव असणं महत्त्वाचं आहे. अद्वैत भाव, अंहम् ब्रम्हांस्मी हा भाव होणं महत्त्वाचे आहे. त्या परमेश्वराचा अंश आपल्यामध्ये स्थित असतो. त्याचा विकास करण्यासाठी किंवा त्याला अनु रेणूया एवढा आहे, त्याचा आकाशा एवढा परमेश्वरा एवढं रूप करण्यासाठी, त्याचं परमात्म्याशी एकरूप होणे महत्त्वाचे आहे. एक भाव झाल्यानंतर द्वैत मनात राहत नाही. यानंतर येतो तो शुद्ध भाव तो एवढा शुद्ध असतो की, मन- शरीर-बुद्धी या एका लयीत येतातच. साधक पूर्णपणे परमात्म्याच्या रूपाशी एकरूप होऊन जातो.

प्रत्येक धर्मामध्येही हेच सांगितलेले आहे की, शुद्ध भाव हाच तुमचं सात्त्विक जीवन आहे. ते तुम्हाला यशस्वीतेकडं, अध्यात्मिक उन्नतीकडं घेऊन जाते. त्यासाठी सातत्याने जप तपाची साथ घ्यावी लागते. यानेच तो नराचा नारायण बनतो. म्हणूनच संत चोखामेळा या अशा साधकांविषयी म्हणतात, तो हा विश्वाचाचि बाप नवविधा भक्तीची पहिली पायरी, मापदंड आहे. सत्य अहिंसा अस्थेय. या वैश्विक, मूलगामी जगण्याच्या तत्त्वांचाही आधार घेता येतो. आपण मनानं, शरीरानं व विचाराने जसं पवित्र होत जातो, तसतसे आपणास गती प्राप्त होते. असं सात्त्विक कर्म करणारा किंवा पुण्य कर्मानं पूर्व जन्माची पुण्याई याजन्मी फळाला आली असं म्हणता येते. ते हेच स्वतःला शुद्ध करता करता तो सात्त्विक होतो. सात्त्विक बनून शुद्ध अंतः करणाचा भाव घेऊन तो पुढेही जन्मास येतो. तो कुठे जन्माला आला यापेक्षा तो किती सात्त्विक कुळात जन्माला आला, हे महत्त्वाचे आहे. याचा अर्थ तो शुद्ध भाव जपणं ही त्यांची जीवनशैली, कर्म बनते. अशी कर्म साधना करताना सदैव

जागृत असतात. यासाठी संत तुकोबांच्या अभंगांचा संदर्भ पाहता येईल...

**आपुलिया हिता जो असे जागता ।**
**धन्य माता पिता तयाचीया ।।**
**कुळी कन्या पुत्र होती जे सात्त्विक ।**
**तयाचा हरिक वाटे जीवा ।।**

सात्त्विक कर्म करताना जप तप, नामस्मरण यांचाही अवलंब केला तर आणखीनच तो जागृत राहून सद्‌गती प्राप्त करेल. यासाठी संत चोखामेळा म्हणतात.

**नामें पातकी तारिले ।**
**जड जीव उद्धारिले ।।**

अशा वागण्यानेच गती प्राप्त होईल हा विश्वास मनात दृढ असला पाहिजे, तरच आपल्याला कितीही कठीण परिस्थिती आली तरी अचल राहून अटलपणे सात्त्विक कार्य करता येईल. कारण प्रत्येक टप्प्यावरती आपल्याला म्हणजे साधकाला परीक्षा द्यावी लागते. परीक्षा देताना आपण आपल्या सात्त्विक कर्मावर किती दृढ आहोत, हे महत्त्वाचं असतं. म्हणूनच हा विश्वास जेवढा दृढ ठेवाल तेवढं तुम्ही स्वतः ला उद्धाराल! आणि यावरती विश्वास ठेवा. हेच संत चोखामेळा या अभंगातून तळमळीने सांगत आहेत. यासाठी आपल्याला विश्वास ढळू द्यायचा नाही, म्हणूनच भगवान विठ्ठलाच्या चरणी श्रद्धा, निष्ठा हवी, ती सुद्धा आहे की नाही त्याची परीक्षा विठोबा घेत असतो. ती परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागते. यात यशस्वी होण्यासाठी चोखोबांनी विठ्ठलाचे चरण पकडले आहेत. त्याच्याच पायी हे सर्व शक्य आहे. कारण भक्ताचे सर्व कष्ट आपल्याकडे घेऊन भक्तला अलगत जीवन पार करतो. अर्थात त्याची तेवढी भक्ती, निष्ठा असायला हवी आणि आपणच सर्वश्रेष्ठ आहोत हा अहंम् शेवटी न येऊ देणं ही फार मोठी विनयशीलता आहे. कारण यानंतर त्याच्याकडे शक्ती येणार आहे. त्याचा वापर अन्यायकारक होऊ शकतो आणि पातक माथी येते... हे सर्व मिळवणं, ही अध्यात्मातली उंची गाठणे सहज साध्य होत नाही, ती एक सुळावरची पोळी आहे, त्याला पावलोपावली स्वतःला घडवावं लागतं, खरं उतरावं लागतं, म्हणून कितीतरी सुंदर अशा कमी शब्दात संत चोखोबांनी आपल्याला हे जीवनाचे मर्म सांगितले आहे. म्हणून मला हा अभंग खूप खूप आवडला. संत चोखोबांच्या जीवनाचेच नव्हे, तर नराचा नारायण बनण्याचं अतिशय कमी शब्दात अर्थगर्भ जीवनाशय दिलेला आहे... संत चोखोबांच्या या ब्रह्म शब्दार्थातून जाणकारांनी विचार आवश्य करावा असा आहे..

अर्थात संत चोखामेळा यांचे अभंगातून अवतरित झालेले शब्द ब्रह्म एक कोरीव शिल्प आहे. त्याचा अवलंब जर साधकानीच नव्हे, तर सामान्य माणसालाही तो विचार दिशादर्शक व सद्‌गती प्राप्त होईल... म्हणूनच तो शेवटी आपल्या जीवनासाठी ब्रह्म शब्द बनतो... शुद्ध भाव शुद्ध मती.

# संत चोखामेळा आणि दलित साहित्य

डॉ. गोपाळ गोविंद बेणारे

संत चोखोबा हे जातीने महार. बाराव्या शतकात रूढिबद्ध समाजाच्या चौकटीमध्ये त्यांना राहण्याखेरीज गत्यंतर नव्हते. आपण यातीहीन समाजात जन्मलो याचे त्यांना दु:ख आहे. त्यांच्या अभंगात सामाजिक दु:खाची जाण त्यांनी समाजाला करून दिली आहे.

**हीन याती माझी देवा ।**
**कैसी घडे तुझी सेवा ।।**
**मज दूर दूर हो म्हणती ।**
**तुज भेटू कवण्यारिती ।।**

किंवा दुसऱ्या एका अभंगात ते म्हणतात-

**अधिकार माझा पायी ।**
**तुम्ही तो गोसावी जाणत असा ।।**
**अवघ्या वर्णामाजी हीन केली याती ।**
**विटाळ विटाळ म्हणती जनोजनी ।।**
**कोणीही अंगिकार न करती माझा ।**
**दूर दूर हो जा अवघे म्हणती ।।**
**चोखा म्हणे तुम्ही घ्याल पदरी ।**
**तरीच मज हरि सुख होय ।।**

ही स्व: स्थिती आणि स्व: दु:ख चोखोबांनी अभंगात मांडले आहे. त्यावरून त्या काळातील समाज रचनेची स्थिती आपणास समजू शकते. कोणताही कवी किंवा लेखक हा त्या त्या युगाचा घटक असतो. त्या समाजापासून आणि त्यातील घटनांपासून तो दूर जाऊ शकत नाही. त्या काळाचे त्याच्या वाङ्मयावर पडसाद ऐकू येतात. पाश्चात्य जे जे अभिजात कवी झाले त्या कवींच्या काव्यात तत्कालीन स्थितीचे चित्र उमटलेले दिसते. चॉसर हा चौदाव्या शतकात होऊन गेलेला एक महाकवी आहे. त्याने आपल्या 'कॅन्डरबरी टेल्स' या काव्यसंग्रहात चौदाव्या शतकातील समाज स्थितीचे उत्तम चित्र पाहावयास मिळते. धर्म, चालीरिती, संस्कार, नीती या विषयीच्या कल्पना त्या काव्यसंग्रहातील पत्रांच्याद्वारे पाहावयास मिळतात. तथापि, चोखोबांचा काळ त्याही पेक्षा जुना आहे. त्यामुळे त्यांना समाजाकडून अत्यंत हिणकस वागणूक दिली गेली असेल, असे मानावयास हरकत नाही. एका अभंगात ते म्हणतात-

**पंगतीचे शेष उच्छिष्ट प्रसाद ।**

यावरून चोखोबाच्या जातीतील लोकांना पंगतीमध्ये कशी वागणूक दिली होती, याची कल्पना येते.

आगरकर, आंबेडकर, म. फुले यांच्याही पूर्वी संत एकनाथांनी मानवतेचे विराट दर्शन घडविले आहे. गाढवला गंगेचे पाणी पाजले, यवनांनी अंगावर अनेकदा आपली थुंकी टाकली




असताना गंगेचे स्नान करणे, श्रद्धाला जेवावयास आलेल्या ब्राह्मणासाठी केलेले अन्न हरिजनांस वाढणे वगैरे उदाहरणे माणूसकी, सोशिकता आणि प्रेम यांची जिवंत उदाहरणे आहेत. पाश्चात्य संस्कृती आणि धर्म यांचा स्नेह वृद्धिंगत केल्यामुळे भारतात त्याचे पडसाद उमटू लागले. टिळक आणि आगरकर यांनी स्वराज्य आणि सामाजिक सुधारणा यासाठी चळवळी उभ्या केल्या होत्या. त्या चळवळींच्या मागे ईश्वर निष्ठेचे, लोक निष्ठेचे, ध्येयनिष्ठेची अधिष्ठाने होती. आगरकर यांनी तर सामाजिक सुधारणेसाठी सुधाकरामधून लेखन केले. महात्मा फुले यांनी आपल्या घरातील हौदाचे पाणी हरिजनांना नेण्यास परवानगी दिली. या सर्व कृतींमागे मराठी संतांची पूर्ती होते. श्री. ज्ञानदेवांना समाजाने कोणतेही अधिकार ठेवले नव्हते. तरीपण त्यांनी आपल्या मंडळात चोखोबांना घेतले होते. एकाच व्यासपीठावर आल्याने त्याचे पडसाद पुढील काळावर सतत उमटत गेले.

आज दलित साहित्य ही एक स्वतंत्र वाङ्मय चळवळ आहे, असे त्यामध्ये लेखन करणारे लेखक सांगत आहेत. या चळवळीत लेखन करणाऱ्या विचारवंतांना भारतातील प्राचीन वाङ्मयाशी काही देणे घेणे नाही. त्यांचे स्फूर्तीस्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. पण बाबासाहेब आंबेडकरांनी आपले काही ग्रंथ चोखोबा आदि संतांना अर्पण केले आहेत. मग प्राचीन वाङ्मयाला समुद्रात बुडून टाका म्हणणारे हे दलित साहित्यिक डॉ. आंबेडकरांचेही साहित्य समुद्रात बुडवून टाका, असे म्हणणार काय? मनुष्य महान ही दलित साहित्याची घोषणा नाही. ज्ञानदेवाच्या पसायदानात विश्वात्मक देवाची आणि मानव्याची कल्पना मांडली आहे. त्यामुळे मनुष्य महान हे नव्याने आपण निर्माण केलेले सिद्धांत आहेत, असे म्हणणे कितपत योग्य दिसेल? डॉ. आंबेडकरांनी भारतीय जातीय व्यवस्थेचा अभ्यास करून मनुष्याच्या हीन दृष्टीचा, कृतीचा निषेध केला. पण दलित साहित्यिक ज्या विध्वंसक वृत्तीने प्राचीन वाङ्मयाचा निषेध करतात. तसा डॉ. आंबेडकर

करीत नाहीत. त्यांनी मनुस्मृतीवर जोरदार हल्ला केला आहे. पण वेद-वाङ्मयाशी इमान राखणाऱ्या संत चोखोबांचा निषेध करीत नाहीत. संत नामदेव आदी संत मंडळींनी समाजातील सर्वांना बरोबर घेऊन विधायक वृत्तीने या देशात एकपणाने नांदणाऱ्या संस्कृतीला अधिक व्यापक बनविण्याचा प्रयत्न केला.

साहित्याला जात असते काय? असा एक प्रश्न सतत विचारला जात आहे. साहित्याला चौकटीत बसवून त्याचे व्यापक स्वरूप बिघडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. अभिजात साहित्यामध्ये माणसाच्या विशालवृत्तीचे दर्शन घडते. त्या विशालवृतीला जातीचे परिमाण लावणे हे कितीपत योग्य आहे? साहित्याची गंगोत्री प्रत्येक मानवाला उपभोगाचा अधिकार देते. चंद्र, सूर्य, नदी आणि अभिजात साहित्य हे सृष्टिने निर्माण केलेले पदार्थ आहेत. त्याचा परिणामाशी काही संबंध पोहोचत नाही. काही वैगुण्य कोणाला दिसेल तर त्या त्या युगाचा तो परिणाम असतो. ब्राह्मण साहित्य, मराठा साहित्य, सोनार साहित्य, दलित सहित्य असे प्रकार पाडणे म्हणजे साहित्याचे अवमुल्यन करण्यासारखे आहे. म्हणून दलित साहित्य चळवळ ही समाजाला कितपत मान्य होईल? अशी एक शंका आहे. काळाच्या ओघात तरी टिकेल काय? पाश्चात्य देशात असे काही सवते सुभे निर्माण झाले. पण त्याचे अस्तित्व टिकवता आले नाही. जे जे अभिजात नाही, ते ते टिकले नाही. ज्ञानेश्वरी बरोबर संत चोखोबांचे अभंग मराठी साहित्यात मोठ्या व्यापक दृष्टीने वाचले जात आहे. दलित साहित्य म्हणून त्याचे वाचन होत नाही. तर संत साहित्य म्हणून त्याचे वाचन होत आहे. संत हे समाजाचे खरे खरे प्रतिनिधीत्व करणारे नेते आहेत. त्यांच्यात सोशिकता, परधर्म सहिष्णुता, ईश्वर निष्ठा आहे. दलित साहित्यिकांत आहे की नाही, हे काळ ठरवेल.

दलित साहित्यिकांना स्वतंत्र चूल मांडावयाची असेल तर त्याला कोणी विरोध करणार नाही, पण ते कितपत यशस्वी होईल याचा त्यांनी विचार करावा. दलित साहित्याचा आद्यप्रवर्तक कोण? असा प्रश्न विचारला तर आपणास चोखोबांचे नाव घ्यावे लागेल. चोखोबांना देखील ज्ञानेश्वर संत मंडळातून बाहेर काढणे योग्य होणार नाही. पण दलित साहित्याचा सवता सुभा मांडणाऱ्यांना देखील या चळवळीचे नेतृत्व संत चोखोबांना द्यावे लागेल. त्यांना ही कल्पना मान्य होणार नाही. कारण देवास संत यांना चोखोबा मानतात. म्हणून त्यांना चोखोबा मान्य व्हावयाचे नाहीत. माणूस महान ही कल्पना निर्माण होण्यासाठी संत वृत्ती अंगी आणल्याखेरीज उपाय नाही. संत हे सोशिक, सहिष्णू आणि समाजासाठी आपले सर्वस्व वेचणारे, निरिच्छवृत्तीने पाहणारे आधारस्तंभ आहेत.

॥ श्री विठ्ठल प्रसन्न ॥

# जाहिर विनंति

## मंगळवेढे येथील श्रीसंत चोखामेळा

## समाधीचें उद्‌घाटन

गुरुवार दिनांक ९-३-१९६१ रोजीं सायंकाळीं ४॥ वाजतां हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब सांगली यांचे शुभहस्ते होणार आहे. तरी आपण सदर समारंभास यावे अशी विनंति आहे.

स्थळ:-श्री संत चोखामेळा समाधीजवळ, मंगळवेढे.

आपला,

**ह. ना. उर्फ बापूसाहेब पटवर्धन**

चेअरमन,

श्री संत चोखामेळा जीर्णोद्धार कमिटी,

मंगळवेढे.

---

( श्री पांडुरंग मुद्रणालय, पंढरपूर )